परिनेणेंआपणासी॥ इतरांही अवस्थेसी॥ निश्चयेसीजाणतु॥ ८॥ अभिमानी आ
णिअवस्थात्रयासी॥ एकआत्माचिस्वयेंप्रकाशी॥ एककाळींचसर्वांसी॥ स्मृत्यन्व
येसीजाणत॥ ९॥ पहिलेंस्वप्नदेखिलेंअसेम्हणे॥ सुषुप्तिकाळींसुखभोगणें॥ तेंसु
खसांगेजागेपणें॥ विषयभोगणेंजागृतीस॥ १०॥ साक्षीअवस्थात्रयाचेंभान॥ एक
लाएकज्ञाणेआपण॥ एकसमयींचअनुसंधान॥ स्वयेंपूर्ण करीतसे॥ ११॥ ऐसेंति
हीं अवस्थांचेंज्ञान॥ एकसमयीं एकलापूर्ण॥ अभिमानीविश्वतैजसप्राज्ञ॥ जाणेसं
पूर्णइंद्रियांसहित॥ १२॥ तैसेबाल्यतारुण्यादिजरा॥ त्यामाजीभोगिलेसुखसंभारा॥
दीनघटिकासर्वपसारा॥ जाणेरघुवीराएकसमयीं॥ १३॥ ऐशायुक्तिकरूनिश्चीरा
मा॥ जाणअवस्थात्रयाचाद्रष्टाआत्मा॥ ज्यातेंप्रकाश्यदृश्यगरिमा॥ न्यावीउपरमा
नीतीसुखें॥ १४॥ ऐसियासदुक्तीकरून॥ दोन्हींभिन्नकेलींसंपूर्ण॥ द्रष्टाआत्मातो
सर्वज्ञ॥ दृश्यासीजाणप्रकाशी॥ १५॥ ऐशायुक्तिकरूनरघुपती॥ श्रुतिनेतिमुखेंनि
षेधिती॥ तेंतेंत्यजावेंगासर्वार्थी॥ पावसीअंतीअवशिष्टातें॥ १६॥ उरलेंजेंचिन्मात्र

निरंजन॥तेंसर्वनिषेधींप्राप्तजाण॥स्वयेंभेटेज्ञानघन॥जाणतेजाणसर्वांतेंजें॥१७॥
जेथेंज्ञेयमात्रकांहींनभासे॥केवळज्ञानमात्रचीस्वप्रकाशें॥तेंचिब्रह्मआपणऐसें॥
जाणविश्वासेंसर्वेश्वरा॥१८॥अगाब्रह्मस्वतातूंचिअससी॥त्याआपणाजाणावया
आनंदराशी॥साहासकासयाकरिसी॥सिद्धअसेसीतुझाचितूं॥१९॥तरीतेंतुझें
स्वरूपकैसें॥ऐकरघुरायासावकाशें॥जेथेंजागृत्स्वप्नसुषुप्तिनसे॥तेंचिअसेस्व
रूपतुझें॥२०॥तूंअवस्थात्रयावेगळा॥अवस्थात्रयाचासाक्षीकेवळ॥तेंचतुझेंस्व
रूपनिर्मळ॥नित्यनिरवळसनातन॥२१॥अभिमानीआणिप्रमाता॥यातेंहिसाक्षी
प्रकाशिता॥म्हणोनिसाक्षीतोतूंगारघुनाथा॥नित्यअनंताचिद्रूपतूं॥२२॥एवंएक
यासंमतिकरुनी॥हेंचिसूचिलेंयानिरूपणी॥अवस्थात्रयादिअभिमानी॥आत्मादि
नम्रणीसर्वजाणे॥६३॥ऐसाजोकाआत्मापूर्ण॥तोचितूंशिष्याज्ञानघन॥सर्वांचा
हीसाक्षीजाण॥शुद्धचिद्घनस्वरूपतुझें॥६४॥इतिश्रीस्वात्मबोधग्रंथ॥श्रवणेंपाव
नकरीयथार्थ॥श्रीरघुनाथचरणीअध्यायसुनिश्चित॥मौनीस्थापिततृतीयदा॥
॥२५॥ ॥७॥ ॥श्रीरस्तु॥ ॥७॥ ॥२॥

इतिस्वात्मबोधेतृतीयोध्यायःसमाप्तः

श्रीगणेशायनमः॥ ॥शिष्यह्मणेकृपाघना॥सद्गुरुस्वामीभवभंजना॥मीजीव
ऐसीमजभावना॥वाटतसेमनाबहुकाळ॥१॥तेव्हांजीवत्वमजलाखरें॥किंवा सा
क्षित्वेंब्रह्ममीनिर्धारें॥नित्यज्ञानानंदविचारें॥पाहतांबरेंकोणमी॥२॥सद्गुरुह्मण
तीशिष्यराया॥जीवत्वमानिसीह्ममेंवायां॥नित्यज्ञानानंदसरवया॥साक्षीअभ
मेयाअखंडतूं॥३॥अगादेहाभिमानेंकरूनी॥जीवत्वमानिसीआपणालागुनी॥व
स्तुतासाक्षीचभरंवसेनी॥अससीनिदानींज्ञानरूप॥४॥नेणोनिआपुल्यासाक्षित्वा
सी॥अडकोनिदेहाभिमानपाशीं॥कर्ताभोक्ताक्रियाऐसी॥जीवींमानिसीह्ममयोगें
॥५॥मीजीवमजमरणआहे॥मीदेहोमीकरंटाहे॥अंधबधिरपंगुपाहे॥बाल्यादिसर्व
हेमानिसीतूं॥६॥मीगोरमीकृष्णवर्ण॥जडमंदमीहीनकर्ण॥दरिद्रीमीबरासधन॥
मानापमानमजहोय॥७॥मीज्ञातामीचतुरपंडित॥व्युत्पन्नथोरमीतर्कवंत॥कवि
कुशळमीबुद्धिमंत॥अतिमहंतसाधुमी॥८॥मीब्राह्मणक्षत्रीवैश्यशूद्रवर्ण॥गृहस्थ
ब्रह्मचारीमीआपण॥वानप्रस्थसंन्यासादिआश्रमजाण॥धरिसीअभिमानदेहधर्म
॥९॥थोरजातीथोरगोत्र॥थोरकुळींचामीपवित्र॥इतरजनतेअपवित्र॥इत्यादिवि-
चित्रअभिमान॥१०॥ ॥संमतीगीताश्लोक॥ अढ्योभिजनवानस्मिकोन्योस्ति
सदृशोमया॥यक्ष्येदास्यामिमोदिष्यइत्यज्ञानविमोहिता॥१॥ ॥टीका॥ मीचि

द्यधनादिकरूना॥ कोणअसेमजसमान॥ यजनदानेंकीर्तिकरीन॥ हर्षपावेनतत्स्व
खें॥११॥ ऐसामोहितअज्ञानपर॥ नेणसीसहसाआत्मविचार॥ मीदेहचिहेप्रीतिफा
र॥ बुद्धिदृढतरबंधतोची॥१२॥ देहादिकजेअनात्मभूत॥ आत्मबुद्धिधरितांतेथ॥
तेचिअविद्याबंधनहोत॥ मोक्षबोलिजेतनधरितां॥१३॥ऐसेंचिश्रीशंकराचार्य॥ बो
लिलेयेविषयींनिश्चय॥ बंधादिकल्पनाबुद्धिमय॥ तोश्लोकान्वयपरिसावा॥१४॥ ॥
संमतिश्लोक॥ अनात्मभूतेदेहादावात्मबुद्धिरस्तुदेहिनां॥ साविद्यातत्कृतोबंधस्त-
न्नाशोमोक्षउच्यते॥२॥ अनात्मन्यात्मधीर्बंधस्तन्नाशोमोक्षउच्यते॥ बंधमोक्षौ
नविद्येतेनित्यमुक्तस्यचात्मनः॥३॥ ॥टीका॥ अगादेहीह्मणजेजीवजाण॥ त्यास
हेंचीपडेरेबंधन॥ जेंदेहादिकाचेठायींआपण॥ मीचह्मणोनिमानितातो॥१५॥ अना
त्मींधरितांआत्मबुद्धी॥ मिथ्याबंधनपडेशब्दीं॥ तेचिअविद्यानिरुद्धी॥ नाशितांश-
ब्दींमोक्षह्मणिजे॥१६॥ वस्तुतामोक्षबंधवार्ता॥ आत्मस्वरूपींनसेसर्वथा॥ नित्य
मुक्तअद्वैतता॥ आत्मातत्वतातूंशिष्या॥१७॥ बंध मोक्षरहितस्थिती॥ आत्माजा
णगानिश्चिती॥ येचविषयींश्रीभागवतीं॥ बोलिलाश्रीपतीतेंऐक ॥१८॥ ॥संमति
भागवतश्लोक॥ बद्धोमुक्तइतिव्याख्यागुणतोमेनवस्तुतः॥ गुणस्यमायामूलत्वा
न्ममेमोक्षोनबंधनं॥४॥ टीका ॥ बंधमुक्तहेव्याख्यापाही॥ भासेगुणेंकरूनसर्व

ही॥ वस्तुतामजआत्मत्वींकांहीं॥ थारनाहींबंधुमोक्षा॥१९॥ माझियानिजरूपींजा
ण॥ सहसानसेमोक्षबंधन॥ उभयतागुणकार्यकरून॥ भासेआपणगुणत्वीं॥२०
मीगुणातीतआत्माचिद्घन॥ गुणतेसमूळमायीकजाण॥ माझेस्वरूपींमायाभान
॥सत्यत्वेंकरूननसेची॥२१॥ गुणासिमायामूळह्मणोन॥ यास्तवभासेमोक्षबंधन
॥नित्यमुक्तमीचिद्घन॥ तेथभाषणहेंनसे॥२२॥ अमायीकमीआत्मानित्य॥ मायी
कगुणकार्यबंधअसत्य॥ स्वरूपींनसेचिगासत्य॥ जेविकांआदित्यतमींनदडे॥२३॥
मायीकमिथ्याबंधननाहीं॥ तैमोक्षहीकैंचाकायी॥ ऐसाआत्माईश्वरपाहीं॥ बोलेन
वाईउद्धवासी॥२४॥ तोचिआत्मातूंतत्वता॥ नित्यमुक्तपरमार्थता॥ असोनिशिष्या
देहात्मता॥ धरिकाअहंताअनात्मत्वीं॥२५॥ ॥आशंका॥ तंवशिष्यह्मणेस्वामी
॥तोचिईश्वरआत्माकैसामी॥ परतंत्रअसेंमीअल्पकर्मी॥ अतुळपराक्रमीईश्वरतो
॥२६॥ तरीजीवेश्वरासीसमान॥ अद्वैतबोलताकैसेंवचन॥ येआशंकेसिउत्तरपूर्ण॥
ऐकसावधानशिष्यातूं॥२७॥ अगाहेमिथ्याभेदभान॥ जीवेश्वरींभासेजाण॥माया
अविद्याउपाधिकरून॥ अल्पज्ञसर्वज्ञभेददिसे॥२८॥ एकचिमायाउपाधिस्वरूप॥
असोनिदावीद्विविधरूप॥ एकपराक्रमीएकअल्प॥ दृष्टांतेंस्वल्पसांगेन॥२९॥जै
सीएकचीसर्पीण॥ दिसेमुरवपुच्छींभिन्नभिन्न॥ मुरवींविषपराक्रमगहन॥ पुच्छीं

जाणअल्पअसे॥ ३०॥ पुच्छस्पर्शेताडनहोतां॥ तरीनाशनव्हेतत्वता॥ मुखेंकरूनि
दंशकरितां॥ नाशीसर्वथाप्राणेसी॥ ३१॥ सर्पिणीदेहएकचिआपण॥ परीउभयअं
गींपराक्रमभिन्न॥ तैसीमायाहीएकचिजाण॥ द्विस्वरूपेंकरूनकार्यदावी॥ ३२॥
मायाअविद्यावचनमेळीं॥ उभयउपाधिआपणजाली॥ ईश्वरीथोरबळावली॥ जी
वींनटली अल्पत्वें॥ ३३॥ ह्मणोनिशुद्धसत्वमायोपाधिकरून॥ ईश्वरीपराक्रमदिसे
पूर्ण॥ मलिनसत्वअविद्योपाधिजाण॥ आलेंअशक्तपणजीवासी॥ ३४॥ येविष
यींप्रमाणग्रंथीं॥ श्रीविद्यारण्यमहामती॥ आचार्यपंचदशीप्रती॥ बोलिलेश्लोको
क्तीतेऐक॥ ३५॥ ॥संमतिपंचदशीश्लोक॥ सत्वशुद्धविशुद्धिभ्यांमायाविद्येचते
मते॥ मायाबिंबोवशीकृत्यतांश्यात्सर्वज्ञईश्वरः॥ ५॥ अविद्यावशगस्त्वन्यस्तद्वै
चित्र्यादनेकधा॥ मायाविद्येविहायैवमुपाधीपरजीवयोः॥ ६॥ अखंडंसच्चिदानंदं
ब्रह्मैवलक्ष्यते॥ ७॥ ॥टीका॥ सत्वशुद्ध ऽविशुद्धिज्यातिहींकरून॥ माया ऽवि
द्याद्याउभयमान्य॥ मायाजेतीतेंकरीस्वाधिन॥ बिंबसर्वज्ञईश्वरतो॥ ३६॥ प्रका-
शात्मकशुद्धसत्वगुण॥ इतरगुणासीअकलुषिकृतह्मणोन॥ त्यासीनावविशुद्ध
सत्वप्रधान॥ तेचिमायाहेखुणजाणिजे॥ ३७॥ तत्प्रतिबिंबितचिदात्मातत्वता॥ सर्व
ज्ञत्वादिगुणाधिष्ठाता॥ तोचिईश्वरसर्वथा॥ मायावशत्वताकेलीजेणें॥ ३८॥ अवि

शुद्धात्मकसत्वगुण॥ रजतमकलुषीकृतह्मणोन॥ बोलिजेमलिनसत्वप्रधान॥ अवि
द्याभिधानतीसशोभे॥ ३९॥ तत्प्रतिबिंबितअन्यच्चिदात्मता॥ तद्दृशजीवह्मणिजेतत्व
ता॥ तोतत्उपाधिवैचित्र्येंअनेकता॥ मनुष्यादितिर्यगताभासतसे॥ ४०॥एवंमाया
विद्याउपाधिकरून॥ जीवेश्वरीकथाभेदभान॥ परीस्वस्वरूपींजाण॥ अभेदपणजी
वेश्वरा॥ ४१॥ मायोपाधिईश्वरत्व॥ अविद्योपाधिजीवत्व॥ उभयनिरासीएकत्व॥
असेसमलउपाधित्यागें॥ ४२॥ जेवीघटमठउपाधिभंगता॥ ठायींचगगनासीऐक्य
ता॥ तेवीजीवेश्वरउपाधिनिरसिता॥ अद्वैतताअविरोधें॥ ४३॥ एवंजीवेश्वराचाउपा
धिजाण॥ मायाऽविद्याह्यानिरसून॥ अखंडसच्चिदानंदघन॥ महावाक्यैंकरूनल-
क्षीजे॥ ४४॥ उभयउपाधिनिरासी॥ ऐक्यहोयजीवेश्वरासी॥ ह्मणोनिशिष्यानिश्च
येसी॥ तूंभिन्ननव्हेसीईश्वरीं॥ ४५॥ उभयतांसच्चिदानंद॥ स्वरूपपूर्णत्वेंअभेद॥
तेथेंद्वैतनानाविध॥ भेदानुवादनसेची॥ ४६॥ ऐसाआत्मातूंचिह्न॥ नित्यमुक्तअ
सोनिपूर्ण॥ देहवर्णाश्रमादिकरून॥ मिथ्याभिमानकांधरिसी॥ ४७॥ देहादिवर्णा
श्रमासी॥ तूंवेगळासाक्षित्वेसी॥ हेचिश्रीअष्टावक्रतुजसी॥ वदतीत्यावचनासी
ऐकावें॥ ४८॥ ॥संमतिअष्टावक्रश्लोक॥ नत्वंविप्रादिकोवर्णानाश्रमीनाक्षगो
चरः॥ असंगोसिनिराकारेविश्वसाक्षीसुखीभव॥७॥ ॥टीका॥ नव्हेसीविप्रादि

कवर्ण॥ ब्रह्मचर्यादिआश्रमीजाण॥ यावेगळाविलक्षण॥ विश्वसंपूर्णसाक्षीतूं॥४९॥
वर्णाश्रमादिदेहासी॥ अक्षिगोचरत्वअसेत्यासी॥ निराकारतूंपरियेसी॥ गोचरअ
क्षिसीनव्हेसिगा॥५०॥ नामरूपवर्णव्यक्ती॥ जेजेअकारवंतअसती॥ त्यांसीचइं
द्रियें ग्रहणकरिती॥ परिआत्मात्यांभतीयाद्यनव्हे॥५१॥ तोचिआत्मातूंनिश्चित॥
असंगसर्वोपाधिरहित॥ ऐसेंजाणोनियांत्वरित॥ सुखानंदयुक्तहोयतूं॥५२॥ ऐ
सेंचिशिष्यातुजप्रती॥ संतविद्वत्बोलती॥ त्याहीऐकेंसंमति॥ निश्चयेचित्तींबा
णावया॥५३॥ ॥संमतिशिवरामस्वामीश्लोक॥ ब्रह्मक्षत्रियवैश्यशूद्रनव्हसी
तूंब्रह्मचारीगृही॥ वानप्रस्थयतीउपाधिकचतुर्वर्णाश्रमादीकही॥ बारेनाढळसीम
नादिकरणासाक्षीजगाचायया॥ तूंनिःसंगनिराकृतिसमजुनिराहेसुखीतातया
॥७॥ ॥संमतिश्रीअच्युतरावजीश्लोक॥ तूंवर्णाश्रमदेहादिसर्वदृश्यविलक्षण॥
तत्साक्षीत्वेंनिराकारअसंगसुखिहोसदा॥७॥ ॥इत्यादिवचनेंबहुतअसती॥
असंगअदृश्यनिराकृती॥ वर्णाश्रमादिदेहाप्रती॥ साक्षीनिश्चितीशिष्यातूं॥५४
देहेंद्रियबुध्यादिजाणता॥ सर्वतूंऐसेविचारिता॥ जीवत्वहरपोनितत्वता॥ होयभा
सतासाक्षीची॥५५॥ अगाभासह्मणणें हेवाचारंभण॥ आत्मासनित्योपलब्धभा
पण॥ अभासकधींहीनसेजाण॥ भासंपूर्णसर्वदा॥५६॥ परिअज्ञानभ्रमेंनेणसी

प्राप्तची अप्राप्त मानिसी ॥ जेवी कंठस्थ भूषणासी ॥ बाह्य पहासी गृहद्वारीं ॥ ५७ ॥ भ्र
मगेलिया मागुती ॥ स्वकंठींचवस्तु प्राप्ती ॥ येचि विषयीं श्रीवसिष्टोक्ती ॥ ऐकसंमती
वासिष्ट ॥ ५८ ॥ ॥ संमतिवासिष्ठश्लोक ॥ स्वकंठेपिस्थितंवस्तुयथानप्राप्यतेभ्रमा
त् ॥ भ्रमांतेप्राप्यतेतद्वदात्मापिगुरुवाक्यतः ॥ ८ ॥ ॥ टीका ॥ स्वकंठाचेठायीनेणोन ॥
वस्तुसी पहावयालागुन ॥ इतातिताधांवेआपण ॥ अतिउद्विग्नभ्रमास्तव ॥ ५९ ॥ तेचि
कोणीएकेदाविता ॥ भ्रमदूरहोयसर्वथा ॥ स्वकंठींचवस्तुप्राप्तता ॥ तेवी आत्मातत्वता
गुरुवाक्यें ॥ ६० ॥ अविद्याभ्रांतिमुळेंजाण ॥ कदानसमजेमीकोण ॥ तीजातांगुरुवाक्यें
करून ॥ प्राप्तआपणआपणासी ॥ ६१ ॥ कंठस्थवस्तुआणिप्राप्तनर ॥ दृष्टांतीदिसेपृथ
गाकार ॥ तैसानसेआत्मविचार ॥ आपणचिसाचारपूर्णब्रह्म ॥ ६२ ॥ ब्रह्मासीचब्रह्मप्रा
प्ती ॥ ऐसेंबोलेवेदश्रुती ॥ परीसद्गुरुवांचूननिश्चिती ॥ सर्वथाभ्रांतीननिरसे ॥ ६३ ॥
जरीआपणआत्मास्वतसिद्ध आहे ॥ अपरोक्षसर्वांसिजाणताहे ॥ तरीसद्गुरुवांचोनि
निश्चयें ॥ प्राप्तनोहेसहसाही ॥ ६४ ॥ अनादिअविद्यायुक्तजाण ॥ पुरुषासीआत्मवेद
न ॥ स्वतानसंभवेम्हणोन ॥ बोलेश्रीकृष्णउद्धवासी ॥ ६५ ॥ उपदेशितीतेंज्ञान ॥ ज्ञा
नीतत्वदर्शीआपण ॥ ऐसेंगीतेंतहीभगवान ॥ पार्थासिजाणबोलत ॥ ६६ ॥ येविषयीं
श्रुतीस्मृती ॥ अनेकथाप्रमाणें असती ॥ सांप्रतगुरुकृपेनिश्चिती ॥ साक्षीसर्वांप्रती

शिष्यातूं ॥६७॥ देहेंद्रियादिजाणतासकळ ॥ विचारेंपाहतांतुजनिश्चळ ॥ जीवत्वजा
ऊनअमंगळ ॥ साक्षित्वमंगळप्राप्त अइते ॥६८॥ जैसेस्वप्नस्थराज्यासीरंकपण ॥ हर
पेजागृतीसीजाण ॥ तेवीजावोनियांजीवपण ॥ साक्षीचिहूनसर्वदातूं ॥६९॥ जीवाहू
निसाक्षीपरता ॥ नसेचिगाजाणसर्वथा ॥ परिविचारनकरितांतत्वतां ॥ तेणेचिगुंतापे
डेजीवा ॥७०॥ आपुलेंसाक्षित्वनेणोनी ॥ भ्रमेंआपणाजीवत्वमानी ॥ देहादिकहीभ्र
मेंवसेनी ॥ मीचह्मणोनीबरळतसे ॥ ७१॥ जीवाहूनसाक्षीभिन्न ॥ विचारेंपाहतांन
सेजाण ॥ जीवहाचिसाक्षीपूर्ण ॥ संमतीकरून ऐकेपां ॥७२॥ अवस्थात्रयादिबुद्धि
वृत्ती ॥ जीवहासाक्षीचनिश्चिती ॥ येचविषयींभासवती ॥ श्रीलक्ष्मीपतीबोलिलेजें
॥७३॥ ॥संमतिभागवतश्लोक॥ जागृत्स्वप्नसुषुप्तंचगुणतोबुद्धिवृत्तयः ॥ तासां
विलक्षणोजीवःसाक्षित्वेनविनिश्चितः ॥९॥ सत्वाज्जागरणंविद्याद्रजसास्वप्नमादि
शेत् ॥ प्रस्वापंतमसाजंतोस्तुरीयंत्रिषुसंततं ॥१०॥ ॥टीका॥ जागृत्स्वप्नसुषुप्ती
॥त्रिगुणेंकरूनगातीनवृत्ती ॥ त्यासर्वअसतीबुद्धिमती ॥ जीवनिश्चितीविलक्षण ॥
॥७४॥ तरीकोण्यागुणात्रीकवणअवस्था ॥ तेहीऐकावीतत्वता ॥ सत्वापासूनजा
गरता ॥ दिसेस्वप्नतारजेंकरून ॥ ७५॥ तमेंकरूनसुषुप्तावस्था ॥ ऐशाहीन्हीगु
णीच्यामाथा ॥ जीवासीनसतीसर्वथा ॥ तोसाक्षीतत्वतातुरीय ॥७६॥ मीजागता

सुखीनिद्रेप्रती॥ म्यांचिदेखिलीस्वप्नावांती॥ ऐसाचिठायींचिद्घनमूर्ती॥ साक्षित्वें
निश्चितीवेगळाची॥७७॥ जीवअवस्थात्रयगुणरहित॥ सर्वोपाधिविनिर्मुक्त॥ ऐ
सेंचिश्रीएकनाथा॥ बोलिलेमातऐकतेही॥७८॥ एकादशाचेटीकेप्रती॥ वदलेश्री
मद्भागवतीं॥ जीवहासाक्षित्वेंनिश्चिती॥ नेहीसंमतीअवधारी॥७९॥ ॥संमतिएक
नाथओव्या॥ ॥तीन्हीगुणांच्यातीनवृत्ती॥ सत्वगुणाचीजागृती॥ रजोगुणेंस्वप्नप्रा
प्ती॥ केवळसुषुप्तीनमाची॥१॥ह्यातीन्हीअवस्थापाही॥ दृढजडल्याबुद्धीच्याठायीं
॥जीवासियांचासंबंधनाहीं॥ तोवेगळापाहीसाक्षित्वें॥२॥ जीवअवस्थांचाअभिमा
नी॥ हेहीनघडेजीवालागुनी॥ विश्वप्राज्ञतैजसतीन्ही॥ अवस्थाभिमानीहेतिहीं
॥३॥ जोजेअवस्थेचाअभिमानी॥ तोअवस्थेसवेंजायनिमोनी॥ जीववेगळासाक्षी
पणी॥ अवस्थाभिमानीतोनव्हे॥४॥ देहातीतगुणातीत॥ तीही अवस्थाअतीत॥
द्रष्टासाक्षीनिश्चित॥ जाणयेथतोजीव॥५॥ अवस्थाभिमाननाहींजीविता॥ त
रीकोणभोगीतीन्हीअवस्था॥ मीनिजलोंमीजागता॥ म्यास्वप्नावस्थादेखिली॥
॥६॥ऐसाप्रत्यक्षअनुभव॥ स्वयेंबोलताहेजीव॥ अवस्थादिकाहूनसर्व॥ वेगळा
स्वप्नावजीवाचा॥७॥ एवंअवस्थात्रयीसंतत॥ जीवहासाक्षीनिश्चित॥ त्यासीन्यू
र्यबोलिजेत॥ ऐकसंमतपुन्हातेची॥८॥ ॥संमति॥ जेतिन्हीअवस्थांत॥ अनो

नव्हेअवस्थाभूत॥ जेंनिर्गुणनिजनित्य॥त्यातेंचह्मणततुरीय॥९॥जेवी पुत्रत्वेंनि
जालेंपणें॥पुरुषेंपितादेंनांवपावणें॥तेवीतिहींअवस्थागुणें॥ तुरीयह्मणणेंवस्तूसी
॥१०॥ वस्तुबरीअवस्थाभासे॥ भासलीअवस्थासवेंचिनासे॥त्यानाशामाजीवे
स्तुननाशे॥उरेअविनाशेंतुरीय॥११॥ ॥हेचिकळावयादृढज्ञान॥श्रीशंकराचा
र्यादिकरून॥बोलिलेजेविद्वज्जन॥तेंहीनिरूपणअवधारी॥८०॥ ॥संमतिशंक
राचार्यअपरोक्षानुभूतिश्लोक॥ स्वप्नोजागरणेनास्तिस्वप्नेजागर्तिनहि॥द्वयमे
वलयेनास्तिलयोपिद्वयोर्नहि॥११॥ द्वयमेवभवेन्मिथ्यागुणत्रयविनिर्मितं॥अ
स्यद्रष्टागुणातीतोह्येकोनित्यश्चिदात्मकः॥१२॥ ॥टीका॥ स्वप्नजागराचेठायींन
से॥जागरहीस्वप्नाचेठायींनदिसे॥लयाचेठायींद्वयहीनभासे॥लयहीलोपतसेउ-
भयठायीं॥८१॥तीन्हीमिथ्याचिर्गुणनिर्मित॥याचाद्रष्टागुणातीत॥आत्माचिदा
कारएकनित्य॥असेनांदतसर्वदा॥८२॥ ॥संमतिउद्धवचिद्घनश्लोक॥ विनिर्मितं
गुणतीन्हीत्रयातें॥देखेंजसेंस्वप्नचरित्रयातें॥द्रष्टागुणातीतगुणादिसाचा॥आत्मा
चिदाकारअनादिसाचा॥१३॥ ऐसाआत्मासर्वदापूर्ण॥तोतूंशिष्याज्ञानघन॥
असोनिमिथ्याजीवपणें॥कायह्मणोनिमानिसी॥८३॥टाकोनियांराजचिन्ह॥कां
मानावेंरंकपण॥स्वतसिद्धव्याघ्रअसोन॥अजत्वआपणकांध्यावें॥८४॥जेवी

विसरोनिब्राह्मणत्व॥ स्वभींमानिजेशूद्रत्व॥ तेवीविसरोनिसच्चिदत्व॥ मिथ्याजीव
त्वमानिसीतूं॥८५॥ जीवनिश्चयेंब्रह्मपूर्ण॥ जीवत्वभ्रांतिमिथ्याजाण॥ हेंअनेकसंम
तिमुरवेंकरून॥ ऐकनिरूपणजीवविषयीं॥८६॥ ॥संमतिवासिष्टश्लोक॥ स्वम
हत्वंयथोपेक्ष्यकश्चिद्विप्रोदुरिहया॥ आंगीकरोतिशूद्रत्वंतथाजीवत्वमीश्वरः॥१४
टीका॥ ॥कोणीएकब्राह्मणवर॥ आपुलेंमहत्वपरमथोर॥ उपेक्षूनिभ्रांतिपर॥ शू
द्रचिपरीशूद्रमीह्मणे॥८७॥ दुष्टइच्छाजीतिणेंकरून॥ नीचत्वश्रेष्ठेंअवलंबून॥ ब्राह्मण
त्वातेंउपेक्षून॥ शूद्रत्वआपणअंगिकारी॥८८॥ तेवीआपुलेंईश्वरपण॥ ब्रह्मत्वविस
रोनियांपूर्ण॥ मृषामानीजीवपण॥ दृश्याभिमानधरोनी॥८९॥ ॥संमतिज्ञानेश्व
री॥ ॥कांनिद्राभरेंबहुवें॥ रायाआपणपेठाउवेंनव्हे॥ मगस्वभ्रींच्यामावें॥ रंकपणी
कां॥१॥ तैसेंआपुलेनिंविसरें॥ चैतन्यचीअहंकारें॥ आभासोनिअविष्करें॥ देहपणें
जें॥२॥ जयाविचाराच्यादेशी॥ प्रसिद्धिगाजीवएशी॥ जेणेंभाषकेलीदेहसी॥ अघ
वाविषीं॥३॥ पेप्रकृतिकरीकर्मे॥ तेंम्यांकेलींह्मणेत्रमें॥ येथकर्तायेणेंनामें॥ बोलि
जेजीवू॥४॥ परिदेहअभिमानभुली॥ जयाचीबुद्धिदेहचि आतली॥ जयाआत्मवि
षयीजाली॥ मध्यरात्रीं॥५॥ जेणेंचैतन्याईश्वराब्रह्मा॥ देहचिकेलीपरमसीमा॥
तयाआत्माकर्ताहाप्रेमा॥ अलोटउपजे॥६॥ आणिआत्माचिकर्ता॥ हाहीनिश्चये

नाहींतत्वता ॥ देहोचिमीकर्मकर्ता ॥ मानीतसाचे ॥ ७॥ जोआत्मामीकर्मातीतु ॥ सर्व
कर्मासाक्षिभूतु ॥ हेआपुलीकहिमातु ॥ नाइकेचिकानीं ॥ ८॥ देखेंपुढिलाचेंवोझें ॥
जरीआपुलामाथाघेइजे ॥ तरीसांगेकोनदाटिजें ॥ धनुर्धरा ॥ ९॥ तैसींशरीरेंशरीरक
र्मे ॥ जियेंनिफजतिप्रकृतिधर्मे ॥ तेंमूर्खमतिभ्रमें ॥ मीकर्ताह्मणे ॥ १०॥ तेणेंदेहात्म
दृष्टिमुळें ॥ आत्माघाषेदेहाचेंजाळें ॥ जैसाआभाळाचावेगुकोल्हे ॥ चंद्रीमानी ॥ ११॥
तैसाशास्त्रागुरूचेनिनावें ॥ जोवाराहिटेकोनेदीशिवें ॥ केवळमौळ्याचेनिजीवें ॥ ज्या
लाजो ॥ १२॥ अगानिद्रिताचेवोनये ॥ नवस्वप्नसाचहोलाहे ॥ दोरीनेणतांसापेविहे
॥ इत्यादिउक्तहेज्ञानेश्वरी ॥ १३॥ ॥ संमतिएकनाथ ॥ राजाजाल्यानिद्रेअधीन ॥
तोस्वप्नींरंकहोयआपण ॥ तेवीप्रकृतिस्तवजाण ॥ जीवपणआभासें ॥ १॥ आपण
चराजाआहे ॥ हेत्याचेंत्यासिठाउकेंनव्हे ॥ तैसेंजीवासिहीहोय ॥ पूर्णत्वस्वयेंस्मरेना
॥ २॥ नित्यशुद्धमुक्तजाण ॥ जीवाचेंस्वरूपचैतन्यघन ॥ त्यासीअभिमानेंहेंजाण ॥
मिथ्याबंधनलाविलें ॥ ३॥ विषयीस्ववळल्याअभिमान ॥ देहादिकाचेंदृढबंधन ॥ जी
वासिलागलेंअतिकठिण ॥ परमदारूणदुस्तर ॥ ४॥ ऐसेंअशक्तहेंशरीर ॥ तेंभ्रमेंक
ल्पोनिसाकार ॥ आपणअसोनिनिर्विकार ॥ भ्रमेंशरीर आपणमानी ॥ ५॥ मनस्था
देहाचेविकार ॥ ते आपुलेचमानीसाचार ॥ अंधपंगुमीकुष्ठीनर ॥ स्वरूपस्फुरदमीस्व

ता॥ ६॥ मीकाळा गोरा सांवळा॥ मीसज्ञानत्वें आगळा॥ माझी उत्तमपवित्रलीला
॥ मीकुळेआगळा सकुलीन॥ ७॥ प्रकृतीचेंकर्मआपुलेमाथा॥ घेवोनिनाचेअहंमम
ता॥ तेणें अभिमानें दृढबद्धता॥ अकल्पाता अनिवार॥ ८॥ तळीमांडोनिकाजळा॥
वरीढिलास्फटिकसोज्वळा॥ श्वेततालोपोनिदिसेकाळा॥ तेवीअंधळाजीवझा
ला॥ ९॥ जोनकरितांचोरी॥ मीचोरम्हणवीराजद्वारी॥ तोमारिजेलाहाणथोरी॥ ते
सीपरीजडजीवा॥ १०॥ जोदेहातीतवस्तुता॥ जोगुणकर्मांचाअकर्ता॥ तोम्हणे-
मीदेहमीकर्मकर्ता॥ अहंममताभूलला॥ ११॥ लोहघडुनिअग्निनघडता॥ कर्मकरू
नजीवअकर्ता॥ तरीवृत्तिसंगेंतादात्म्यता॥ अहंकर्ताहेमानी॥ १२॥ तेथेंवेदोक्तवि
धिविधान॥ जीवाअंगींआदळेजाण॥ जंवनव्हेब्रह्मज्ञान॥ तंवस्वधर्माचरणकरा
वें॥ १३॥ राजाराजपदींजागानव्हे॥ तंवरंकक्रियात्यासिसंभवे॥ तेवीब्रह्मज्ञानजंव
नव्हे॥ तंवसर्वकरावेस्वधर्म॥ १४॥ ॥आशंका॥ नाहोज्ञानअप्राप्तिकर्मकरवें॥
प्राप्तियथेष्टाचरणसंभवे॥ तरीऐसेंनव्हेगाबरवें॥ उत्तरऐकावेंयेविषयीं॥ १५॥अ
गालोकसंग्रहार्थ॥ कर्मआचरावेंनटवत॥ हरीसद्गुरुभजनयुक्त॥ यावद्देहपातअसा
वें॥ १६॥ लोकसंग्रहमेवापिऐसी॥ संपश्यन्कर्तुमर्हसि॥ हेभगवद्उक्तिगीतेसी॥सां
गेपार्थासीजगद्गुरु॥ १७॥ सांप्रतअसोहेंनिरूपण॥ जीवासिराजदृष्टांतेंकरून॥ व

दतीएकनाथआपण॥तेचिअनुसंधानपरिसावें॥ १८ ॥ ॥एकनाथीओव्या॥ ॥
राजाराजपदींजागाझाला॥तोभीकल्पणतांचिलाजीला॥तेवींब्रह्मज्ञानजोपावला
॥तोभीकर्तायाबोलानबोलेकदा॥ १ ॥जैसेंरायासीमिथ्यारंकपण॥तेवीपरमात्म्या
सिजीवपण॥इत्यादिएकनाथोक्तिजाण॥जीवहाचिहुनभ्रांतिनाशें॥ २ ॥ ॥सं.
मतिरंगनाथ॥ ॥अगासर्वहिब्रह्मचिअसे॥जीवतोहीब्रह्मत्वींचवसे॥परीनाथि
लेंजीवत्वघेऊनिबैसे॥आणिपिसेंनेणपणाचें॥१॥जैसाउत्तमउत्तमत्वातेंटाकुनी॥
भ्रमेंअधमत्वआपणामानी॥संन्यासिअंत्यजहोयस्वभीं॥नाठवीमनींउत्तमत्व॥
॥२॥तैसास्वयेंब्रह्मअसोनी॥भ्रमेंआपणाजीवत्वआणी॥तेणेंभ्रंसेस्वरूपापासु
नी॥शोच्यसर्वगुणीजीवपणें॥३॥हाअज्ञानकृतजीवटवाळ॥आपणानेणोनिशु
द्धनिर्मळ॥होतोसुखदुःखेंविव्हळ॥अतितळमळशोच्यत्वें॥ ४॥यालागींआपणचि
आत्माअसें॥तेंनेणोनिअंगींजीवपणाचेंपिसें॥अविचारेंअरंबळतअसे॥विचारेंव
सेंस्वस्वरूपीं॥५॥ ॥ एवंरंगनाथवचनार्थी॥जीवहाब्रह्मचीनिश्चिती॥
श्रीशंकराचार्यादिग्रंथोंक्तीं॥ऐशाचिवदंतीत्याऐकें॥ १९ ॥ ॥संमतिअपरोक्षानु
भूतिश्लोक॥ यद्वन्मृदिघटभ्रांतिश्चक्तौवारजतस्थितिः॥तद्वद्ब्रह्मणिजीवत्वं
क्षमाणेचनश्यति॥१५॥यथामृदिघटोनामकनकेकुंडलाभिधा॥शुक्तौरजतं

ख्यातिर्जीवशब्दस्तथापरे॥१६॥ ॥संमतिआत्मबोध॥ ॥स्थाणौपुरुषवद्भ्रांत्या
कृताब्रह्मणिजीवता॥ जीवस्यतात्विकेरूपेतस्मिन्दृष्टेनिवर्तते॥१७॥ रज्जुसर्पवदा
त्मानंजीवोज्ञात्वाभयंवहेत्॥ नाहंजीवःपरात्मेतिज्ञातश्चेन्निर्भयोभवेत्॥१८॥ स्व
ल्पमप्यंतरंकृत्वाजीवात्मपरमात्मनोः॥ यस्तिष्ठतिविमूढात्माभयंतस्याभिभाषितं
॥१९॥ यत्राज्ञानाद्भवेद्वैतमितरंतत्रपश्यति॥ आत्मत्वेनतदासर्वंनेतरंतत्रचाण्वपि
॥२०॥चैतन्यस्यैकरूपत्वाद्भेदायुक्तोनकर्हिचित्॥ जीवत्वंचमृषाज्ञेयंरज्वांसर्पभ्र
मोयथा॥२१॥ब्रह्मसत्यंजगन्मिथ्याजीवोब्रह्मैवनापरः॥ अनेनवेद्यंसच्छास्त्रमि
तिवेदांतडिंडिमा॥२२॥ अहंसाक्षीतियोविंद्याद्विविच्चैवंपुनःपुनः॥ सएवमुक्तोसो
विद्वानितिवेदांतडिंडिमा॥२३॥ ॥संमतिअध्यात्मरामायण॥ ॥रज्वामहिरि
वात्मानंजीवोज्ञात्वाभयंवहेत्॥ परात्माहमितिज्ञात्वाभयदुःखैर्विमुच्यते॥२४
॥टीका॥ सर्वगतजेंब्रह्मरूप॥ तेथेंजीवत्वआरोप॥ नसेचिहामृषाजल्प॥ दृष्टांत
स्वल्पएकसांगों॥ २०॥जैसीमृत्तिकेचेठायीं॥ घटभ्रांतिभासेपाहीं॥किंवाशुक्ती
चेठायींरौप्यताही॥तेवीजीवहाहीब्रह्मरूपीं॥ २१॥सत्यमृदिशुक्तिविचारयुक्त
॥पाहातांमृषाघटरजत॥ तेवीब्रह्मींशोधितांजीवित॥ हरपेनिजातत्स्वरूपीं॥२२
मृदिसनामकमंडल॥ कींकनकासिह्मणतीकुंडल॥ शक्तिसरौप्यभासेंफोल॥

तेवीजीवत्वबोलब्रह्मासी॥ २३॥ जैसास्तंभाचेठायींभ्रांतिकृत॥ जेवींचोरसा
दिसत॥तैसाजीवहानिश्चित॥ब्रह्मींभासतभ्रमयोगें॥ २४॥ दीपेंचोरपाहूंजा
तां॥ जेवींस्तंभचिलागेहाता॥तेवीगुरुकृपेजीवशब्दता॥ हरपोनिआइताब्रह्म
रूप॥ २५॥ जैसा रज्जुसअहिमानुनी॥भयपाविजेभ्रमेंकरूनी॥तैसाआत्म्या
सजीवह्मणुनी॥कष्टिजेमनींबहुकाळ॥ २६॥सर्पनव्हेहादोर॥ चोळखतांभयहो
यदूर॥ तैसाजीवनव्हेमीपरात्पर॥जाणतांसाचारनिर्भयत्व॥ २७॥ जीवआणिपर
मात्म्यासी॥स्वल्पहीअंतरमानसीं॥मानीतोचिमौर्ख्यरासी॥भयतयासीश्रुतिबो
ले॥ २८॥ आत्म्यासिअज्ञानास्तवनेणती॥तेइतरद्वैततेथेंदरवती॥ जेआत्मत्वें
करूनसर्वपाहती॥अणुहित्याप्रतीद्वैतनदिसे॥२९॥ जैसेंघळयीचेंनीर॥सकळ
भुवनींअपार॥व्यापोनिराहेसत्वर॥रितेंअणुमात्रस्थळनुरवी॥ ३०॥ तैसाआ
त्मयाहूनितत्वता॥ अणुभरिठावनदिसेरिता॥तेथेंजीवचिभिन्नता॥होयराहता
कवणेस्थळीं॥ ३१॥ ह्मणोनएकरसचैतन्यीं॥नसेचिहेभेदकाहाणी॥जीवत्वआ
त्मयाभ्रमेंकरूनी॥मृषारज्जुपणीसर्पजैसा॥ ३२॥जगमिथ्याब्रह्मसत्य॥जीवहा
साक्षीब्रह्मनिश्चित॥ऐसेंसच्छास्त्रेंजाणिजेत॥हीचवेदांतडिंडिमा॥ ३३॥निश्च
येंपुनःपुनःविवरितो॥मीसाक्षीहेंदृढजाणतो॥मुक्तविद्वानह्मणिजेतो॥वेदांति

जतोनगाराहा॥३४॥गुरुशास्त्रद्वारेंतत्वता॥मीपरमात्माजीवेंजाणता॥भयदुःखा
पासोनिमुक्तता॥होयसर्वथासाक्षित्वीं॥३५॥इत्यादिसंमतान्वयेंकरूनी॥हेंचक
थिलेंयानिरूपणी॥जीवत्वमिथ्यातुजलागुनी॥साक्षीभरंवसेनीशिष्यातूं॥३६॥ऐसें
जेंकासाक्षीस्वरूप॥तेंज्ञानचिशिष्यातूंअरूप॥सर्वदाहीसत्तारूप॥नधेरीविकल्पये
विषयीं॥३७॥अवस्थात्रयीज्ञानअभिन्न॥हेंचिमागेदृढस्थापन॥केलेंतेंचिप्रका-
शघन॥ज्ञानचैतन्यस्वरूपतुझें॥३८॥एकेदिवशींस्थानत्रयी॥संवित्ज्ञानअभे
दपाही॥तैसेचिअसेदिनांतरींही॥संमतान्वयीश्रवणकीजे॥३९॥ ॥संमतिपंचदशी
श्लोक॥ मासाह्नयुगकल्पेषुगतागम्येष्वनेकधा॥नोदेतिनास्तमेत्येकासंविदेषास्व
यंप्रभा॥२५॥स्वयंज्योतिर्भवत्येषःपुरास्माद्वासतेखिलात्॥तमेवभांतमन्वेतिततद्भा
साभास्यतेजगत्॥२६॥ ॥संमतिवाक्यसुधाश्लोक॥ नोदेतिनास्तमायातिनचृ
द्धिंयातिनक्षयं॥स्वयंविभात्यथान्यानिभासयेत्साधनंविना॥२७॥ ॥टीका॥
ऐकेचिदिवशींअभिन्न॥अवस्थात्रयीअसेज्ञान॥तैसेचिदिनांतरींहीजाण॥असे
चिहूनभेदरहित॥४०॥तैसेचिअतीतअनागत॥चैत्रादिमासजेयेतजात॥त्याचे
ठायींहीनिश्चित॥ज्ञाननांदतअभेदत्वें॥४१॥तैसेचिवर्षादिकाचेठायीं॥नेचिरुता
युगादिकांही॥ब्रह्मकल्पादिकींपाही॥असेसर्वदाही अभेदज्ञान॥४२॥ ॥नोदेति॥

अद्वैतजेकाज्ञानदीसी॥ भासमानजेसंविती॥ तीसउदयअस्तादिभासी॥कदाकल्पांतीन
सेची॥ ४३ ॥विश्वउदयसंहरण॥स्वयेंजाणेसंविद आपण॥सर्वसाक्षीज्ञानघन॥ती
ससाक्षीअन्यसहसानसे॥ ४४ ॥ज्ञानअसाक्षीतेसंविती॥ तीसअन्यसाक्षीन-
सेनिश्चिती॥सर्वांसिहीप्रकाशकर्ती॥चिल्कळाजाणतीसर्वतेची॥४५॥ ॥आशंका
॥ नाहोइयेसंवितीसितत्वतां॥ आणिकनसेग्रहणकर्ता॥ तरीजगदाध्यप्रसंगता॥
दिसेसर्वथायेथेंही॥४६॥उत्तरइये आशंकेसी॥सावधानगापरियेसी॥जगदा
ध्यप्रसंगनिश्चयेसी॥स्वप्रकाशींनघडेची॥४७॥एषःस्वयंप्रभेनिः॥ ॥हेजे
बोलिलीसंविती॥ तेभासमानस्वप्रभनिश्चिती॥ भासकसर्वजगाप्रती॥ जगदाध्य
स्थितीघडेकैसी॥४८॥स्वयंज्योतिअधिष्टान॥तेथेंचि अखिलजगद्भान॥तद्भा
सेंपावेशोभन॥जडसंपूर्णवियदादि॥४९॥अनेकश्रुतिकरितीघोष॥आत्मा
बोलतीस्वयंप्रकाश॥तत्प्रकाशेंसर्वांस॥होयप्रकाशसकळजगीं॥५०॥हीप्र
त्यगात्मसंवित॥सर्वकाळींप्रकाशवंत॥ईसउदयआणिअस्त॥नसेआद्यंतसह
साक्षी॥ ५१ ॥संवितीसपूर्वीनसेअभाव॥ह्मणोनिमिथ्याउदयनांव॥उदयअ
भावेंअस्तासिठाव॥नसेसद्भावसदोदित॥ ५२ ॥सर्वदाएकरूपह्मणोन॥ते
पावेवृद्धिनव्हेक्षीण॥स्वयंप्रकाशमान असोन॥ब्रह्मादिअन्यप्रकाशी॥

अगादीपप्रकाशाऐसे॥ अन्यसापेक्षइचाप्रकाशनसे॥स्वयेंनिरपेक्षस्वप्रकाशें
॥प्रकाशितअसेजडसर्व॥ ५४॥ अन्यसाधनआत्म्यासिनसतां॥स्वप्रकाशेंप्र
काशिता॥ होयजगाजेवींसविता॥ प्रकाशीसमस्तानिरपेक्ष॥ ५५॥ इत्यादिसंम
तिश्लोकेंकरून॥ हेंचकेलेंनिरूपण॥सर्वकाळींहिविद्यमान॥ असेज्ञानघनसंवि
दात्मा॥५६॥ ॥आशंका॥ नाहोस्वप्रकाशआत्माबोलिलासे॥परीयासिसा
क्षीअन्यकांनसे॥ मनबुत्ध्यादिआत्माजाणतसे॥ तैसाआत्म्यासिकांनसेजाण
तादुजा॥५७॥ऐसीयासंदेहतमासी॥ नाशकउत्तरपरियेसी॥ अगासाक्षीदुजा
असलियासी॥ दृश्यत्वआत्म्यासीयेईलपे॥ ५८॥ साक्षीजरीअन्यनसता॥ ब
ळेंचिमानिसीअनुमानता॥ तरीअतिप्रसंगाऽनवस्था॥ दोषघडतापेहोय॥ ५९
साक्षीचेताज्ञानघन॥ आत्माचिजाणतासर्वआपण॥ ऐसेंअनेकश्रुतिभाषण
॥जाणताअन्यत्यासीनसे॥ ६०॥ तोचिआत्मातुजहून॥शिष्यापरोक्षनसेभि
न्न॥सर्वदाअपरोक्षअभिन्न॥ तूंचिज्ञानघनसर्वसाक्षी॥ ६१॥सर्वसाक्षीदृश्य
जाणता॥ आत्मारामतूंतत्वता॥ तुजहूनअन्यकोणता॥समर्थज्ञातविचारी॥
॥६२॥ तेस्थूळदेहादिअवस्थात्रय॥विश्वादिअभिमानीभोगत्रय॥ नेत्रस्थाना
दिजडमय॥ हेतुजअप्रमेयानेणतीकदा॥ ६३॥ तूंतरीयसासर्वसी॥स्वप्रका-

शेंजाणतअससी॥ ह्मणोनजाणतानिश्चयेसी॥ तूंचअससीसर्वद्रष्टा॥ ६४॥ सर्व
दृश्यातेंजाणता॥ तूंचिआत्मापैतत्वता॥ अन्यनसेतुजज्ञाता॥ तेंश्लोकेंश्रुत्यर्थी
परियेसी॥ ६५॥ ॥संमतिपंचदशीश्लोक॥ येनेदंजानतेसर्वंतत्केनान्येनजान
तां॥ विज्ञातारंकेनविंद्याच्छक्तंवेद्यतुसाधनं॥ २८॥ सवेत्तिवेद्यंतत्सर्वंनान्यस्त-
स्यास्तिवेदिता॥ विदिताविदिताभ्यांतत्पृथग्बोधस्वरूपकं॥ २९॥ यस्मिन्यस्मिन्न
स्तिलोकेबोधस्तत्तदुपेक्षणे॥ यद्बोधमात्रंतद्ब्रह्मेत्येवंधीर्ब्रह्मनिश्चयः॥ ३०॥ ॥
टीका॥ येनेदमिति॥ साक्षीआत्माजोतेणेंसर्वही॥ दृश्यजातजाणिजेपाही
॥यासीअन्यजडेंकरूनिकही॥ जाणेलकाईकोणपुरुष॥ ६६॥ दृश्यद्रष्ट्यासि
करीविषय॥ ऐसेंकधींहिनहोय॥ तरीयावाक्याचेंतात्पर्य॥ अर्थान्वयऐकसांगों
॥ ६७॥विज्ञातारमिति॥ सर्वदृश्यआत्माजाणता॥ ह्मणोनविज्ञातारह्मणविजेन
त्वता॥यातेंकोणदृश्यभूतेंजडरूपता॥ जाणतीसर्वथानकोणीही॥ ६८॥ कोणी
आत्म्यासिजाणे॥ तोचिजाणतासाक्षीपणें॥ नाहोमनासितरीजाणणें॥ घडेलह्म
णणेंहेंहीनघडे॥ ६९॥ ॥शक्तमिति॥ विषयज्ञानसाधनमन॥ तेविषयाचेठा-
यींशक्तआपण॥ परीआत्माजाणावयालागुन॥ समर्थपणत्यासीनसे॥ ७०॥
मनहेंजडचीनिश्चित॥ मागेंनिरूपिलेंबहुत॥ आत्माचहेंसर्वज्ञात॥ नसेअन्यार्थ

येविषयीं ॥ ७१ ॥ अनुभवसिद्ध श्रुतिआपण ॥ बोलतीआत्म्यासिज्ञेयमन ॥ ज्ञाता
आत्माचिद्घन ॥ तोकैसाज्ञेयपणहोयतया ॥ ७२ ॥ कर्मतोचिनव्हेकर्ता ॥ तैसेज्ञेयतो
चिनव्हेज्ञाता ॥ आत्मास्वप्रकाशतत्वतां ॥ असेजाणतासर्वांसी ॥ ७३ ॥ ॥ सवेत्ती
ति ॥ ॥ सर्ववेद्यासिआत्मातो ॥ वेत्तिह्मणजेसर्वजाणतो ॥ त्याहूनिज्ञाताअन्यतो
॥ आत्म्यासिजाणतोऐसानसे ॥ ७४ ॥ प्रत्यगात्माबोधभरित ॥ हाचिजाणतानिश्चि
त ॥ यदर्थीआणिकसंमत ॥ ऐकवचनोक्तपानपात्र ॥ ७५ ॥ ॥ संमतिचूर्णिकापान
पात्र ॥ ॥ आपुल्याअज्ञानास्तव आपुलेठायींआरोपिलेते इच्छासंकल्पसंदेहा
दिकमनोवृत्तिविशेषजे ते अनेकह्मणोनदृश्यहोत ॥ त्यांतें सर्वांतें स्वगतादिभेदर
हित सच्चिदानंदरूपप्रत्यक्चैतन्यप्रकाशितें ॥ तेंदृश्यविकारानुरूपविकारी न
होतां एकरूपत्वेंचिवर्ततें ह्मणोनद्रष्टेचहोयदृश्यनव्हे १ इंद्रियास किंवा मनासद्र
ष्टेपण असतांही दृश्यत्व जसें वर्णिलें तद्वत्प्रत्यक्चैतन्यासही दृश्यत्वकां न घडे ह्म
णाल तरी द्रष्टा असेल या दृश्यत्व घडेल प्रत्यगात्मा सर्वांचा द्रष्टा, त्यासी आणिक
द्रष्टा नाहीं ह्मणोन दृश्यत्व न घडे ॥ आतां अन्य आत्मा त्याचा द्रष्टा ह्मणावा तर अ
नवस्था दोष घडतो ॥ आतां तोच प्रत्यगात्मा स्वद्रष्टा ह्मणावा तर दृश्यत्वतेंचि द्रष्टे
पण ऐसा विरोध घडतो ॥ यास्तव सर्व दृश्यातें प्रकाशून स्वप्रकाशप्रकाशमान सा-

क्षीजोत्यासदृश्यत्वनघडेहासिद्धांत॥२॥ ॥ओव्या॥ ऐसेंपानपावक्यनीं॥
हाचिसिद्धांतनिश्चयेंकरूनी॥ प्रत्यगात्माभरंवसेनी॥ साक्षीनिदानीतोचिएक॥
॥७६॥ ॥विदिताविताभ्यां॥ विदितआणिअविदित॥ त्याहूनिवेगळाबोधभरित
॥आत्मारामसदोदित॥ असेनांदतसर्वदेशीं॥७७॥ ॥आशंका॥ नाहोविदित
म्हणजेकाय॥ अविदितहेंकैसेंहोय॥ जाणावयालक्षणेंउभय॥ तोअर्थान्वयविशद
सांगा॥७८॥ तरीऐकेंगावचन॥ विदिताऽविदितलक्षण॥ विदितम्हणजेवृत्तिज्ञा
न॥ अविदितअज्ञानबोलिजे॥७९॥ प्रथमविदिताचेंनिरूपण॥ हेचिकरऊंतुज
श्रवण॥ तरीदृश्यजातजेंवृत्तिकरून॥ जाणिजेज्ञानतेंविदित॥८०॥ वृत्तिकरू
निदृश्यजात॥ जेजेविषयींकरिजेत॥ त्यासिबोलिजेज्ञानविदित॥ वृत्तियुक्तश
बलतें॥८१॥ ऐसीविदितलक्षणाची॥ खुणदारखविलीसाची॥ आतांअविदित
अज्ञानाची॥स्थितीतयाचीश्रवणकरी॥८२॥ अविदितम्हणजेअज्ञान॥ दृश्य
आवृत्तनेणिवेंकरून॥ त्यासिनाहींजाणतेंपण॥ अविदितखुणयाहेतु॥८३॥ ए
वंविदितआणिअविदित॥ज्ञानाऽज्ञानबोलिजेत॥ याहूनिपृथकबोधभरित॥
असेसदोदितज्ञाननित्य॥८४॥ ॥आशंका॥ नाहोज्ञानहिदिसेनाशवंत॥स
ज्ञानेंपटज्ञाननासत॥ तरीकैसेनित्यबोलिजेत॥ त्यासिउत्तरमस्तुऐक

अगाज्ञानमुख्यजेंअधिष्टान॥ तेंसर्वदानाशरहितआपण॥ दुसरेंवृत्तिरूपजेंज्ञान॥
दृश्यमिथ्यापणत्यासीअसे॥ ८६॥ अंतःकरणवृत्तिसहित॥ त्यासीशबल बोलिजे
त॥ अंतःकरणवृत्तिरहीत॥ शुद्ध ह्मणिजेतअविनाशें॥ ८७॥ अंतःकरणविरालिया
॥ वृत्तिज्ञानही जायलया॥ परीवृत्तिसाक्षीज्ञानात्मया॥ नाशसरवयानसेची॥ ८८
येचविषयींसंमती॥ श्रीएकनाथादिवचनोक्ती॥ ऐकेंसावधानमती॥ अज्ञानभ्रांती
नाशक॥ ८९॥ ॥संमतिएकनाथओव्या॥ जोअविकारीनिरवस्थपूर्ण॥ ज्यासिना
हींजन्ममरण॥ ऐसातूंआत्माह्मणसीकोण॥ तरीजाणसर्वज्ञज्ञानरूप॥ १॥ ह्मण-
सीज्ञानहिक्षणिकअसे॥ घटज्ञानेंपटज्ञाननिरसे॥ तेथइंद्रियार्थवृत्तिचिनासे॥ ज्ञा
नजैसेतैसेंअविनाशी॥ २॥ ॥संमतिरंगनाथ॥ चिच्छब्दें बोलिजेज्ञान॥ ज्ञानतें
चिशुद्धचैतन्य॥ दुसरेंतेंवृत्तिरूपजाणज्ञान॥ दृश्यमिथ्यापणतयासीअसे॥ १॥ येणें
वृत्तिरूपेंकरून॥ विशिष्टवाच्यांशजालेंशुद्धज्ञान॥ यात्वीकरूनलक्षणालक्षण॥ शुद्ध
ज्ञाननिवडावें॥ २॥ ऐसेंउभयसंमतिकरून॥ स्फुचिलेंअविनाशशुद्धज्ञान॥ तेचिवि
दिताऽविदिताहुन॥ पृथक्चिद्घनबोधरूप॥ ३॥ ज्ञानअज्ञानविरहित॥ शुद्धज्ञानअ
सेनित्य॥ वृत्तिभावअभावात॥ असेनांदत आढळत्वें॥ ४॥ अगावृत्तिउदयनसतां॥
जेस्वस्थअसेनिराकुलता॥ तेचिवृत्तिउदयहोतां॥ जाणेनत्वतातियेसी॥ ५॥ तोचिहो

तांवृत्तिनाश॥ ठायींचअसेस्वप्रकाश॥ वृत्तिनाशेंदृष्टुत्वास॥ टाकोनिनिराभासअचल
असे॥६॥ वृत्तिरूपजेंज्ञानाऽज्ञान॥ याहूनिभिन्नजेकाआपण॥ त्यासीचबोलिजेशुद्ध
ज्ञान॥ हेंचिप्रतिपादनपरमामृतीं॥९०॥ तेचिपरमामृतसंमत॥ ऐकेंएकाग्रकरोनिचि
त्त॥ जेणेंज्ञानाज्ञानरहित॥ ज्ञानचिसत्यविशदकेलें॥९१॥ ॥संमतिपरमामृतमुकु
दराज॥ ॥स्फूर्तीस्फुरेजेथुनी॥ तेपहिलेचअसेअस्फूतिपणी॥ मजदेखतांउमटोनी॥
मावळेस्फूर्ती॥१॥ जरीउगलाचीअसतां॥ तरीकांआठऊंस्फुरता॥ संकल्पविकल्पकरि
तां॥ कासयासी॥२॥ आठवचित्तींजोराहे॥ तेज्ञाननव्हेतरीकाय॥ ज्ञानेविणस्थिरत्वआ
हे॥ बुद्धिसीकोठें॥३॥ तेंज्ञानजरीअधिष्टान॥ तरीसंकल्पविकल्पात्मकमन॥ तेंचिज्ञान
परिपूर्ण॥ यालागींस्फुरणअसेना॥४॥ तेस्मरतांनयेस्मरण॥ स्मरणजयाचेंविस्मर
ण॥ तेज्ञाननाअज्ञान॥ ज्ञानमावजे॥५॥ कांहींवृत्तिभासभासे॥ तोस्फुरतांचिंतया
दिसे॥ परिस्वतांआपणअसे॥ निराभास॥६॥ तेंनिराभासह्मणावयाकवण॥ ते-
चिंतयाअसेजाण॥ जाणीवहीजिरऊन॥ अंगीच्याअंगीं॥७॥ यालागींजाणीवना
नेणीव॥ भावनाअभाव॥ तेचिंतेंस्वयंमेव॥ स्वस्वरूप॥८॥ जाणिवानेणिवा॥ ना
तळेदोहीभावा॥ आधीचअसेतोजाणावा॥ स्वरूपानंदु॥९॥ जाणिवानेणिवा॥
यादोहींविरहितभावा॥ दोहींबीजावोलावा॥ विस्तारितोजो॥१०॥ कांहींचनस्फुर

तांआधी॥ जेस्वस्थअसेअनादी॥ तेज्ञानाचीआदी॥ ज्ञप्तिमात्र॥ ११॥ जेनिष्कळंक
ज्ञानघनानंद॥ आपणचिआपणस्वतसिद्ध॥ निजस्वरूपविशुद्ध॥ स्वसंवेद्य॥ १२॥ तें
आपणचीआपण॥ अविनाशपरिपूर्ण॥ ऐसेंवळखणेंपरतोन॥ स्वस्वरूप॥ १३॥ ऐ
सियासंमतिकरून॥ हेचिकेलेंदृढकथन॥ ज्ञानाऽज्ञानरहितज्ञान॥ शुद्धचैतन्ययासी॥
ह्मणिजे॥ ९२॥ तेचिअविनाशचिद्घन॥ त्याचीअपरोक्षकळावयारवुण॥ सुगमउपाय
लक्षण॥ सांगोंअवधानदेईजे॥ ९३॥ ॥यस्मिन्निति॥ ॥बोधज्ञानलोकांचेठायीं॥
ज्याज्याघटादिलक्षणविषयीं॥ आहेत्यात्याठायींसर्वही॥ उपेक्षाविषयींकरावी॥ ९४
तोघटादिविषयवृत्त्याचा॥ अनादरकरोनियांसाचा॥ अवशिष्टउरेजोवृत्त्याचा॥ सा-
क्षीसर्वांचाबोधशुद्ध॥ ९५॥ तोचिकेवळबोधमात्र॥ अपरोक्षस्फुरणचिन्मात्र॥ अ
नस्यूतअसेसर्वत्र॥ जाणणेंएकत्वबुद्धिकरूनी॥ ९६॥ हाचिब्रह्मनिश्चयशुद्ध॥ शुद्धि
सीबोलिजेब्रह्मावबोध॥ ऐसाश्लोकार्थसंवाद॥ केलाअनुवादयेथवरी॥ ९७॥ आ-
त्माज्ञानघनस्वप्रकाश॥ सर्वथानसेअप्रकाश॥ ऐसाचिनिर्णयश्रुतिस्मृतीस॥ असे
अनुभवासतत्वज्ञा॥ ९८॥ त्याचेभासेसर्वशोभत॥ तेचिज्योतिची ज्योतिनिश्चित॥
साक्षीचेताज्ञान अनंत॥ श्रुतिबोलत बहुऐशा॥ ९९॥ ऐशाचस्मृतिहीबहुत॥ बोल
तीयदादित्यादिगत॥ अखिलचंद्राग्निदीप्तिमंत॥ तेजमामकनिश्चितहरिह्मणे॥ १००

एकतूं आत्मापुरुषपुराणसत्य॥ स्वयंज्योति अनंतआद्यनित्य॥ अक्षरअजस्रसु
खनिरंजनाद्वैत॥ पूर्णउपाधिमुक्त अमृतेत्यादि॥१०१॥ ऐशाअनेकश्रुतिस्मृती॥ भा
गवतगीतादिपुराणोक्ती॥ सर्वहीसिद्धांत बोलती॥ ज्ञानघनज्योतीआत्मरूप॥१०२
एवंइत्यादिनिरूपणांत॥ हाचिकेलागासिद्धांत॥ अभेदज्ञानात्मानाशरहित॥ तो
चिनिश्चितशिष्यातूं॥१०३॥ इतिश्रीस्वात्मबोधग्रंथ॥ श्रवणेंपावनकरीयथार्थ॥
श्रीरघुनाथचरणींअध्यायसूनिश्चित॥ मौनीस्थापितचतुर्थहा॥ १०४॥

॥ ७॥ ॥ ७॥ ॥ श्रीरस्तु॥ ॥ ७॥ ॥ ७॥

श्रीगणेशायनमः॥ ॥ऐकशिष्यापरमबोध॥ सर्वगव्यापिजेअगाध॥ ज्ञानध
नज्योतिशुद्धबुद्ध॥ कैवल्यकंदसर्वगततूं॥१॥ स्वप्रकाशतूंअभेदज्ञान॥ निराकार-
चैतन्यपूर्ण॥ ओतप्रोतसमान॥ असशीव्यापूनसर्वजगा॥२॥ तेचिसर्वव्यापकत्वकै
सें॥ पुससीगाजरीऐसें॥ तरीऐकेंसावकाशें॥ सर्वहिअसेंचिदाकार॥३॥ प्रस्तुतहे
चिनिरूपण॥ तुजसांगोंविषदकरून॥ जेंऐकतांचिजगद्ज्ञान॥ हरपेसंपूर्णचिदार्ण-
वीं॥४॥ हानामरूपजगद्भास॥ यासअधिष्ठानचैतन्यांश॥ अंतर्बाह्यस्वप्रकाश॥
असेनिराभासव्यापुनी॥५॥ तेवनांतआणिजनांत॥ व्याप्तचिअसेघरदारांत॥उ
जेडआणिअंधारांत॥ असेसर्वांतचिद्घनहें॥६॥ देहेंद्रियादिव्यापारे॥ स्वरूपींचहो
तीस्वरूपाधारें॥ जेवीजळाधारेंजळचरे॥ जळींचसाचारेक्रीडती॥७॥ शरीरअव
घेंचिव्यापिलेंसे॥ परीतेंकवणानप्रकाशे॥ पदार्थमात्रींव्यापूनिअसे॥ परीगुरुविणकै
सेंअनुभवेल॥८॥ ह्मातेंपदार्थघेतांकांहीं॥ अडवेचैतन्यचिसर्वही॥ परममृदुत्वेंव्याप्त
पाही॥ सर्वांठायींसदोदित॥९॥ अत्यंतमृदुत्वेंदिसेगगन॥ परीत्याहूनि अत्यंतमृदु
चैतन्य॥ तयापरीसमृदुअन्य॥ नसेचिजाणसहसाही॥१०॥ येवढीमृदुत्वाचीथोरी
॥ परीवज्त्रादिपर्वताचेउदरीं॥ व्यापूनियांबाह्यांतरी॥ असेचराचरींएकरस॥११॥चै
तन्यधराविवरकोशीं॥ अनेकदेशविदेशीं॥ स्वर्गमृत्युपाताळासीं॥ असेसर्वांसी

व्यापुनी ॥१२॥ वैकुंठकैलासादिकरून ॥ चतुर्दशभुवनेंव्यापून ॥ एकचिअसे ज्ञानघन ॥
अद्वयनिरंजनपूर्णत्वें ॥ १३॥ जैसेंउदकजलचरातें ॥ व्यापूनिअसेसर्वांगातें ॥ तैसेंब्रह्मादि
पिपीलिकेतें ॥ चैतन्यअयीतेंव्याप्तअसे ॥ १४ ॥ सर्वदेहींस्वप्रकाश ॥ व्यापूनिअसेसाव
काश ॥ परीदेहादिकाशींहोतांनाश ॥ असेअविनाशज्ञानरूप ॥ १५ ॥ इयेपृथ्वीसचैत
न्य ॥ अंतर्बाह्यअसेव्यापून ॥ तदात्मकचीऊर्वि आपण ॥ अणुभरीभिन्नरिक्तनसे
॥ १६ ॥ पृथ्व्यादिपर्वताचेठायीं ॥ व्यापूनिसबाह्यअसेपाहीं ॥ परीनासताहेसनगउर्वी ॥
चैतन्यकदाहीनभासे ॥ १७ ॥ तैसेंचिउदकासीचैतन्य ॥ अंतर्बाह्यअसेंव्यापून ॥ समुद्रा
दिसरिताजीवन ॥ सरितेत्याहूनकिंचितनसे ॥ १८ ॥ चैतन्यउदकीं असेभरलें ॥ परीपूर
प्रवाहीकदानढळे ॥ उदकयद्यपिजरीआटलें ॥ तरीअसेसंचलेंचैतन्य ॥ १९ ॥ तैसेचि
तेजाचियेठायीं ॥ चैतन्यव्याप्तचीअसेपाहीं ॥ परीतेजाचेउष्णत्वेंकही ॥ नजळेसह
साहीचैतन्य ॥ २० ॥ तेजासिहोतांउदयनाश ॥ चैतन्यसर्वदाअविनाश ॥ तैसेंचिजाण
प्रभंजनास ॥ असेस्वप्रकाशव्यापुनी ॥ २१ ॥ परीवायुचेनिवेगें आपण ॥ कदानउडेचै
तन्य ॥ तयाचेनिलयेंकरून ॥ कदाचिद्धननाशनपवे ॥ २२ ॥ तैसेंचिचैतन्यआकाशीं ॥
व्याप्तचिअसेनिश्चयेसी ॥ परीआकाशजडशून्यत्वेंसी ॥ ज्ञानात्मयासीनेदृश्य ॥ २३
आकाशादिआत्मयापासून ॥ जाहलींअसतीउत्पन्न ॥ ह्मणोनितेनस्वरूपेण ॥ पावती

जाणयाहेतू ॥२४॥ आकाशादिकाचेउदयलयीं ॥ असेचैतन्यअक्षयी ॥ एवंसर्वभूतीं
व्याप्तपाही ॥ असेसर्वदाही चिद्ब्रह्म ॥२५॥ त्यावीणरितेंस्थळपाहतां ॥ अणुमात्रहीनसे
सर्वथा ॥ देशकालवस्तुतत्वता ॥ परीछेदतानसेतया ॥२६॥ अनंतब्रह्मांडाखालतें ॥
अनंतब्रह्मांडावरतें ॥ ओतप्रोतदशदिशांतें ॥ व्यापूनिसर्वांतेंनिष्ठत ॥२७॥ पृथिव्या
दिकींतेतिष्ठेंपाही ॥ परीपृथ्व्यादिकें त्यानजाणतीकही ॥ हेंबृहदारण्योक्तीचेठायीं ॥
श्रीयाज्ञवल्क्यांहींकथिलेंसे ॥२८॥ श्रीयाज्ञवल्क्याचार्यआपण ॥ बोलिलेउद्दालका-
सिवचन ॥ सर्वांतरींहींचैतन्य ॥ आत्माऽमृतजाणअसेची ॥२९॥ तेलिहितांसंमतिथो
र ॥ ग्रंथपावेलबहुतविस्तार ॥ परीत्यांतीलरहस्यहेंचिसार ॥ व्याप्तसर्वांतरआत्माअ
से ॥३०॥ चिदेवआत्मासकळभुवनीं ॥ व्याप्तचिअसेभरंवसेनीं ॥ ऐसेचिहेश्रीवसि
ष्ठमुनी ॥ सांगतीवचनीश्रीरामा ॥३१॥ तेंवसिष्ठरामसंभाषण ॥ श्लोकत्रयाचेंव्याख्या
न ॥ सांगिजेलतेंसावधान ॥ एकाग्रमननकरावें ॥३२॥ ॥सं० वा० श्लो० ॥३॥ चि
दिहास्तीहचपरमिदंचिन्मयमेवच ॥ चित्वंचिदहमेवेतिलोकाश्चिदिनिसंग्रहः ॥१॥ चिदे
वपंचभूतानिचिदेवभुवनत्रयं ॥ विज्ञातमधुनासम्यगहमेवचिदेवहि ॥२॥ एवंचिदग
नाभोगेभूषणेव्योम्निभास्करे ॥ धराविवरकोशस्थेसेवचित्कीटकोदरे ॥३॥ ॥टीका
॥श्रीवसिष्ठम्हणतीरघुपती ॥ ऐकेवीरवरमहामती ॥ चिन्मयरूपहेसर्वजगतीं ॥

सेनिश्चितीतदात्मक ॥३३॥ इहपरत्रींचिन्मयअसे ॥ परीइहपरत्रादितेथनसे ॥ परो
क्षाऽपरोक्षींतेंचिवसे ॥ ज्ञानसमरसेंएकत्वी ॥३४॥ तूंमी आणिहेनिन्हीलोक ॥ ज्ञान
रूपगासकळएक ॥ सिद्धांतसंग्रहह्माचिचोरव ॥ चिन्मयात्मकचराचर ॥३५॥ चिद्रूप
पंचमहाभूतें ॥ चिद्रूपचीभुवनत्रयते ॥ जाणिलेसम्यक्विचारेते ॥ मीचिते अयितेचि
द्ब्रह्म ॥ ३६॥ एवंऐसियाचिह्नें ॥ स्वर्गादिजेकाभोगस्थानें ॥ आणिनानापरीचींभूष
णें ॥ व्यापिलींचैतन्येंसकळही ॥३७॥ अथवाभोगअभोगसर्वोठायीं ॥ व्यासचिअसे
ज्ञानपाही ॥ त्याहूनरिक्तसहसाही ॥ नसेचिकांहींकिंचित् ॥३८॥ तेंज्ञानचैतन्यरावण
री ॥ व्योमींअंतरिक्षदिवाकरी ॥ धरापाळादिविवरी ॥ कोशभांडारींव्याप्तअसे ॥३९॥
तेपशुपक्षीकीटकोदरीव्यापोनिअसेसर्वांतरी ॥ त्यावीणरितेअणुभरी ॥ नसेत्रीहरी
त्रैलोक्यीं ॥ ४०॥ इत्यादिगाश्रीवसिष्ठराम ॥ संवादींहाचिकेलानेम ॥ ज्ञानचैतन्यचि
द्रूपरम ॥ असेजगद्व्यापुनी ॥४१॥ ज्ञानाशींचचिच्छब्देंकरून ॥ वाखाणितीपरम
निपुण ॥ ब्रह्मप्रकाशचैतन्यघन ॥ यासचीजाणबोलती ॥४२॥ एवंआकाशादिपृथ्वीप्र-
ती ॥ वज्रादिपाषाणजडपदार्थी ॥ व्यापुनीअसेसर्वजगती ॥ तेज्ञानघनज्योतीशिष्या
तूं ॥४३॥ तेंचितूंज्ञानचिह्नन ॥ सर्वव्यापकपरिपूर्ण ॥ हेंऐकोनिशिष्यआपण ॥ मनींशं
शंकोनबोलत ॥४४॥ ॥आशंका॥ म्हणेस्वामीदयाघना ॥ शिष्यचातकसंजीवना

सद्गुरोपरमकल्याणा॥ किंकरवचनाऐकावें॥४५॥सर्वपदार्थमात्रींचैतन्य॥व्यासचि
सेज्ञानघन॥ ऐसेंसर्वोक्तिप्रमाण॥ तरिकाजडपणशिळादिकीं॥४६॥घटपटादिपदार्थ
माझारी॥पृथिव्यादिपाषाणसर्वांतरी॥चैतन्यअसेसबाह्यजरी॥ ज्ञानकातरीनसेजडीं
॥४७॥ऐसीशिष्यशंकाऐकोन॥ बोलेसद्गुरुदीनपावन॥ह्मणेशिष्यासावधान॥यद-
र्थींभाषणऐकावें॥४८॥अगाशब्दआत्माज्ञानघन॥पदार्थमात्रींअसेपूर्ण॥परिहें
जाणिजेविचारेंकरून॥ अविचारेंमनभ्रमपावे॥४९॥तंवतोचिआतांविचारकैसा॥पुस
सीगाजरीऐसा॥ तरीसांगेनआपैसा॥ एकाग्रमानसाश्रवणकरी॥५०॥ अरेचराचरहें
जगज्ज्ञान॥येथेंशब्दाशब्दउपाधिभिन्न॥शब्दिप्रकाशाबिंबेंज्ञान॥अशब्दीं असूनन
प्रकाशे॥५१॥ आतांहेंचिदृष्टांतेंकरूनखचित॥सांगिजेलगाविचारयुक्त॥जेणेंतुझि
यामनांत॥ ह्मागुह्यार्थविषदकळे॥५२॥जैसासूर्यप्रकाशेंकरून॥ अदर्शखापरिसम
समान॥प्रकाशीनसेचिवंचकपण॥तोअद्वैतपणउभयींही॥५३॥परीस्वच्छआदर्श
चेठायीं॥प्रकाशवृद्धिहोयपाहीं॥त्यांतबिंबेप्रकाशरवी॥तोकुड्यादिकाहीप्रकाशी॥५४
तोचिअस्वच्छखापरीसमान॥प्रकाशएकचीअसेव्यापून॥परीवृद्धिनपवेतेथजाण॥
उपाधिमलिनयाहेतू॥५५॥ अगारखापरीअसेप्रकाश॥परीबिंबोननप्रकाशी॥इत्यादि
कास॥आदर्शीअसोनिसावकाश॥बिंबोनिअन्यासप्रकाशकरी॥५६॥एवंसूर्यप्रका

शींभेदनसे॥ तोउभयींसमानपडिलासे॥ परीस्वच्छींप्रतिबिंबदिसतसे॥ मलिनत्वींन
दिसेअसूनही॥५७॥ तैसाआत्माज्ञानघन॥ चराचरींअसेव्यापून॥ परीशुद्धीप्रतिबि
बेंज्ञान॥ अशुद्धींअसूनबिंबनुमटे॥५८॥ शुद्धमलिनोपाधिमिषें॥ चेतनाचेतनभाग
दिसे॥ परीचित्स्वरूपींभेदनसे॥ हेंवैचित्र्यभासेउपाधीचें॥५९॥ तेचउपाधिवैचित्र्य॥ सां
गेनऐकेंसर्वत्र॥ अचरचरहेप्राणिमात्र॥ परिभिन्नउभयत्रलक्षणें॥६०॥ अगाचरप्रा
णियाचेठायीं॥ असेस्वच्छांशबुद्धिपाही॥ म्हणोनिचिच्छक्तितेथेंही॥ बिंबोनिइंद्रियीं
ज्ञानफांके॥६१॥ सकळदेहेंद्रियाहुन॥ स्वच्छांशबुद्धिअंतःकरण॥ तेमनुष्यादिदेहीअ
सेजाण॥ म्हणोनिज्ञानतेथेंउमटे॥६२॥ असोशुद्धांशबुद्धियोगेंकरून॥ प्राणियाचे
देहींज्ञान॥ प्रतिबिंबलेंम्हणून॥ चलनवलनहोतसे॥६३॥ इतरपाषाणशिळाशिख
र॥ घटपटादिकअचर॥ हेअशुद्धमलीनजडफार॥ बुद्धिस्वच्छतरयेथनसे॥६४
घटपटादिकींनिश्चयेसी॥ अंतःकरणनसेसहबुद्धिसी॥ तेअस्वच्छउपाधिमलिन
त्वेसी॥ स्वच्छांशतयासीनसेची॥६५॥ म्हणोनिआत्माज्ञानघन॥ व्यापकसर्वत्र
असोन॥ परीप्रतिबिंबनपवेज्ञान॥ जडबुद्धिहीनयाहेतु॥६६॥ समानचीसमी
चित्सागर॥ परीस्वच्छींप्रकाशवृद्धिफार॥ होतसेतेसीअस्वच्छींइतर॥ [illegible]
नदिसे॥६७॥ हेंमागेंहितुजलागुन॥ केलेंअसेनिरूपण॥ पुनःदीधलेंतेंस्वजाण॥

दृष्टांतेंअन्यऐकसांगों॥६८॥ जैसारविप्रकाशभूमंडळातें॥ प्रकाशीसर्वहीपदार्थांतें
॥परीसूर्यकांतीपावेंवृद्धीतें॥पाषाणइतरतैसेची॥६९॥ तैसाआत्माप्रकाशवंत
॥व्याप्तचिअसेचराचरांत॥परिजेंअंतःकरणसहित॥तेथेंचिबिंबतज्ञानत्वें॥७०॥
जेरहितबुद्धिअंतःकरण॥ तेथेंप्रतिबिंबनपवेज्ञान॥ अचरींअंतर्बाह्यअसून॥परी
कदाचलनत्यानये॥७१॥ ह्याचिऐसादृढनिश्चय॥ तुजबाणावयानिःसंशय॥ श्रीवि
द्यारण्यादिआचार्य॥ बोलिलेवर्यतेंऐकें॥७२॥ ॥सं॰पं॰द॰श्लोक॥ ॥खानिलाग्नि
जलोर्व्यंडलोकप्राणिशिलादिकाः॥ विकाराप्राणिधीष्वंतश्चिच्छायाप्रतिबिंबिता॥५
॥टीकारामकृष्णपंडीत॥ आकाशवायुअग्निजळ पृथ्वीब्रह्मांडलोकप्राणी शि.
लादिकमायासृजिते॥ नाहोपांचभौतिकसमान सर्व आणिकोठेंचेतनत्व आणिकेथें
जडत्वहेकांआहे ऐसी आशंका इसीउत्तर सांगों॥ प्राणिधीष्विति॥ प्राणियांच्याशरी
रीं॥ अंतःकरणाच्याठायीं॥ चैतन्यप्रतिबिंबलें यास्तव तेणें चेतनत्व आहे॥ इतरठायीं
प्रतिबिंबावयास अंतःकरण नाहीं या कारणें जडत्व आहे ऐसा अर्थ॥४॥ नाहोचेतना
चेतनविभागचिद्रूपब्रह्मकृतच आहे ऐसेंकांनसे॥ याआशंकेसउत्तर कीं ब्रह्मसर्वत्रे
उपादानत्वें सर्वत्रसेमचआहे,नाहीं ऐसेंनाहींच,तेंसांगों॥ श्लोक॥ चेतनाचेतनेषे
षुसच्चिदानंदलक्षणं॥ समानंब्रह्मभिद्येतेनामरूपेपृथक्पृथक्॥५॥ ॥टीकारामकृ

कृष्णपंडीत॥ चेतनअचेतनयांच्याठायींसच्चिदानंदलक्षणब्रह्मसमानआहेपरंतु नामरूपेंकरून भेदातेंभिन्नभिन्नभासतें आणिनामरूपेंचचेतनाचेतनीं वेगळालीं भेदातेंपावताहेत ब्रह्मसर्वत्रसमानच आहे॥५॥ श्लोक॥ चेतनाचेतनभिदाकूटस्थात्मकृतानहि॥ किंतुबुद्धिकृताभासकृतैवेत्यवगम्यतां॥६॥ टीकाराम० ॥ चेतनाचेतनविभाग॥ चिदाभासत्वासत्वें करून आहे तोकैसा॥ कूटस्थाच्याठायींकल्पितबुद्धितत्कृतआभास ऐसेंजाणावें॥ आतांअचेतनाच्याठायींबुद्धिनाहीं तेथेंचिदाभासनाहीं परंतु कूटस्थआत्मचैतन्यअचेतनीहीआहे॥६॥ कूटस्थांचेठायींचेतनाचेतनविभागनाहीं॥त्यांच्याठायींजैसीबुद्धिकल्पिततैसेघटादिकही कल्पितआहेत तेंदृष्टांतेंकरून सांगों॥ श्लोक॥ यथाचेतनआभासः कूटस्थेभ्रांतिकल्पितः॥ अचेतनोघटादिश्चतथातत्रैवकल्पितः॥७॥ ॥टीका॥ कूटस्थाचेठायींभ्रांतिकरून कल्पितचेतन आभास तैसेचअचेतनघटादिककल्पितआहेवा॥७ ॥ओव्या॥ ऐसेचिहेश्रीरंगनाथ॥ बोलतीवासिष्ठसारटीकेंत॥ तेहीऐकेंगासंमत॥ ज्ञानसिद्धांतचराचरीं॥७३॥ ॥संमतिरंगनाथ ओव्या॥ स्फटिकादिकांचेपोटीं॥ आकाशदेखिजेलोकींदृष्टी॥ तैसेंसर्वपदार्थांच्यापोटीं॥ होयभेटीआत्मयासी॥७॥ अगाचिद्रूपजोकींपरमेश्वर॥ तोपदार्थमात्रींवर्ते निरंतर॥ हेंविचारेंजाणिजेदृढतर॥

अविचारें साचारनेणती ॥२॥ नाहोज्ञानस्वरूपव्यापकआत्माअसे॥ तरीपदार्थमात्रीं
कांचिलक्ळानसे॥ तरुपाषाणादिकींनप्रकाशे॥ ज्ञानकांनसेसर्वत्रजडीं॥ ३॥ तरीऐ
कायाचेंउत्तर॥ शुद्धिप्रकाशहोतसेफार॥ जडमलिनींतोविचार॥ नाहींप्रकारप्रका-
शाचा॥ ४॥ जैसासूर्यपदार्थातेंप्रकाशी॥ परिसूर्यकांतिपावेवृद्धीसी॥ जडमलिन
पाषाणींतैसी॥ उपलब्धिएसीनपविजे॥ ५॥ कांचेंद्रप्रकाशेसोमकांत॥ विरोपाहे-
होयद्रविभूत॥ तैसेमलिनपाषाणजात॥ असतीवर्ततकाठिण्यें॥ ६॥ तैसेंसर्वेंद्रिय
परिस॥ अंतःकरणबुद्धितेशुद्धांश॥ तेथेंस्वप्रकाशेंप्रकाशेपरेश॥ घटपटादिवोस
बुद्धिहीन॥ ७॥ घटपटआणिपाषाण॥ तेथेंनाहींबुद्धिअंतःकरण॥ म्हणोनिअति
जडतेमलीन॥ ज्ञानप्रकाशनतेथकेचें॥ ८॥ अगाअंगणींदर्पणुठेविला॥ रविनेंप्र
काशिलेंतयाला॥ तोहीशुद्धपणआणिकाला॥ गृहादिकालाप्रकाशी॥ ९॥ तैसी
खापरअथवापाषाण॥ रविसेन्मुखठेविलीयाकोणगुण॥ तैसाशुद्धींप्रकाशेआ
त्मापूर्ण॥ सर्वत्रअसोनशुद्धाशुद्धीं॥ १०॥ परीशुद्धाअशुद्धासारिखे॥ प्रकाश-
भासेंउपाधिवसें॥ येन्हवींतोसमसमानअसे॥ न्यूननसेकोणेअर्थी॥ ११॥ ॥एवं
इत्यादिनिरूपणीं॥ हेंचिकथिलेंभरंवसेनी॥ ज्ञानब्रह्मांडभरोनी॥ असेव्यापूनन
राचरीं॥ ७४॥ ऐसेंशिष्याज्ञानव्यापक॥ तेंचितुझेंस्वरूपचोख॥ हेंबहुतसेकोनिस

म्यक॥ आशंकाएकशिष्यपुसे ॥७५॥ म्हणेसद्गुरुभवभंजना॥ एकुआशंकामाझियामना॥असेतेनिवेदूंआपणा॥ दीनपावनानिघावया ॥७६॥ पूर्वीपंचदशीचेसंमतीं॥ज्ञानअभेदनिश्चयेसी॥ कथिलेंपरितेंतूंचिहोसी॥ वचनोक्तिऐसीतेथनसे॥७७ आणिमजलागींआपण॥ उपदेशिलेंनिश्चयेंकरून॥ तेचिगातूंअभेदज्ञान॥ ऐसा उभयवचनींभेददिसे॥७८॥ तरिहेआशंकाछेदन॥करूनिकरावेंसमाधान॥ ऐकोनिशिष्याचेंवचन॥सद्गुरुआपणबोलती॥७९॥म्हणेशिष्याविचारयुक्त॥ अर्थमननकरीमनांत॥पंचदशीचेनिरूपणांत॥ हाचिसिद्धांतपैअसे॥८०॥जीवासितेथें तत्वता॥सत्यज्ञानादिरूपता॥दाविलीसेब्रह्मैक्यता॥ म्हणोनिउभयार्थताभेदन से॥८१॥ ज्ञानपूर्वकाळींतुजलागून॥पुसतअसतांहीतूंकोण॥परिनकळेचिमायिन्मयपण॥ वदसीभ्रमोनजीवदेहमी॥८२॥ ऐसियाभ्रमेरूपजीवातें॥ तुजसहितगासर्वांतें॥ ज्ञानानंदादिपंचदशीतें॥ दाविलेंश्लोकार्थेसत्यरूप॥८३॥ म्हणोनिउभयवचनार्थासी॥ भेदनसेयाकदाक्षेसी ॥ पंचदश्योक्तआणितुजसी॥ उपदेशिलेत्यासीऐक्यत्व॥८४॥ ऐसातूंचिरेज्ञानघन॥स्वप्रकाशआत्माचैतन्य॥ असशीनिश्चयेंकरून॥ संदेहकारणयेथनसे॥८५॥ ऐसेचिअनेकशास्त्रांत॥ गुरुशिष्यादिसंवादांत॥श्रीअष्टावक्रादिग्रंथोक्त॥ हाचिसिद्धांतउपदेशिती॥८६॥तेचिअष्टावक्रसद्गुरु

आपण॥ शिष्यमिषेंजीवासिज्ञान॥ उपदेशितीतेंव्यारव्यान॥ श्लोकेंकरूनपरियेसी
॥८७॥ अष्टश्लोकेंसावकाश॥ केलाअसेउपदेश॥ आत्माचैतन्यस्वप्रकाश॥ बोलती
शिष्यासतोचितूं॥८८॥ तेश्लोकाष्टकनिरूपण॥ ऐकेंएकायकरूनिमन॥ आत्माचै
तन्यज्ञानघन॥ हींबाणेलरवूणतुजलागीं॥८९॥ ॥श्लोक॥ ॥नत्वंदेहोननतेदेहो
कर्ताभोक्तानवाप्रभवान्॥ चिद्रूपोसिसदासाक्षीनिरपेक्षःसुखंचर॥१॥ देहाभिमानपा
शेनचिरंबद्धोसिपुत्रक॥ बोधोहंज्ञानखड्गेनतंनिष्कृत्यसुखीभव॥२॥ ॥टीका॥ स
द्गुरुवदतीशिष्याप्रत॥ तूंदेहनव्हसीनिश्चांत॥ देहसंबंधाअतीत॥ तुझाहिनिश्चितदेह
नव्हे॥९०॥ अगाहेपांचभौतिक॥ दृश्यदेहेंद्रियादिक॥ अस्तिमांसरुधिरात्मक॥ कुत्स्च-
ळदेखअपवित्र॥९१॥ देहनरकाचेंकोठार॥ केवळदुर्गंधीचेंभांडार॥ अमंगळपरिणामीं
नश्वर॥ जडसाचारनव्हसीतूं॥९२॥ असोदेहशब्देंकरून॥ बोलिलेकटाक्षऐसाजा-
ण॥ देहेंद्रियदशप्राण॥ बुध्यादिमननव्हसीतूं॥९३॥ अथवादेहत्रयादिक॥ सर्वस
मुदायदृश्यवाचक॥ हाअविद्यात्मकदेहोचिएक॥ जाणसम्यकदृश्यनतूं॥९४॥ हा
देहहीनुझानसे॥ हेंमागेंकथिलेंचअसे॥ तूंचिद्रूपस्वप्रकाशें॥ कर्तृत्वादिपिसेंतुज
नाहीं॥९५॥ कर्तृभोक्तृअहंकारादिकासी॥ सदासाक्षीतूंनिश्चयेसी॥ जोज्यासस
क्षीतोभिन्नत्यासी॥ जैसाघटासिघटदृष्टा॥९६॥ ह्मणोनिदेहादितत्संबंधी

॥निरपेक्षगानिश्चयेसी॥ होऊनिस्फुरसावकाशी॥ विचरेद्वैतासीयास्फुनी॥ १७

॥श्लोकसं० श्रीअच्युतरावजी॥ ॥तूंनदेहनतूंम्हाहिकर्तानभोक्तानतूंतसा॥ तूंचि द्रूपसदासाक्षीनिरपेक्षस्फुरवेंफिर॥१॥ श्लोकसं० श्रीशिवरामस्वामी॥ ॥नव्हसि देहतूंननुतुझीनव्हे॥ कर्तृत्वभोक्तृत्वानोहसिचहे॥ चित्स्वरूपतूंसाक्षिदेखणा॥ विचरतूंस्फुरवेंगिळुनिवासना॥१॥ हेपुत्रकशिष्यातूंआपण॥ देहाभिमानपाशेंकरून॥ बहुकल्पेंबद्धअससीजाण॥ तरीहाउच्छेदनऐसाकरी॥ १८॥ बोधरूपमीचित्प्रकाश॥ देहनव्हेचिजडांश॥ ऐसियाज्ञानखड्गेंसावकाश॥ तोडूनिपाशस्फुरवीहोय॥ १९ अगास्फुरवीहोयऐसेंभाषण॥ हेंकेवळवाचारंभण॥ आत्मास्फुरवचितूंआपण॥ होणेंमागूनतुजनसे॥ १००॥ असोनिश्चयेंदेहनव्हसी॥ चिन्मात्ररूपस्वप्रकाशी॥ त्यातुलाजन्मादिपुष्टिनाशासी॥ देहधर्मासीनसंबंध॥ १०१॥ हेचिश्लोकहूयेंकरून॥ वदिजेलऐकेंसावधान॥ तूंआत्माअविनाशचैतन्य॥ तुजहेअन्यधर्मनसती॥२॥

॥श्लोक॥ देहस्तिष्ठतुकल्पांतंगच्छत्वद्यैववापुनः॥ क्वचवृद्धिः क्वचवाहानिस्तवचिन्मात्ररूपिणः॥३॥ एकस्मिन्नव्ययेशांतेचिदाकाशेऽमलेत्वयि॥ कुतोजन्मकुतःकर्मकुतोहंकारएवच॥४॥ ॥टीका॥ कल्पांतवरिदेहराहो॥ अथवाअजचीजळोनिजावो॥ तुजचिन्मात्ररूपासनिसंदेहो॥ वृद्धिअपावोकोठेंगा॥३॥ हादेहस्थितभ्रमता

॥तुजवृद्धिनसेचितत्वता॥ अथवायाचाअभावहोता॥ हानिसर्वथातुजनाहीं॥ ४
॥सं॰अच्युतरावजीश्लोक॥ ॥राहोकल्पवरिदेहजावोआजचबापुनः॥ चिन्मात्र-
रूपतूंतुलापुष्टिनाशादिकोठुनि॥ ३॥ श्लोकश्रीशिवरामस्वामी॥ बारेविनाशिदेहो
आजिचेजावोयुगांतवरिराहो॥ वृद्धिविनाशअपावोतुजनाहींतूंअनंगनिजदेवो॥ ३॥
॥ओव्या॥ एकअव्ययचिदाकाशाचेठायीं॥ अमलशांतस्वप्रकाशींपाहीं॥ ऐसिया
तुजआत्मयाचेठायीं॥ जन्मादिनिश्चयीपैकोठें॥ ५॥ एकसजातीयविजातीयस्वगत
यांभेदाहूनितूंनिरस्त॥ अद्वैतद्वैताहुनिरहित॥ असशीनिश्चितनिर्मळपणें॥ ६॥ आ
तांसजातीयम्हणजेकाय॥ विजातीयस्वगतकैसे होय॥ कळावयालक्षणत्रय॥ ऐकशि
ष्यवर्यसांगेन॥ ७॥ प्रथमवृक्षदृष्टांतेंकरून॥ तिहींचेंस्वरूपलक्षण॥ सांगोमगद्रष्टा
तरखुण॥ कळेलजाणसहजची॥ ८॥ पत्रपुष्पफलादिक॥ एकावृक्षासिहेदेख॥ हा-
स्वगतभेदजाणएक॥ विचारेंऐकदुसराही॥ ९॥ वृक्षींअन्यवृक्षांतर॥ हासजातीय
भेदसाचार॥ आतांविजातीयाचाप्रकार॥ ऐकेंसत्वरसांगेन॥ १०॥ पादपाहुनीअन्य
त्र॥ पर्वतादिशिळाविचित्र॥ भिन्नजेकावस्तुमात्र॥ हेजाणसर्वत्रविजातीय॥ ११॥
एवंएकावृक्षाचेठायीं॥ भेदत्रयदाविलेनिश्चयी॥ अनात्मवर्गाशींचसर्वही॥ अस
तीपाहींविकारहे॥ १२॥ तैसेंतुजब्रह्मरूपासी॥ हेत्रिभेदनसतीनिश्चयेसी॥ त्याही

ऐकेंविचारासी॥ यथान्वयेसीसांगेन॥१३॥ अरेसच्चित्सुखघन॥ हेस्वगतभेद
नसतीतुजलागून॥ त्रिपदाएकत्वीपूर्ण॥ निराकारजाणस्वात्मरूप॥१४॥ सत्ता
ज्ञानअभेद॥ तद्रूपचिस्कखानंद॥ हेंपूर्वीनिरूपणविशद॥ कथिलेंचिअसेविस्ता
रें॥१५॥ असोत्रिशब्दींस्वगतभेद॥ तुजसींनसेप्रसिद्ध॥ तैसाचविजातीयसंबंध॥
नसेअगाधस्वस्वरूपीं॥१६॥ ह्मणसीदेहादिप्रपंचजात॥ हाविजातीयत्वेंयथार्थ॥ न
रीहेहीनघडेगानिश्चित॥ मिथ्याभूतप्रपंचहा॥१७॥ प्रपंचजरीसत्यअसता॥ तरी
विजातीयत्वेंभेदकरितां॥ आत्मरूपींमृषातत्वता॥ जेवीस्वप्नवार्ताजागृतीसीं॥१८
कीशुक्तीच्याठायींरजत॥ भासल्याकायभेदकरीत॥ भासतानभासतासत्य॥ सिंप
अद्वैतएकत्वी॥१९॥ तैसेंभासलेंहिजगद्ज्ञान॥ असद्रूपचिमिथ्यास्वप्न॥ असोविजा
तीयत्वेंकरून॥ नसेचिजाणभेदतुज॥२०॥ आतांभेदेसजातीय॥ तोहीनसेचिगानि
श्चय॥ ब्रह्माव्यतिरिक्तदुजेंकाय॥ नित्यत्वेंआहेसांगिजे॥२१॥ सद्वस्तुहूनिअन्य॥ दु
सरीसद्वस्तुनित्यत्वेंकरून॥ असलियाहोतेभेदभान॥ सजातीयजाणेंयेथघडतें॥
॥२२॥ ब्रह्मीद्वैताचाअभाव॥ एकचिपूर्णनिरावेव॥ एवंभेदत्रयासिठाव॥ नसेसद्भाव
सदोदित॥२३॥ ऐसियातुजअव्ययासी॥ जन्मनसेचिनिश्चयेसी॥ कार्यशून्यस्वप्न
काशीं॥ कर्मकर्तृत्वासीअसंभव॥२४॥ निर्मळासीअहंकार॥ मळनसेचिसंभिमार

अहंकारादिसाचार॥ लिंगदेहप्रकारतुजनसती॥१२५॥ ॥श्लोकसं॰श्रीअच्युतरा॰॥
॥स्वद्रूपींनिर्मळींशांतींचिदाकासींअखंडिती॥ जन्मकोटेंकर्मकोटेंअहंकारहिकोठुन
॥१॥ श्लोकसं॰शिवराम॰॥ चित्व्योमएकपरमाव्ययपूर्णआहे॥ आकाशजेविसमनि
र्मळवाडआहे॥ त्यातूजपूर्णपहातांविवळूनिसाचे॥ मीतूंपणामरणजन्मलिंगाऽके
चें॥१॥ ॥ ऐसाआत्मातूंअसोन॥ अनात्मविषयींअज्ञानेंकरून॥ तृष्णावाढविसी
भ्रमोन॥ स्वात्मज्ञानविसरोनी॥२६॥ ह्मणसीबुभुत्सारूपतृष्णातत्वता॥ कैसीनासे
लसर्वथा॥ तोहीऐकेंविचारआतां॥ श्लोकार्थतासांगेन॥२७॥ ॥श्लोक॥ त्वमेकश्चे
ननःशुद्धोजडंविश्वमसत्तथा॥ अविद्यापिनकिंचित्साकाबुभुत्सातथापिते॥ १॥वि
श्वंस्फुरतियत्रेदंतरंगाइवसागरे॥ तत्वमेवनसंदेहश्चिन्मूर्तेविज्वरोभव॥२॥ टीका
॥इयेजगतीचेठायीं॥ भयपदार्थअसतीपाही॥ आत्माजगत्अविद्याही॥ येथइ
च्छेसिनाहींकारणतुज॥२८॥ यात्वयामाजीप्रथम॥ तूंएकचैतन्यशुद्धपरम॥ ऐसें
असावी॥ ब्रह्म जेसें स्वप्रकाश निर्विकार तैशीच हेही तन्निष्ठ असावी प्रपंचाकारें कार्यरूपें नामरूपात्मक अकारास नयावी तैसी निर्विकार तरी हे नव्हे॥ तेव्हां ब्रह्मासी अभिन्नत्वें नघडे ३३ मायाब्रह्मासी भिन्नाऽभिन्न ह्मणावी तरी हेही ह्मणणें अयुक्त॥ जें निश्चयें भिन्न असतें तें कदाही अभिन्न नसतें॥ आणि निश्चयें जें अभिन्न असे तें कदाही भिन्न नसे॥ एकाशींच भिन्नाऽभिन्नत्वें बोलणें हें अयोग्य ३४ एवं भिन्नाऽभिन्न विलक्षण अनिर्वचनीय ह्मणजे मिथ्या माया इचा कोणताही निर्धार सदसदत्वें किंवा भिन्नाऽभिन्नत्वें करावयास विचारें सत्यत्व नाहींच॥ अनादि अनिर्वचनीय मिथ्याच जाणावी सत्य नव्हे ब्रह्म अद्वैतच हासिद्धांत ३५ आतां कार्यरूप जगद्भास जो त्याहून आणि आश्रयभूत ब्रह्म जें त्याहून-या उभयाहून ही माया विलक्षण अनिर्वचनीय वेगळीच ऐशी जाणावी॥ ब्रह्मासी भिन्नाऽभिन्नत्वें बोलावयास योग्यच नव्हे॥ हेंच स्पष्ट कळावयास अग्निशक्ति दृष्टांतें करून सांगों ३६ जैशी अग्नीची दाहकशक्ति अग्निनिष्ठ असोन स्फोटादि कार्यजनिते॥ परंतु अग्नेस्वरूपाहून पृथक् वेगळी भेदें करून मूर्तिमंत शक्ति आहे ऐसी उपलभ्यमान् होत नाहीं ३७ अथवा अग्नीच शक्तिरूप आहे॥ अग्नि आणि शक्ति ऐसें उभय नाहींच॥ तन्निष्ठ विलक्षण शक्ति आहे ऐसी कशावरून

जाणिजे ऐसी आशंका यासी उत्तर कीं कार्यावरून कारण जाणिजेतें ॥ अ
ग्निनिष्ट दाहक शक्ति कारणरूप कोणी आहे ह्मणोन स्पर्श होतांच स्फोटादि
क कार्य उत्पन्न करितें तेव्हां कार्यावरून कारणरूप शक्ति आहे ऐसें अनु
मान कळतें ॥ अग्नीसच्च शक्ति ऐसें ह्मणावें तर मणिमंत्रौषधादि सिद्धिसामर्थ्यें
शक्तीचा प्रतिबंध करून प्रत्यक्ष लखलखीत अग्नि हस्तावर घेतात ॥ तेथें स्फो
टादिक कार्य उत्पन्न होत नाहीं तेव्हां शक्तीचाच प्रतिबंध झाला ॥ अग्नि तरी
र्तिमंत करीं आहेच ह्मणोन अग्नीहून शक्ति विलक्षण ऐसी गमते ॥ परंतु त्या
हून पृथक् ती वेगळी भेदें करून मूर्त अथवा अमूर्तपणें कदा ही नाढळे ॥ अ
ग्नीसीं अभिन्न शक्ति ह्मणावी तर प्रतिबंधें विलक्षणत्व दिसतें ॥ भिन्न ह्मणा
वी तर पृथकत्वें नाढळे ॥ नाहींच ह्मणावी तर स्फोटादिक कार्यावरून आहे ऐ
सी गमते ॥ एवं शक्ति भिन्नाभिन्नत्व बोलतां अनिर्वचनीय प्रतिबंधत्व आणि
कार्यत्व लक्षणावरून शक्ति सूक्ष्म विचारें अंगाराहून आणि तिचें कार्य स्फोटादि
क जे त्याहून विलक्षण अनिर्वचनीय ऐसी जाणावी ॥ तैसी याच दृष्टांतें करून मा
याही आश्रय ब्रह्म जें त्याहून आणि कार्यरूप जगद्भास जो त्याहून सदसत भि
न्नाभिन्नत्वें अनिर्वाच्य मिथ्याच ऐसी जाणावी ॥३८॥ आशंका ॥ नहो आश्र

य ब्रह्म स्वरूप जें त्याहून आणि जगद्रूप कार्य जें त्याहून ऐसी उभयाहून ही माया शक्ति विलक्षण ह्मणतां ऐसें कोठेंही ऐकिलें नाहीं ॥ यासी प्रमाण काय तें सांगावें ऐसी आशंका· यासी उत्तर कीं वेदांतशास्त्रीं श्री विद्यारण्याचार्य बोलिले आहेत तीं वाक्यें सांगों ॥३९॥ सं॰पंचदशीश्लोक॥ कार्यादाश्रयतश्चैषा भवेच्छक्ति र्विलक्षणा॥ स्फोटांगारौ दृश्यमानौ शक्तिस्तत्रानुमीयते ॥१॥ ॥टीकारामकृष्णपंडित॥ हेजे मायाशक्ति कार्यात् इचें कार्य जग याहून विलक्षण आणि आश्रयतः ह्मणजे मायेसी आश्रय तरी ब्रह्म त्याहून विलक्षणे विपरीत स्वभाव आहे॥कार्य जगजें याहून आणि आश्रय ह्मणजे त्याहून विलक्षण हें दृष्टांतें स्पष्ट करून सांगों ॥स्फोटेति॥ वन्हिगत शक्ति तिचें कार्य स्फोट तीस आश्रय अंगार प्रत्यक्ष जाणिजेतें॥ शक्ति तरी स्फोटादिक कार्यावरून अनुमान करिजेतें याकारणें वन्हिहून आणि स्फोटादिकार्याहून वन्हीची शक्ति विलक्षण ऐसा अर्थ ॥१॥ ऐसी पंचदश्यादि प्रमाणें आहेत विलक्षणत्वेंच बोलतात॥ असो इत्यादि माया निरूपण विषयीं विस्तारें चालिलें जें कथन तें आंवरूं॥ एवं सच्चिदानंद अद्वैत ब्रह्म हेंच सिद्ध होय ॥त्यास मिथ्या माया अनिर्वचनीय कदाही द्वैत न करी॥ ब्रह्म स्वरूप जें याच्या वरीं माया कल्पित अनात्मभूत अनृत जड दुःखरूप दृश्य जन्मनाश युक्त निस्तत्व वि

थ्यत्वें ओळखोन॥ स्वात्मस्वरूपीं यास आभासत्वें ऐसें पाहावें॥४०॥ जैसे समुद्रा
चे ठायीं बुद्बुद॥ तद्वत् नाम रूपात्मक जगद्भासतरंग जाणून याचें अधिष्ठान सच्चि
दानंद अनंत समुद्रवत् ब्रह्मस्वरूप तें मीच होय ऐसें जाणावें॥ जों पावेतों सर्व
साक्षी निराकार निःसंग आत्मा ब्रह्म जें तें मीच होय ऐसा निःसंशय दृढ बोध॥
आणि नाम रूपाध्यास मिथ्यत्वें निवृत्त होऊन ब्रह्मानंदीं चित्तवृत्ति तदाकार
त्वें जीवन्मुक्त स्वरूपाच्या ठायीं दृढ स्थैर्यता होय तोंपर्यंत साधन चतुष्टयीं-
निरंतर श्रवण मनन निदिध्यास युक्त असावें॥ साधन चतुष्टय कैसें म्हणशी
ल तर तेंही संक्षेपें लक्षण पुढें सांगों॥ ॥ इतिश्रीस्वात्मबोधग्रंथ॥ श्रव
णकरितांचि होती मुक्त॥ श्रीरघुनाथचरणीं अध्याय अर्पित॥ मौनीसुनिश्चि
तअष्टमहा॥८॥ ॥७॥ ॥७॥ ॥७॥

इतिस्वात्मबोधेअष्टमोध्यायः समाप्त

श्रीगणेशायनमः॥ ॥ आतांसाधनचतुष्टय म्हणजे मुमुक्षुत्व प्रथम, वैराग्य
द्वितीय, नित्यानित्य विवेक तृतीय, शमदमादि षट्क संपत्ति चतुर्थ॥ ऐसीं चार सा
धनें त्यास साधनचतुष्टय बोलिजे १ त्यांत मुमुक्षुत्व म्हणजे त्रिविधतापें करून
व जन्मजरादि दुःखें करून व लोकेषणा द्रव्येषणा व भार्यापुत्रादि ईषणा इत्या
दि ताप व स्वर्गनरकादि ताप असे अनेक तापजे तेणें करून तप्त झाला जो
अधिकारी तोहा संसारतापापासून विमुक्त होऊन हे ईश्वरा मला परमानंदाचा लाभ
रूप ब्रह्मसाक्षात्कार कधीं होईल ऐसी अति दग्धदाह मस्तकवत् किंवा ग्रीष्म-
काळीं चहूंकडून वणव्यांत सांपडलेल्या गजाचे शीतल गंगेचा महा ह्रद प्राप्तीचे
इच्छेपरी तीव्र इच्छा तें मुमुक्षुत्व जाणावें॥ आतां वैराग्य कैसें तेंही सांगों २ वै
राग्य म्हणजे विवेकयुक्त इह मृत्युलोकींचे भोग स्वक् चंदन वनितादिक षड्वि
कारवान्॥ आणि अमुत्र म्हणजे रंभा ऊर्वशी कल्पद्रुम कामधेनु नंदनवन अ
मृतपानादि क्षयातिशय दुःखवान् व ब्रह्मलोकादि स्वर्ग भोग नश्वरत्वें जा-
णोन त्याचे ठायीं तिरस्कार वमन किंवा काकविष्ठावत् होऊन निःशेष इच्छा
रहित असावें तेंच वैराग्य निर्मळ दृढ ऐसें जाणावें॥ नित्यानित्यविवेक कैसा
तोही ऐकें ३ नित्यानित्य विवेक म्हणजे नित्यवस्तु एक सच्चिदानंदब्रह्म॥ तत्व

तिरिक्त सर्व अनित्य जड दुःखरूप मिथ्या ऐसें दृढ जाणणें तोची नित्यानित्य विवेक ऐसा जाणावा ॥ आतां चतुर्थ शमादि षट् संपत्ति कैसी तेंही सांगों ॥ शमादि षट् संपत्ति ह्मणजे शम दम तप तितिक्षा श्रद्धा आणि समाधान इत्यादि सद्हा हे षट् संपत्ति ॥ त्यांत शम ह्मणजे अंतरिंद्रिय अंतःकरणांतील सर्व वासना त्यागून आत्मतत्वीं दृढ मनोनिग्रह करणें तो शम बोलावा ॥ दमलक्षण ही श्रवण करीं ५ दम ह्मणजे चक्षुरादि बाह्येंद्रियद्वारा वृत्ति बाह्य विषयावर न यावी ह्मणोन त्याचा रोध करणें तो दम बोलिजे ॥ आतां तप कैसें तेंही सांगों ६ तप ह्मणजे स्ववर्णाश्रम स्वधर्मानुष्ठान काम्य निषिद्ध रहित भगवद्भजन भक्तियुक्त अति भावार्थे दंभरहित हृदयीं सदा अद्वैत हरीचें ध्यान करणें तें तप बोलीजे ॥ पुढें तितिक्षा कैसी हे ऐकें ७ तितिक्षा ह्मणजे शीतोष्णादि सर्व दुःख सहिष्णुत्व परापराध निंदा द्वेषादि सहन अपराधी जो त्यास दंड करण्याचें सामर्थ्य ही असलें तरी अतिशांतत्वें गंभीर समुद्रवत् भिक्षूचे परी सहन च करावें ॥ निंदक जे त्यांसी द्वेष न करणें तीच तितिक्षा शुद्ध जाणावी ॥ आतां श्रद्धा कैसी तेंही सांगों ८ श्रद्धा ह्मणजे सद्गुरु वेदांतवाक्याच्या ठायीं दृढ विश्वास ॥ गुरु आणि वेदांनीं जें कथिलें कीं जगज्जन्माद्यध्यासाधिष्ठान ब्रह्मस्वरूप तेंचि तूंच हेंच त्या

क्यीं अति विश्वास धरून कधींही अश्रद्धा न करणें तीच दृढ श्रद्धा ऐसी जाणा
वी ९ समाधान कैसें तेंही ऐकें॥ अपरोक्ष ज्ञानें करून दृढतर बुद्धि निश्चय स्थै
र्यता ब्रह्मानंदीं होऊन स्वस्थ चित्तें रज तम सत्व वृत्या शून्यत्वें करून स्वरूपस्थ
एकाग्र नैराश्य असणें तें समाधान जाणावें॥ इत्यादि शमादि षट् संपत्ति सहि
त साधन चतुष्टय युक्त असावें तें संक्षेपें कथिलें १० आतां वैराग्य बोध उपरति
या त्रयांचीं त्रय त्रय अंगें आहेत तींही विशदत्वें कळावीं म्हणून पुनः संक्षेपें सां
गों ११ प्रथम वैराग्य, अंगत्रय म्हणजे, हेतु प्रथम, स्वरूप द्वितीय, कार्य तृतीय,
ऐसीं त्रयांगें॥ त्यांत हेतु म्हणजे दृश्य विषयांचे ठायीं दोषदृष्टि सर्व प्रपंच हा
नश्वर येथें मी सक्त होऊन देह मरणांत पावेतों कुटुंब काबाडी झालों तर अ
होरात्र हातोहात आयुष्य क्षय होऊन कोण्या वेळेस देह पडेल हाही भरंवसा
नाहीं॥ देह पडल्यानंतर श्रीयमधर्माचा दंड पापादिकर्मांची झडती नरकादि
दुःखें प्राप्त होऊन पुनः त्रिविध तापात्मक अति दुःखरूप श्वान शूकरादि नीच
योनि यामध्यें जनन मरण प्रवाहीं पडेन॥ या हेतूस्तव आतां तरी दृश्य कुटुंबा
दिकीं सक्त न होतां अवशेष जे देह आयुष्य यांमध्यें [illegible]
दुःखानर्थरूप जन्म मरण चुकवावें हेंच योग्य॥ [illegible]

ऐसें जाणावें॥ ऐसा वैराग्याचा हेतु उत्पन्न झाला परंतु या प्रमाणें न घडलें तर हेतूच मात्र, स्वरूपीं येणें राहिलें तें स्वरूप लक्षण कैसें तेंही सांगो १२ वैराग्याचें द्वितीयांग स्वरूप, स्वरूप म्हणजे उत्पन्न जो हेतु त्या प्रमाणेंच निःशेष अंतरीं दृश्य विषयाचा त्याग होऊन परमार्थ मार्गीच जो शूद्ध लागला तेंच स्वरूप प्राप्ति झाली ऐसी जाणावी॥ परी तेंही कार्य होय तों पावेतों अपक्व तें कार्य लक्षण कैसें तेंही ऐकावें १३ वैराग्याचें तृतीयांग कार्य, कार्य म्हणजे यापुढें लें जें दृश्य विषयादिक त्याची पुनः इच्छा उत्पन्न होऊन कदाही ग्रहण न करणें तेव्हां कार्य झालें ऐसें जाणावें॥ एवं ऐसें वैराग्य त्रयांग कथिलें या प्रमाणें त्रयांग युक्त परिपक्व वैराग्य नसून केवळ बाह्य दांभिक वर्तनें तो नटवत् वेष जाणावा॥ आतां बोध त्रयांग कैसा तोही सांगों १४ बोधांग त्रय म्हणजे पूर्ववत् हेतु प्रथम, स्वरूप द्वितीय, कार्य तृतीय, ऐसा त्रयांग बोध जाणावा॥ त्यांत हेतु म्हणजे अद्वैत शास्त्र श्रवण मननें करून ब्रह्म स्वरूप नित्याद्वैत कळणें हा त्याचा हेतु प्रथम॥ आतां द्वितीय स्वरूप कैसें तेंही ऐक १५ द्वितीयांग बोधाचें स्वरूप स्वरूप म्हणजे मी शूद्ध आत्मा देहेंद्रिय बुद्धि अहंकारादिकाहून पृथक् सकळ तत्वंपद प्रकृति सर्ग जो त्याहून विलक्षण चैतन्य साक्षी जें ब्रह्म तें मींच

सत्य होय॥ मम व्यतिरिक्त सर्व प्रपंच मृगजळवत् मिथ्या तेव्हां प्रपंच सापेक्ष सा
क्षित्व ह्मणणें हेंही मिथ्या. मी निर्धर्म अद्वैत एकरस परमात्मा हें सिद्ध च होय॥
ऐसें जाणणें तें बोधाचें स्वरूप द्वितीयांग ऐसें जाणावें॥ आतां तृतीयांग कैसें तें
हीसांगों १६ तृतीयांग बोधाचें कार्य, कार्य ह्मणजे देहेंद्रिय प्रपंच भासला तरी पुनः
त्याचे ठायीं सत्यत्व बुद्धि न होऊन अहंकारादिकाहून पृथक् साक्षित्वें स्वकीय
स्वरूप जाणिलें तें पुनः त्याचे ठायीं तादात्म्याध्यासें ग्रंथी नव्हावी॥ आणि मीब्र
ह्म होय कीं नव्हे ऐसा संदेह निश्चये पुनः येऊंच नये॥ मी सच्चिदानंद ब्रह्म च स
त्य ऐसा असंभावना विपरीत भावना रहित दृढ बोध तेंच बोधाचें कार्य पूर्ण
कदशा जाणावी॥ ऐसा च्यांग बोध परिपक्व नसला तर बोध ही अपरिपक्व॥
रति च्यांग कैशी तेंही सांगों १७ पूर्ववत् उपरति ही हेतु स्वरूप कार्य त्वें ज
ह्मणजे यम नियमें करून अंतःकरण आत्मत्वीं नियम करणें हा हेतु
तीयांग उपरतीचें स्वरूप॥ स्वरूप ह्मणजे विषय वासनेंनून निःशेष चित्त
न अंतर्मुख एकाग्र स्वस्वरूपीं समरसोन निर्वातदीपवत् स्थैर्यता झाली
तेंच उपरतीचें स्वरूप जाणावें॥ आतां कार्य कैसें तेंही ऐक १८
र्य. कार्य ह्मणजे सर्व विषयवासनेचा नाश सुषुप्तिवत् विस्मरण

उत्पन्न होऊन ग्रहण न व्हावें॥ तेची उपरतीचें कार्य यथार्थ॥ ऐसी त्रयांग उपर-
ति दृढतर नसली तरी तेही अपक्व ची परिपक्व नव्हे १ एवं ऐसें वैराग्य बोध उप-
रति हीं तिन्ही ही अनेक जन्मार्जित पुण्य परिपाके करून ज्या पुरुषाचे गायीं अ-
सतील तो थोर अधिकारी हें त्यास महत्तपाचें फळ होय॥ या त्रयांग साहाय्यत्वें
करून ज्ञानाग्नि दग्धपटवत् शेष प्रारब्ध मोहकार्य राहिला जो देह भर्जित बीजव-
त् तत्पातपर्यंत दृश्य दुःखतिरोधान होऊन त्या पुरुषवर्याची बुद्धि जीवन्मुक्त सुखें
ब्रह्मानंदीं समरस राहून नंतर प्रारब्धक्षयें उपाधिलय होतांच ब्रह्मींच लीनत्व पावे
ल॥ स्वतांच तो केवळ शिवकल्याण परमानंद रूपच ऐसा जाणावा २ वैराग्य बोध
उपरति या त्रयामध्यें बोधास प्राधान्यत्व म्हणजे मुख्यत्व ऐसें जाणावें॥ कारण
कीं बोध साक्षात् मोक्षप्रद म्हणून या हेतूस्तव मुख्य जाणावा॥ इतर वैराग्य आ
णि उपरम हे उभय बोधोपकारी म्हणजे बोधाचीं अंगें ऐशीं जाणावीं ३ आतां
कोणी अधिकारी जे त्याच्या ठायीं वैराग्य बोध उपरति या त्रयांतून दृढाचा प्र
तिबंध म्हणजे वैराग्य उपरति नसून दृढ बोधच परिपक्व आहे॥ अथवा बोध
नसून वैराग्य उपरतीच दृढ आहे त्याचें लक्षण आणि फलिन ही सांगें ४ त्या मु
मुक्षूस निरवळ वैराग्य आणि उपरति ऐशीं दोन्ही परिपक्व असतात॥ तिसरा बोध

साहाय्य नाहीं तरी तें तप झालें॥ त्याचें फळ त्यास पुण्यलोकप्राप्ति होईल ऐसें जा
णावें २३ ज्या पुरुषास एक बोधच परिपक्व असंभावना विपरीत भावना रहित दृ
ढ आहे॥ आणि वैराग्य उपरति हे दोन्ही नाहींत॥ तरी त्यास बोधाचें फळ मोक्षनि
श्चयें होईल परंतु दृश्यदुःखाचा नाश तिरोधानता होऊन जीवन्मुक्ति सुखवि
ना वैराग्य उपरम सहाय असल्यावेरीज होणार नाहीं॥ यास्तव मुमुक्षु जो
त्यास वैराग्य बोध उपरति हे तिन्हीही सहाय असावे २४ त्रयाचीही अवधि म्ह
णजे सीमा कोठ पर्यंत तेंही कळावयास सांगों॥ वैराग्याची अवधि म्हणजे ब्र
ह्मलोकादि इहामुत्र विषयाची उपेक्षा काकविष्टा किंवा शूकरवमनवत् निःशे
ष अपेक्षाच नाहीं तीच वैराग्याची सीमा ऐसी जाणावी २५ बोधावधि कैसा तें
ही सांगों॥ बोधाचा अवधि म्हणजे जैसी देहाच्या ठायीं दृढबुद्धि की मी देहम
ष्य कृश स्थूल गौर श्याम अंध पंगु इत्यादिक हे सर्व अज्ञान कल्पितता दात्म्य
निरसोन॥ मी शुद्ध आत्मा स्वप्रकाश ब्रह्मस्वरूप ऐसा दृढबुद्धीचा निश्चय-
झाला म्हणजे तीच बोधाची सीमा ऐसी जाणावी॥ यदर्थी आणिकही लक्षण
सांगों २६ अहं म्हणजे मी आत्मा कदाही देहेंद्रियमन अहंकारादिक नव्हेच॥ तो
साक्षित्वें सच्चिदानंद परिपूर्ण अखंडानंद शिवकल्याणरूप ब्रह्मस्वरूपचें

च मी सत्य यदर्थी संमति श्री आचार्य वचनेंही आहेत तींही ऐकावीं २७ श्लोक॥ नाहंदेहोनेंद्रियाणि नमनोनैवहंकृतिः॥ सच्चिदानंद रूपोहंपरिपूर्णोसदाशिवः॥१ नाहंदेहोजन्ममृत्युकुतोमेनाहंप्राणः क्षुत्पिपासाकुतोमे॥ नाहंचित्तंशोकमोहौ कुतोमेनाहंकर्ताबंधमोक्षौकुतोमे॥२॥ अहंनिर्विकल्पो निराकाररूपोविभूत्यादि सर्वत्रसर्वेंद्रियाणां॥ नमेसंचितंनैवभोक्तावचोमिश्चिदानंदरूपंशिवोहंशिवोहं ॥३॥ अजोहमजरोहं प्राज्ञोहं प्रत्यागात्मबोधोहं॥ परमानंदमयोहं परमशिवोहंस्व वामि परिपूर्णः॥ ४॥ ऐसा निःसंशय जो बोध तीच बोधाची सीमा ऐसी बोलिजे ॥ आतांउपरतीचा अवधि कैसा तेंही सांगों २८ उपरतीचा अवधि म्हणजे सर्व विषय वासनेचा नाश सुषुप्तिवत् विस्मरण ते उपरतीची सीमा जाणावी॥ एवं पूर्वोक्त वत् साधन चतुष्टय वैराग्य बोध उपरति युक्त निरंतर अभ्यासें शनैः शनैः नाम रूपाध्यास निरसोन ब्रह्मानंदीं वृत्तीस समाधि निर्वात स्थलदीपवत् निर्विकल्प दशा आणि समाध्यादिकांसही सर्व साक्षी चिदात्मा मीच होय ऐसा दृढतर निश्च य बाणे तों पर्यंत अभ्यास युक्तच असावें २९ आतां अंतःकरणांतील रजतमात्म क मळ निःशेष क्षालन होऊन सर्वोत्कर्षे दृढ स्थैर्यता ब्रह्मानंदीं व्हावी आणि भं दाधिकारी जो याची अभ्यास द्वारें अंतःकरण शुद्धि हीन वांगली होऊन त्यास बोध

सिद्धि दृढतर व्हावी म्हणोन षडविध समाध्याभ्यास सांगत होत्साता प्रथम शि
ष्यशंका उत्थापन करीजेतो हे ३० आशंका ॥ ओव्या ॥ शिष्य म्हणे जी दयाघना ॥
सद्गुरुस्वामी दीनपावना ॥ मी एक आशंका पुसें आपणा ॥ तरी त्या वचना ऐकावें ३१
निर्वातदीपाचेपरी ऐसी ॥ चित्तासी स्थिति बाणे कैसी ॥ हें तर चंचळ निश्चयेसी ॥ वा
युवेगेंसी फिरतसे ॥ २ ॥ मी तरी आपुले कृपेंकरून ॥ बुद्धिपर आत्मा विलक्षण ॥ साक्षी
चैतन्य असेची आपण ॥ परी हें वणवण चित्त करी ॥ ३ ॥ रजतमवृत्या बहुतेक ॥ काम
क्रोधलोभादिक ॥ युक्त होवोनि अनेक ॥ भोगीत दुःखदिनरजनीं ॥ ४ ॥ गोड गोड
अन्नें खावीं ॥ वस्त्रें भूषणें प्राप्त असावीं ॥ कोणी हीनिंदा न करावी ॥ इत्यादि स्व-
भावीं बहु इच्छा ॥ ५ ॥ ऐसें वासना युक्त चित्त ॥ क्षणक्षणा वृत्ति धांवत ॥ यासीं नि
र्वातदीपवत् ॥ स्थिति हे प्राप्त होय कैसी ॥ ६ ॥ ये आशंकेचें निरसन ॥ करूनि करा
वें समाधान ॥ जेणें मन हें आनंदघन ॥ स्वरूपीं रमोन समरसें ॥ ७ ॥ ऐसी आशंका
ऐकोनी ॥ बोले सद्गुरु कैवल्यदानी ॥ म्हणसी यथार्थ तव वाणी ॥ दुर्जय करणी मना
ची ॥ ८ ॥ परी ऐसें हीजरी मन ॥ तरी योगी वश करिती आपण ॥ लावूनि स्वरूपा
नुसंधान ॥ स्वरूपीं निमग्न करिताती ॥ ९ ॥ अगा यया चित्तापत्ती ॥ स्वरूपस्मर
णेंतुजनिश्चिती ॥ तरी वैराग्यादिसंपत्ती ॥ अढळस्थिती असावी ॥ १० ॥ यापरी

लौकिकधनदौलत॥ नश्वरमानुनीवमनवत्॥ नैराश्यकरूनियांचित्त॥ हरिभ
क्तियुक्तअसावें॥११॥ मगश्रीसद्गुरुकृपेंकरून॥ ब्रह्माभ्यासीयुक्तमन॥ एका
ग्रहृदयींकरावेंजाण॥ तेंहीलक्षणपरियेसी॥१२॥ निरुपद्रवएकांतीं॥स्थलअसा
वेंपवित्रअती॥ जेथेंबैसतांचित्तवृत्ती॥ चंचलनिश्चितीनहोय॥१३॥ विध्युक्तआ
सनीबैसोन॥हृदयींएकाग्रकरावेंमन॥ इंद्रियद्वाराबाह्यगमन॥ कदाहीजाणहो
नद्यावें॥१४॥ अगासवेंद्रियांतून॥ कुशलत्वेंनिएकवटून॥ हृदयाकाशींआ
णून॥ युक्तिनेंजाणस्थिरकरी॥१५॥ ज्याज्यादृश्यविषयाचेठायीं॥ सक्तताध-
रूनिधांवेपाही॥ नेथेंवैराग्यविवेकबळेंनिश्चर्या॥ निरीच्छकरावीनश्वरत्वें॥१६
जीजीधांवेबाह्यवृत्ती॥ तयेसिआणुनिमागुती॥ हृदयावकाशींअढळस्थिती॥
स्वरूपगतनिश्चितीकरावी॥१७॥ ऐसाअभ्यासनित्यकरितां॥ हळुहळुस्थिर
ताबाणेलचित्ता॥ मगआपेआपस्वरूपींतत्वता॥ समरसहोतांसुरवेपावे॥१८
तेथेंहृदयावकाशींवृत्ती॥निरालंबींस्फुरोनिमागुती॥ पुनःचिदाभासस्वहनि-
श्चिती॥ होयसमरसतीस्वस्वरूपीं॥१९॥ तेथेंजीवब्रह्मैक्यपावे॥ हेंअनायासें
चहोयस्वभावें॥ संसारदुःखादिनाठवे॥ सुखचीअघवेंदुमदुमित॥२०॥ ऐसि
याअभ्यासेंकरून॥ ब्रह्माकारत्वपावेमन॥ यदर्थीसंदेहनधरीजाण॥

हीलक्षण अवधारी ॥२१॥ तेथें तुझ्या मनोवृत्ती ॥ ज्याज्या कल्पिती विषयाप्रती ॥
त्यात्या दृश्यत्वें निरसोनि निश्चिती ॥ साक्षित्वा प्रती स्वस्त असीजे ॥२२॥ तुजपासू
नियां वृत्ती ॥ उठुनी मावळती निश्चिती ॥ उभयसाक्षी तूं आत्मज्योती ॥ वृत्या आ
दि अंतीं ज्ञानत्वें ॥ २३॥ वृत्याचे आदि मध्य अवसानीं ॥ तूं ज्ञानात्मा भरंवसेनी ॥
अढळ असशी हें जाणोनी ॥ दृश्य निरसोनी सुखी असीजे ॥२४॥ अशुद्ध वृत्तीचे
उमाळे ॥ निरसोनि शुद्ध वृत्तीचे बळें ॥ मग तेही वृत्ति स्थिरत्व मेळें ॥ स्वरूपीं मिळत
द्रूप ॥२५॥ जैसी अग्निज्वाळा निश्चिती ॥ जाळूनि अशेष कर्पूरा प्रती ॥ आपणही
पांवे शांती ॥ अस्पष्ट व्यक्ती निजकारणीं ॥२६॥ तैसी अज्ञान अशुद्ध वृत्ती ॥ तें
जाळूनि शुद्ध ज्ञान वृत्ती ॥ आपणही निमग्न स्वरूपस्थिती ॥ होय चिन्मूर्ति ब्रह्मरू
प ॥२७॥ ज्ञानाऽज्ञान विहीन ॥ अभिन्न जें का शुद्ध ज्ञान ॥ तेंचि आपण ऐसें जाणो
ना ॥ सुखी सुखघन असावें ॥२८॥ नेणिव आणि जाणिव ॥ ज्ञानाऽज्ञान भावा
भाव ॥ या विरहित स्वयंमेव ॥ सुखस्वभाव अनादि ॥२९॥ आणिक एक तुज सां
गुन ॥ सुगम आणि सुखकर जाण ॥ निर्विकल्प समाधि खुण ॥ ऐक सांगेन ज्याची
॥३०॥ पूर्व विकल्प निमोनि जातां ॥ यावत् अन्या चा उदय न सर्वथा ॥ मध्यवर्ती जे नि
र्विकल्पता ॥ ते स्पष्टत्वता ज्ञान ब्रह्म ॥ ३१॥ ऐसें जाणावया दृढतर ॥ ऐक संगति

थोरथोर॥ जेणेंनिर्विकल्पसत्वर॥ समाधिसाचारस्पष्टकळे॥३२॥ ॥संमति
घुवाक्यवृत्ति॥ श्लोक॥ नष्टेपूर्वविकल्पेतु यावदन्यस्यनोदयः॥ निर्विकल्पक
चैतन्यंस्पष्टंतावद्विभासते॥ ५॥ एकद्वित्रिक्षणेष्वेवंविकल्पस्यनिरोधनं॥ क्र
मेणाभ्यसतांयत्नात्ब्रह्मानुभवकांक्षिभिः॥ ६॥ ॥टीकाशिवरामस्वामी॥ ॥
पूर्वीलजोमतिविकल्पनिमोनिगेला॥ जोअन्यवृत्तिगुणहीउदयानआला॥ तो
निर्विकल्पनृहरीजिविचाविसावा॥ चिन्मात्रकेवळअसानिवडुनिघ्यावा॥ ७॥
निरोधेंकरीएकदोंतीक्षणाचा॥ अभावचिहोयविकल्पादिकोचा॥ हरिप्राप्ति
व्हावीअशीआर्तज्यासी॥ तिहींहाचिअभ्यासकीजेमनासी॥ ८॥ ॥संम
तिपरमामृत ओव्या॥ कांहींचनस्फुरतांआधीं॥ जेस्वस्तअसेअनादी॥ ते-
चिज्ञानाचीआदी॥ ज्ञप्तिमात्र॥ १॥ तेनिष्कलंकज्ञानघनानंद॥ आपणचिआ
पणस्वतसिद्ध॥ निजस्वरूपविशुद्ध॥ स्वसंवेद्य॥ २॥ जेजाणचीजाणने॥ ह्म
णोनिनाहींतेथेंनेणनें॥ तेंआपणाआपणएकपणें॥ नेणनाजाणा॥ ३॥ तेंपरि
पूर्णएकलें॥ ह्मणोनिदिसावेंहेंखुंटलें॥ घनानंदकोंदाटलें॥ स्वस्वरूप॥ ४॥दि
सतेंतेंदूसरें॥ तेंहीजेथेंसरे॥ मगदेखणेंचीउरे॥ तेंतयाकेनिदिसे॥ ५॥ देखणें
चिदेखणें॥ ह्मणोनितयासीतेंपाहेंनेणें॥ जेंजाणस्वलेंतेंविरसणें॥ येरतेंतेंची

॥६॥ दृश्य द्रष्टादर्शन॥ यातिहीं भावाविलक्षण॥ एकलेची आपण॥ ज्ञप्तिमात्र॥
॥७॥ दृश्य दर्शन हरपे॥ तेथें उरिजे स्वरूपें॥ अखंडित आपणपें॥ निरामय॥८॥
जायलया सर्वही दिसणें॥ तेथें खुंटलें देखणें॥ मग देखणा आपुलिये खुणें॥ सदो
दित॥९॥ तें आपणची आपण॥ अविनाश परिपूर्ण॥ ऐसें ओळखणें परतोन॥
स्वस्वरूप॥१०॥ नेणिवेचा निरासें॥ कारणशरीर नाशें॥ जाणीवही समरसें॥ महा
कारणीं॥११॥ सुषुप्ति आणि तुर्या॥ प्राज्ञ प्रत्यगात्मा अभिमानिया॥ विश्व तैजस
सुगेलिया॥ जागृति स्वप्नकैचें॥१२॥ एवं देहचतुष्टयाचा निरासु॥ करूनि जाणि
जे अविनाश॥ तंव आपणचि स्वयंप्रकाशु॥ ज्ञानघन॥१३॥ सांडुनि आपुले जाणि
वेसी॥ जैसे स्वरूपणें उगाराहसी॥ तैकाय आहे माजाणसी॥ निःसंगपणें॥१४॥ जेव्हां
जाणिवेतें सांडिलें॥ तेव्हांची स्फुरण खुंटलें॥ उठलेठायींलया गेलें॥ तुजमाजी॥१५
जाणीव शून्यासहित॥ तुजमाजी सामावत॥ तोतूं अपरमित॥ स्वयंभमूर्ती॥१६॥
ऐसें हें अभ्यासणें॥ अंतरींचे अंतरीं जाणणें॥ निश्चळस्वरूपीं स्थिरावणें॥ कीजेय
नाचें॥१७॥ ऐसें करितां मनविरमे॥ विषयव्यापार शमे॥ मगचित्तरमे॥ कांहीं कां
हीं स्वरूपीं॥१८॥ विसरे प्रकाशें स्वरूप॥ हरपे सांपडे आपेआप॥ ऐसा करितां साक्षे
प॥ मगस्थिरावे॥१९॥ निवांत भोगी स्वरूप॥ डुल्लतु आनंदें आपेआप॥ मगतया

सुस्वासीमाप॥ कवणकरी॥२०॥ ॥चूर्णिका॥ ऐसेंइत्यादि संमति करून निर्वि
कल्पसमाधीचें लक्षण कथिलें तें एकाग्र मनन करून अभ्यासें मनोवृत्ति तदाका
र करीजे ३२ ओव्या॥ आतां समाधिजोत्याची परिपक्वता॥ दृढबाणावयातवचिता
॥ आणिकहीलक्षणेंतत्वता॥ समाध्यवस्थाऐकसांगों॥ ३३॥ अरेसमाधीचे विचा
रेंकरून॥ दोंप्रकारीं असेलक्षण॥ एकतेसविकल्पअनुसंधान॥ दुसरेजाणनि
र्विकल्प॥ ३४॥ त्यांतसविकल्पजोकासमाधी॥ तोही दोप्रकारीगासद्वृत्ती॥ एक
तोदृश्यानुविद्धविशद्धी॥ शब्दानुविद्धदुसरातो॥ ३५॥ एवंसविकल्पीभेददोन
॥ निर्विकल्पतोएकआपण॥ ऐसेसमाधिप्रकारतीन॥ असतीजाणक्रमेंची॥ ३६
त्याभयाचीहींलक्षणें॥ अंतर्बाह्यषडविधपणें॥ असतीगाभयासीगणनें॥ षड
विधह्मणोंसमाधीतो॥ ३७॥ हृदयांतरींभयहोती॥ बाह्यहीतैसेचिभय असती
॥ एवंषडविधलक्षणोक्ती॥ होयगणतीसमाधीसी॥ ३८॥ एतदर्थीमुख्यप्रमाण
॥ श्रीभगवान्शंकराचार्यआपण॥ वाक्यसुधाग्रंथींलक्षण॥ बोलिलेजाणसमा
धीचें॥ ३९॥ तरीतेआचार्याचेश्लोक॥ कैसेंह्मणसीतरीऐक॥ त्यांचीसंमतिकरू
निदेख॥ समाधिसम्यकसांगतों॥ ४०॥ त्यांतसविकल्पह्मणजेकाय॥ निर्विकल्प
तोकैसाहोय॥ उभयस्वरूपाचानिर्णय॥ विषदान्वयऐकसांगों॥ ४१॥ तरीप्रथ

मतासविकल्पक॥ समाधिलक्षणजेंका एक॥ दृश्यानुविद्धगासम्यक॥ निरोपूंऐक
श्लोकार्थें॥ ४२॥ ॥संमतिवाक्यसुधा॥ श्लोक॥ कामाद्याश्चित्तगादृश्या स्तत्साक्षित्वेनचेतनं॥ ध्यायेदृश्यानुविद्धोयंसमाधिःसविकल्पकः॥ १॥ टीकाश्रीपान पात्र॥ इच्छादिकमनोवृत्तित्यादृश्या साक्षिआपण॥ ऐसेंध्यावेंदृश्यमिश्रसविकल्पसमाधिहा॥ १॥ ॥चूर्णिका॥ कामसंकल्प संदेहादिक पूर्वोक्तवृत्तिज्यात्याअंतःकरणनिष्ठहोत॥ अंतःकरणाच्यावृत्ति ह्मणून,अतएवत्यादृश्यहोत॥ त्यांचा प्रकाशक प्रत्यकरूपआपणातेंचिंतावें३३ इच्छासंकल्पादिक मनोवृत्तिज्यात्याम-ध्येंएककवृत्तीचें साक्षीभूत चैतन्यतेंचआपुलेंयथार्थस्वरूप॥ तस्मात्याकामाचेंसाक्षीभूतचैतन्य मीच होय॥ यासंकल्पाचा साक्षी प्रत्यगात्मा जो तेंच माझें यथार्थस्वरूप होय॥ याप्रकारें निरंतर प्रत्यक् रूप चिन्मात्रआपणातें चिंतावें॥ ह्मादृश्यानुविद्धसविकल्पसमाधि बोलिजे॥ या प्रकारें दृश्यानुविद्धसमाधीतेंदृशेंवून आतां शब्दानुविद्धसमाधितें बोलतों३४ श्लोक॥ असंगःसच्चिदानंदस्वप्रभोद्वैतवर्जितः॥ आस्मीतिशब्दविद्धोयंसमाधिः सविकल्पकः॥ ३॥ टीकापानपात्र॥ निर्लेपसच्चिदानंदस्वप्रकाशअभेदमी॥ आहेऐसाशब्दानुविद्धसविकल्पसमाधिहा॥ २॥ चूर्णिका॥ संगरहितसत्यज्ञानानंदस्वरूपअसंग

काशस्वगतादि भेद रहित प्रत्यक् रूप जो साक्षी तो मी आहें ऐसें निरंतर भावावें ॥ हा शब्दानुविद्ध सविकल्प समाधि होय॥ ह्मणजे कामादि सकल वृत्ति विस्मयकर्ता असंगादि श्रुति मात्र मिश्री भूत प्रत्यक् चिन्मात्र निष्ठ जो विजातीय प्रत्यय रहित स जातीय प्रत्यय प्रवाह लक्षण अनुभवितां शब्दानुविद्ध सविकल्प समाधि बोलिजे ॥ एवंच द्विविध सविकल्प समाधीतें दर्शऊन॥ आतां कामादि दृश्यातें असंग इत्यादि श ब्दातेंही मिश्र न करितां ॥ केवळ निर्वात स्थित दीपाचे परी चित्त निश्चलता रूप नि- र्विकल्प समाधीतें बोलतो ३६ श्लोक॥ स्वानुभूतिरसावेशाद्दृश्यशब्दानपेक्षिनः॥ निर्विकल्पसमाधिस्थान्निर्वाताचलदीपवत् ॥२॥ ॥टीकापानपान॥ स्वरूपा नुभवानंदें दृश्यशब्दतउपेक्षून॥ निर्वातदीपवत् वर्त्ते निर्विकल्पसमाधि हा॥ २॥ ॥चूर्णिका॥ स्वरूप साक्षात्कार रूप परमानंद निमग्नत्वें कामादि दृश्यपदार्थातें आणि असंग इत्यादि शब्दातेंही उपेक्षिना ह्मणजे दृश्य प्रपंचातें किंवा श्रवणातें ना स्मर्य न जाणत होत्साता पूर्णानुभवी जो त्यास वात रहित स्थळीं वर्तला जो दीपज्व सा तसा जो समाधि तो निर्विकल्प समाधि होय २ समाधि ह्मणजे स्वानुभवसं दाविर्भाव लक्षण महाभूत जें त्यानें यासित्याचे परी पराधीनत्वें॥ स्वनिष्ठ्यनुसं धान रहित केवळ निर्वात दीपाचे परी निश्चळ वर्तणें तो निर्विकल्प समाधि ह्मणा

वा॥ यास असंप्र ज्ञात समाधि ऐसेंबोलताहेत ३८ याप्रकारें हृदयामध्यें त्रिविधस
माधीतें दर्शविलें॥ आतां प्रथम बाह्य दृश्यानुविद्ध समाधीतें बोलतों ३९ श्लोक॥ हृ
दीव बाह्य देशेपियस्मिन्कस्मिंश्च वस्तुनि॥ समाधिराद्यःसन्मात्रान्नामरूपनिरा
कृतिः॥३॥ ॥टीकापानपात्र॥ वस्तुमात्रींनामरूपावेगळेंब्रह्मजाणणें॥ बाहे
रहादृश्यविद्धसमाधिहृदयींजसा॥३॥ चूर्णिका॥ जसेंहृदयाचे ठायीं साक्षी
स्वरूपाहून कामादिक वृत्तीचें पृथक्करण हा दृश्यविद्ध समाधि होय॥ तद्वत्हृद
याहून बाहेर ही जे कोणी वस्तुमात्र त्याचे ठायीं वर्तमान सच्चिदानंद लक्षण ब्र
ह्म जें त्याहून नामरूपाचें पृथक्करण हा दृश्यविद्ध समाधि होय॥ ह्मणजेजसें
अंतःकरणीं कामादिक वृत्तीमध्यें एकेक वृत्तीतें आपल्याहून वेगळें करूनत्या
कामाचें साक्षीभूत जें चैतन्य तेंच मी होय॥ या संकल्पाचें साक्षी चैतन्य जें तेंच
मी आहें ऐसें अनुचिंतन जें तो दृश्यविद्ध समाधि बोलिजे जैसा॥ तद्वत् अंतः
करणाहून बाह्य प्रदेशींही स्वाभीष्ट एकेक वस्तूचे ठायीं वर्तमान सच्चिदानंद
रूप ब्रह्म जें त्याहून नामरूपातें पृथक्करून त्यो नामरूपातें अधिष्ठान भूत स
च्चिदानंदरूप वस्तु जे तेंच तत्पद लक्ष्य ब्रह्मरूप होय ऐसें जें अनुचिंतन तो द
श्यविद्ध समाधि जाणावा ४० याप्रकारें दृश्यानुविद्ध बाह्यसमाधीतें दर्शवून आ

तांसमस्त दृश्य पदार्थ प्रपंच विलापक शब्दानुविद्ध समाधितें निरोपितो ॥श्लोक ॥ अखंडैकरसंवस्तुसच्चिदानंदरूपकं ॥ इत्यवच्छिन्नरूपोयंसमाधिर्मंत्र्यमो भवेत् ॥ ४॥ ॥टीकापान० ॥ सत्यज्ञानानंदवस्तु निर्विकार अखंडजें ॥ तेंब्रह्म चिंतिजैनित्य शब्दविद्धसमाधि हा ॥ ४॥ चूर्णिका ॥ स्वगतादि भेदरहित कालत्र यीं एकरूप सच्चिदानंद लक्षण जे वस्तु तेंच ब्रह्म निरंतर चिंतिजे तो शब्दानु विद्ध समाधि होय ४२ या प्रकारें ब्रह्म विषयक द्विविध सविकल्प समाधीतें निरा पून आतां पूर्वोक्त समस्त दृश्य शब्द विलय कारी निर्विकल्प समाधीतें दाख वीत होत्साता उक्त षडविध समाधि योगें काळ कंठावा ऐसें बोलतो ४३ श्लोक ॥ स्तब्धीभावो रसास्वादात्तृतीयःपूर्ववन्मतः ॥ एतैःसमाधिभिःषड्भिर्नयेत्कालंनि रंतरं ॥५॥ ॥टीकापानपांच ॥ स्थिरतापूर्ववद्ब्रह्मानंद येणें तृतीयतो ॥ साहा समाधिहे याहिकंठावाकाळसंतत ॥५॥ चूर्णिका ॥ अंतर्गत त्रिविधसमाधीचा विषय भूत जोसाक्षी तो ब्रह्मरूप होय सच्चिदानंद रूप ह्मणून ॥ एवंच बाह्य त्रिविधसमाधीचा विषय ऐसें जें ब्रह्म तें आत्मा साक्षी जो तद्रूप होय सर्वात्मा ह्मणून ॥ या प्रकारें आपणास परब्रह्म रूपत्व सिद्ध म्हणून स्वरूपत्व घडलें ४४ रस ह्मणजे परमानंद त्याची जे अनुभूती तो रसास्वाद तेणेंकरून ह्मणजे द्विविध

सविकल्प व निर्विकल्प समाधि परिपाकें ब्रह्मानंदाचा लाभ जो तेणें करून पूर्वोक्त
निर्विकल्प समाधिवत् व्यष्टि समष्ट्यात्मक समस्त दृश्य प्रपंचातें ॥ आणि एक अ
द्वितीय इत्यादि शब्द झाला तें उपेक्षून केवळ ब्रह्मानंदीं स्थिरावलें चित्त जें त्याची
निर्वात स्थित दीपाचे परी जे निश्चलता तो बाह्य निर्विकल्प समाधि जाणिजे ४५ या
प्रकारें हें उक्त लक्षण साहास समाधि जे यांहीं निरंतर काळ कंठावा ॥ ह्मणजे दीर्घ
काळ अखंडाऽभ्यास करावा मुमुक्षु जो तेणें ॥ एवं या प्रकारें निरंतर षडविध स
माधि अभ्यास करितां चित्तास अति स्थैर्यता होऊन ब्रह्मानंदीं समरस ह्मणजे त
दाकारच होतें तें निरोपिलें ॥ आतां ऐसा निर्विकल्प समाधि अभ्यास करीत होत्या
ता हा समाधि जो यास प्रथम लय विक्षेप कषाय रसा स्वाद ऐसीं चार विघ्नें भास-
होताहेत ॥ त्याचें वैराग्य विवेक बळें निराकरण करून, समाधि दृढ साधावा ह्मणोन
त्या विघ्नांचीं लक्षणें कळावयास शास्त्रोक्त प्रमाणें संक्षेपें सांगेन ते ऐक ४६ प्रथम
विघ्न लय लय ह्मणजे सुषुप्ति अखंड ब्रह्मानुसंधानीं वृत्ति धारणा धरितां ब्रह्मा
कारत्व पावण्याचे संधीस निद्रा उत्पन्न होऊन वृत्ति अज्ञानांत लीन होते ॥ ऐसा
निद्रारूप विघ्न अल्प अभ्यासें तमोगुण योगें उत्पन्न होते ॥ त्यास दृढ अभ्यासें
सत्वगुण बळें या विघ्नांचा नाश करून वृत्ति निर्विकल्प ब्रह्मानंदीं स्थिरावली ॥

आतां विक्षेप दुसरें विघ्न कैसें तेंही सांगों ४७ द्वितीय विघ्न विक्षेप॥ विक्षेप म्हणजे एकाग्रवृत्ति अखंड ब्रह्माकार करितां तत्समयीं कल्पना उत्पन्न होऊन वृत्ति बाह्य प्रपंचाकार होते॥ आत्मसुख गोडी विसरोन दृश्य चिंतन अवलंबिते॥ हेंचि विक्षेपविघ्न ऐसें जाणावें॥ हेंही अवैराग्यें करून विक्षेप होतो तो तीव्र वैराग्य धारणें करून याचा नाश करावा॥ आतां तृतीय विघ्न कैसें तेंही सांगों ४८ तृतीय विघ्न कषाय॥ कषाय म्हणजे एकाग्र चित्त वृत्ति ब्रह्माकार होत्साता तत्समयीं विषयाकार वृत्ति होते. अंतर्यामीं विषयाची जी परम प्रीति तो वासना रूप संस्कार सूक्ष्म मनांत स्फुरतो॥ तेणें करून वृत्ति स्तब्ध होते॥ तेथें विक्षेपना निद्रा ना स्वरूप सुख हे तिन्ही ही नसोन विषय राग संस्कारें वृत्ति स्तब्धच होऊन राहते॥ वैराग्य बळें विक्षेप ही गेला आणि अभ्यास बळें लय ही निरसला॥ परंतु सूक्ष्म मनीं विषय प्रीति जी राहिली तेणें स्तब्धत्व झालें जे वृत्तीस त्यास कषाय विघ्न ऐसें बोलावें॥ याचा ही नाश वैराग्य बळेंच करावा॥ आतां चतुर्थ विघ्न रसास्वाद कैसा तोही ऐकें ४९ स्वस्वरूपाकार चित्त वृत्ति होत्साता तत्समयीं प्रथम स्वरूपानंद सुख वृत्तींत बिंबोन मी सुखरूप ऐसें स्फुरते॥ अखंडानंत रूपीं ज्ञाता ज्ञान ज्ञेय भाग नसतांही भिपुटी रूप कल्पना वृत्तींत वाटते॥ ते रसास्वादन विघ्न चतुर्थ ऐ

सें जाणावें॥ हें निर्विकल्पसमाधीस विघ्न तरी होय परंतु लय विक्षेप कषाया सा
रिखें अति घातक नव्हे॥ अभ्यास बळें या द्वारेंच निर्विकल्पीं स्थैर्यता होते॥ एवं
ऐसी निर्विकल्पसमाधि जो त्यास विघ्नें चत्वार प्राप्त होतात॥ तीं तुज कळावीं ह्म
णून विषद निरूपिलीं॥ या विघ्नांचा निरास न करितां जे वृथाच एकांत सेवन क
रितील ते दांभिक ऐसे जाणावे ५० ओव्या॥ ऐसें निर्विकल्पब्रह्मानंदवर्म॥ जाणू
न धरीजे दृढ प्रेम॥ अभ्यासें वृत्ति उपरम॥ कीजे नित्यनेम धरोनियां॥ ४३॥ कोणी
एक म्हणती ऐसें॥ अभ्यासाचें कारणच नसे॥ ज्ञान कळल्यावरी काय सें॥ अभ्या
स पिसें मनासी॥ ४४॥ तरी ये विषयींचें उत्तर॥ संमति मुरवेंगा सत्वर॥ देईजेल ऐ
केंसादर॥ अभ्यास दृढतर कळावया॥ ४५॥ श्री निगमसारींवामन॥ बोलिले अभ्यास माधान्य॥ त्या अभ्यासाचें कांहीं लक्षण॥ तन्मुखीं चें निरूपण ऐकसांगों॥
॥ ४६॥ ॥ संमति निगमसार ओव्या प्रकरण ७॥ अभ्यासें बाणे स्थिती॥ अ
भ्यासें सरवची भासी॥ जे अभ्यास निषेधिती॥ ते शब्दज्ञानी दांभिक॥ १॥ आत्मा
नव्हे बद्ध मुक्त॥ उपाधी हूनि विभक्त॥ परी निषेध अभ्यासा चा अयुक्त॥ सर्वज्ञ
ऐसें बोलती॥ २॥ विस्मरण अथवा स्मरण॥ दोहीवेगळें ब्रह्म आपण॥ दोन्ही कुरी
सचतिणें जाण॥ ब्रह्माकार व्हावें अभ्यासें॥ ३॥ मी देहचि मी प्रत्यक्षपणें॥ तिसरी

गोष्टीबुद्धिनेणें॥ ब्रह्मविस्मरणेंबाणें॥ आयतीदेहात्मता ॥४॥ गृहस्थसंन्यासी ॥ मनींआठवीस्त्रियेसी ॥ रेतस्स्खलतातयासी॥ प्रायश्चित्त॥५॥ मोडावयापूर्वसंस्कार॥ सन्यासीयानेंवारंवार ॥ मीसन्यासीहेंनिरंतर ॥ आठवावें॥६ ज्ञानझालेंजयास॥ तोनकरीअभ्यास॥ पूर्वसंस्कारत्यास॥ मागतीअविद्येचा ॥७॥ आवरणरूपेंगेलीं॥ विक्षेपरूपेंअविद्याउरली॥ नकरितांअभ्याससंचरली॥ हृदयींबहुतांच्या॥८॥ विनाअभ्यासेंबुद्धिभ्रंश॥ हृदयींनराहेउपदेश॥ आठवितांहीहोतीप्रवेश॥ संदेहाचे॥९॥ हृदयींजयाचासंशय॥ त्याससिद्धिहोईलकाय॥ अभ्यासावांचूनिहोय॥ अनर्थऐसा॥१०॥ कारणयेथअभ्यास॥ त्यासमाहिजेदृढविश्वास॥ जोंवरीयेअनुभवास॥ ब्रह्मानंद॥११॥ ब्रह्मानंदींचित्तबुडे॥ योगभ्रंशतेव्हांनघडे॥ तोंपर्यंतआलीकडे॥ श्रद्धाअसावी॥१२॥ उपदेशपडिलाकानीं॥ अभ्यासनधरीमनीं॥ अनुभवीनव्हे शब्दज्ञानी॥ तोजाणावा॥१३ नलगेयेथवायुधरणें॥ अथवानलगेलौकीककरणें॥ स्वरूपाकारअंतःकरण॥ तोचीयोग॥१४॥ योगाचाअभ्यास॥ करितांअत्यंतआयास॥ योगसिद्धिमुकादिकांस॥ भक्तियोगें॥१५॥ सगुणतितुकेंनिर्गुण॥ ब्रह्मसर्वत्रपाहणेंजाण॥ सर्वात्मभावेंशरण॥ शुकादिक॥१६॥ भक्तियोगजोंम्हणावा॥ तोचिसविशेषयो

गजाणावा॥ विश्वरूप आत्मा भजावा॥ तोचि योग॥१७॥ येणें जरी समाधि पाव
ला॥ तरी जीवन्मुक्तची झाला॥ चित्त नावरतां आरंभिला॥ सर्वात्मयोग॥१८॥
सर्वात्मकत्वें स्मरतां॥ निर्विशेषीं होय स्थिरता॥ साधकासीं या करितां॥ योगदी
न्ही बोलिले॥१९॥ अभ्यासीं उठे कल्पना॥ तेव्हां आवरून शके मना॥ आठवावी
ब्रह्मांडरचना॥ सर्व ब्रह्म या भावें॥२०॥ जें आठवे तेंची ब्रह्म॥ तेथें ची वृत्ती चा उपर
म॥ न घडे वृत्ति उगम॥ स्वरूपावांचून॥२१॥ तंतु वांचूनि यां पट॥ मृत्तिके वांचूनि
यां जैसा घट॥ नदिसे तैसें मनें उत्कट॥ ऐसें स्मरावें संस्कारें॥२२॥ ऋग्वेदीं वर्णि-
ला प्रलय॥ तेव्हां ब्रह्म अद्वय॥ मनें स्मरतां ब्रह्ममय॥ चित्त होय मागुती॥२३॥ ऐ
सेन ही न व्हे स्थिर॥ तरी पुन्हा मागुति चराचर॥ मनीं आठवावें सादर॥ भगवद्भावें
॥२४॥ सुवर्ण सर्वांलंकारीं॥ ब्रह्मतेसें चराचरीं॥ दृष्टी आधीं सुवर्णावरी॥ ते-
व्हां दिसती भूषणें॥२५॥ ही गुरुकृपेची किल्ली॥ जोंवरी असे मनीं धरिली॥ सर्व
ब्रह्म ऐसी ठसावली॥ बुद्धि राहे तोंपर्यंत॥२६॥ ऐसें विश्वमूर्ती चें ध्यान॥ करणें ब्र
ह्मानुसंधान॥ स्वस्वरूपीं चित्त सावधान॥ तोचि योग सविशेष॥२७॥ चित्त धांवे
जेथें जेथें॥ आत्मा स्फुरे तेथें तेथें॥ व्यापक आत्मा परंतु तेथें॥ चित्तें करूनि अनु
भव॥२८॥ चित्त जेथें पावलें॥ आत्मत्व तेथें असे पडिलें॥ ऐसें जेव्हां कळों आलें॥

तेव्हांसर्वत्रआपण॥२९॥ चित्तहोयचैतन्यव्यापक॥ सचराचरींआपणएक॥ऐ
सेंफुकाचेंकौतुक॥ पाहतांयोगसिद्धी॥३०॥ व्यापकत्वऐसेंकळे॥ चित्ततेव्हांपांगु
ळें॥ मगस्वरूपींहूननढळे॥ योगीयांचें॥३१॥ आठवितांचराचर॥ चैतन्यदिसे-
अनंतअपार॥ ज्योचैतन्यींविश्वविस्तार॥ चित्तासींगवसे॥३२॥ तेंचैतन्यतेंचि
आपण॥ धरूनिऐसीदृढखुण॥ अकारमात्रस्मरण॥ सोडोनिद्यावें॥३३॥ करू
निउफराटीवृत्ती॥ आपणांतआपणऐसीस्मृती॥ जोंपर्यंतवृत्तिनउठती॥ समा
धितोंपर्यंत॥३४॥ निमिषापासूनिजितकाकाळ॥ स्थिरताअधिकतितकास्फ
काळ॥ तोंवरीसमाधिजोंवरीविटाळ॥ नव्हेकल्पनेचा॥३५॥ आपणआपणाचें
स्मरण॥ व्यापकआत्माऐसीखुण॥ जेंआठवावेंतेथेंआपण॥ तरीकल्पनामगके
ची॥३६॥ जरीउठलीकल्पना॥ सोडूनयेअनुसंधाना॥ कल्पनेचाअधिष्ठाना॥
स्मरतांतेहीनराहे॥३७॥ पुतळ्याचीविणकरी॥ वस्त्रांतविणितीनानापरी॥ पा
हतांवस्तुदुसरी॥ नदिसेतंतुवांचुनी॥३८॥ त्याचवस्त्रींदुसरीकडे॥ नतेदृष्टीस
रचनापडे॥ प्रत्यक्षवृत्तींततैसीसांपडे॥ निर्विशेषता॥३९॥ तंतुमानावेअधिष्ठा
ना॥ पटाकारबुद्धीची कल्पना॥ प्रतिमापाहतांप्रपंचरचना॥ तंतुपाहतांवस्त्रत्व
॥४०॥ वस्त्रस्फुरतेंपाहतां॥ प्रतिमाविणल्यास्यादेखतां॥ जेउफराट्यास्फोनि

ती ॥ त्यासदिसेतंतुमात्र ॥ ४१ ॥ कांहींउठतांकल्पना ॥ अवलोकावेंअधिष्ठाना ॥ ते
प्रत्यक्षवृत्तींतरचना ॥ नदिसेतेथेंप्रपंचाची ॥ ४२ ॥ ऐसीकल्पनानिवारी ॥ चित्तचै
तन्यींआवरी ॥ तरीयाअभ्यासींलौकरी ॥ समाधिसिद्धी ॥ ४३ ॥ दृढआत्मतत्वनि
श्चयावीण ॥ समाधिसिद्धनव्हेचिजाण ॥ ह्मणोनिब्रह्मैवसर्वनिरूपण ॥ संमतिक
रूनऐकसांगों ॥ ४४ ॥ रज्जुसर्वदाअसे ॥ मिथ्यासर्पकेव्हांहिनसे ॥ सर्पाकारदृष्टीस
दिसे ॥ तोहीदोर ॥ ४५ ॥ हासर्पऐसेंह्मणावें ॥ तोतरीरज्जुअसेस्वभावें ॥ तैसीं
चराचरांनांवें ॥ अवघेंब्रह्म ॥ ४६ ॥ देहासहितचराचर ॥ नाममात्रहेआकार ॥
अकारमात्रींनिर्विकार ॥ अवघेंब्रह्म ॥ ४७ ॥ जळाभासदेखतीनेत्र ॥ बुद्धिह्मणे
हेंकिरणमात्र ॥ इंद्रियांसीविश्वभावेंविचित्र ॥ बुद्धिह्मणेहें परब्रह्म ॥ ४८ ॥ ऐसी
सर्वब्रह्मव्याप्ती ॥ श्रीरामदासहीबोलिलेनिश्चिती ॥ दासबोधादिश्रेष्ठग्रंथीं ॥ तेही
संमतीऐकावी ॥ ४७ ॥ ॥ सं॰ दास॰ ओ॰ ॥ ब्रह्मनभाहूनिनिर्मळ ॥ पाहतांते
सेंचिपोकळ ॥ अरूपआणिविशाळ ॥ मर्यादावेगळें ॥ १ ॥ एकवीसस्वर्गसप्त पा
ताळ ॥ मिळोनिएकब्रह्मगोळ ॥ असेअनंततेनिर्मळ ॥ व्यापूनिआहे ॥ २ ॥ अ
नंतब्रह्मांडारचालते ॥ अनंतब्रह्मांडावरुतें ॥ तेणेविणस्थळरितें ॥ जेथुमात्रना
हीं ॥ ३ ॥ जळींस्थळींकाष्ठींपाषाणीं ॥ ऐसीवदेव्यासवाणी ॥ तेणेविणरितापाणी

एकहीनाहीं ॥ ४॥ जळचरासींजैसेंजळ॥ बाह्यअभ्यंतरींनिरवळ॥ तैसेंब्रह्महेंके
वळ॥ जीवमात्रासी ॥ ५॥ जळावेगळाठाव आहे ॥ ब्रह्माबाहेरजातांनये ॥ ह्मणो
निउपमानसाहे ॥ जळाचीतया॥ ६॥ आकाशाबाहेरपळोंजातां ॥ पुढें आकाश
चीतत्वता ॥ ऐसेंतयाअनंता ॥ अंतचीनाहीं ॥ ७॥ परीजेंअखंडभेटलें ॥ सर्वां
गासीलिगटलें॥ अतिनिकटपरीचोरलें ॥ सकळासीजें ॥ ८॥ तयामध्येंचिअसीजे
॥ परीतयासीनेणिजें॥ उमजेभासनुमजे ॥ परब्रह्मतें॥ ९॥ आकाशामध्येंअ
भाळ॥ तेणेंआकाशवाटेडहुळ ॥ परीतेंमिथ्यानिवळ॥ आकाशची असे॥ १०
॥ न्याहाळदेतांआकाशीं॥ चक्रेंदिसतीडोळियांसी ॥ तैसेंदृश्यज्ञानीयासी॥
मिथ्यारूप॥ ११॥ मिथ्याचपरीआभासें ॥ निद्रिस्थासींस्वप्नजैसें ॥ जागाझालि
याअपैसें॥ बुझोंलागे॥ १२॥ तैसेंआपुलेनि अनुभवें ॥ ज्ञानेंजागृतीसियावें॥ म
गमायीकस्वभावें ॥ कळोंलागे॥ १३॥ आतांअसोहेकुवाडे॥ जेब्रह्मांडापळीक
डे॥ तेचिआतांनिवाडे ॥ उमजूनिदाऊं॥ १४॥ ब्रह्मब्रह्मांडींकालवलें ॥ पदार्थमा-
त्रासिव्यापूनिठेविलें ॥ सर्वांमध्येंविस्तारलें॥ संचलेपणें ॥ १५॥ ब्रह्मामध्येंसृष्टि-
भासे॥ सृष्टीमध्येंब्रह्मअसे॥ अनुभवघेतांअभासे॥ अंशमात्र ॥ १६॥ अंशमात्रें
सृष्टिभीतरी॥ बाहेरमर्यादाकोणकरी ॥ सगळेंब्रह्मब्रह्मांडोदरीं॥ माईकैसें॥

॥१७॥ घटामध्यें आकाश॥ सगळें सांठवतां प्रयास॥ म्हणोनि तयाचा अंश॥ बोलिजेतें ॥१८॥ ब्रह्मतेसें कालवलें॥ परीतें नाहीं हालवलें ॥ सर्वांमध्यें परिसंचलें॥ संचलेपणें॥१९॥ पंचभूतीं असे मिश्रित॥ तरीते पंचभूतातीत॥ परीतें आकाश अलिप्त॥ असो निजेसें॥२०॥ ब्रह्मासी दृष्टांत न घडे॥ बुझावया देणें घडे॥ परी दृष्टांतीं साहित्य पडे॥ विचारितां आकाश॥२१॥ काढिमानसतां पितळ॥ मगतें सोनेंची केवळ॥ तैसें शून्यत्वनसतां निवळ॥ आकाशचि ब्रह्म॥२२॥ आकाशा ऐसें नाहीं थोर॥ आकाशसकळा हूनि सार॥ पाहतां आकाशाचा विचार॥ स्वरूपासारिखा॥२३॥ ॥आशंका॥ तरी शिष्यें केला अक्षेप॥ दोहींचें सारिखेंचि स्वरूप॥ तरी आकाशचि स्वरूप॥ कांम्हणोनि नये॥२४॥ आकाशस्वरूपाकवणभेद॥ पाहतांदिसती अभेद॥ आकाशवस्तूचि स्वतसिद्ध॥ कांन म्हणावी॥२५॥ वस्तु अचळ अढळ॥ वस्तु निर्मळ निश्चळ॥ तैसेंचि आकाश केवळ॥ वस्तुसारिखें॥२६॥ ऐकोनि वक्ता बोलेवचन॥ वस्तु ठायींची निर्गुण॥ आकाशा अंगीं शब्दगुण॥ शास्त्रीं निरोपिला॥२७॥ कामक्रोधशोकमोहो॥ भयअज्ञानशून्यत्वपाहाहो॥ ऐसा सत्त्वविधस्वभावो॥ आकाशाचा॥२८॥ ऐसें शास्त्रकार बोलिले॥ म्हणोनि आकाश तत्त्व झालें॥ स्वरूपनिर्विकार संचलें॥ उपमेरहित॥२९॥ अद्वैतपाहतां कल्पनेसी

॥ सारिखेंचवाटेनिश्चयेसी ॥ परीआकाशस्वरूपासी ॥ भेदआहे ॥३०॥ उन्मनि
आणिसुषुप्तिअवस्था ॥ सारिखेचिवाटेतत्वता ॥ परिविवंचूनिपाहतां ॥ भेदआ
हे ॥३१॥ काचबंदी आणिजळ ॥ सारिखेंचि भासेकेवळ ॥ परिएककाचएकजळ ॥
शहाणेजाणती ॥३२॥ तैसेंआकाशआणिस्वरूप ॥ पाहतांवाटतीएकरूप ॥प
रीदोहींमध्येंविवेक ॥ शून्यत्वाचा ॥३३॥ सोनेंआणिसोनपितळ ॥ दोन्हीएकचवा
टतीकेवळ ॥ परीपितळेसिमिळतांज्वाळ ॥ काळिमाचढे ॥३४॥ आतांअसोहेदृ
ष्टांत ॥ आकाशम्हणिजेकेवळभूत ॥ तेंभूतआणिअनंत ॥ एकचैसा ॥३५॥
वस्तुसींवर्णचिनसे ॥ आकाशश्यामवर्णअसे ॥ दोहींसीसाम्यताकैसे ॥ करितील
विचक्षण ॥३६॥ श्रोतेम्हणतीकैचेंरूप ॥ आकाशठायींचेंअरूप ॥ आकाशवस्तु
तद्रूप ॥ भेदचिनाहीं ॥३७॥ चौभूतांसींनाशआहे ॥ आकाशकैसेंनासताहे ॥
आकाशासींनसाहे ॥ वर्णव्यक्तिअकार ॥३८॥ आकाशअचळदिसतें ॥ त्याचें
कायनासोंपाहातें ॥ पाहतांआमचेनिमतें ॥ आकाशशाश्वत ॥३९॥ऐसेंऐको
निवचन ॥ वक्ताबोलेप्रतिवचन ॥ ऐकाबापालक्षण ॥ आकाशाचें ॥ ४०॥ आ-
काशअनुभवायेतें ॥ स्वरूपअनुभवापरतें ॥ म्हणोनियांआकाशातें ॥ ऐक्यता
नघडे ॥४१॥ आकाशावेगळेंपहावें ॥ स्वरूपींस्वरूपचिन्हावें ॥ वस्तुपाहाणेंस्व

भावें॥ ऐसें असे॥४२॥ आकाशस्तब्धपणें शून्य॥ शून्य म्हणिजे अज्ञान॥ अज्ञान
पणें कठिण॥ रूपतया चें॥४३॥ अज्ञानें काम क्रोधादिक॥ मोहो भय आणि शोक
॥ हा अज्ञान अविवेक॥ आकाश गुणें॥४४॥ आकाश तमापासोनि झालें॥ म्हणोनि
काम क्रोधें वेष्टिलें॥ अज्ञान शून्य बोलिलें॥ याकारणें॥४५॥ अज्ञान काल वलें आ
काशीं॥ तया कर्दमा ज्ञान नाशी॥ म्हणोनि यां आकाशासी॥ नाश आहे॥४६॥
कठिण शून्य विकारवंत॥ तया सिकैसें म्हणावें संत॥ मना सि वाटे हें तत्त्व॥ अ
ज्ञा च दृष्टि॥४७॥ रुवा मध्यें स्फटिक पडिला॥ लोकीं तद्रूप चि देखिला॥ तेणें
कपाळ मोक्ष केला॥ का पूस न करी॥४८॥ गुळा सारिखा गुळदगड॥ परी तो क
ठिण निवाड॥ नागकांडी आणि वेरवंड॥ एक म्हणों नये॥४९॥ असो हे ती न दृष्टां
त॥ बोलिलों कळावया संकेत॥ आतां भूत आणि अनंत॥ एक म्हणों नये॥५०॥
दुग्धा सारिखा जळांश॥ निवडूं जाणती राजहंस॥ तैसें स्वरूप आणि आकाश॥
संत जाणती॥५१॥ सकळ मायोद्भवांगों वी॥ संत संगें हे उगवावी॥ पावीजे मो
क्षाची पदवी॥ सत्समागमें॥५२॥ ॥ऐसें चि श्रीरामन॥ बोलिले निगम सारीं
आपण॥ आकाश ब्रह्म न से चि जाण॥ तेंही निरोपण ऐकावें॥४८॥ ॥ संमति निगम
सार ओव्या॥ ऐसी कल्पना करावी॥ नरी पांच भूतें न म्हणावीं॥ चारी भूतें मा

नावीं ॥ पांचवेंब्रह्म ॥१॥ कोणीम्हणतीआकाश ॥ ब्रह्मतेंहाचिआवकाश ॥ ब्र
ह्मांडाचासमावेश ॥ याचमध्यें ॥२॥ दृष्टीसजेंजें दिसतें ॥ तेंतें अवघेंनासतें ॥
आकाशकैचेंवांचतें ॥ प्रलयकाळीं ॥३॥ ब्रह्मसर्वांसदिसे ॥ तरीकांहोत्यांसमु
क्तिनसे ॥ दिसोनकांहोननासे ॥ अज्ञानत्याचें ॥ ४ ॥ म्हणतीगगनींकांहींचनसे
॥ त्याकरितांकायदृष्टीसदिसे ॥ युक्तिबोलतीऐसें ॥ नकळोनी ॥ ५ ॥ हेंचिआका
शजरीब्रह्म ॥ तरीकांवेदवृथाकरितीश्रम ॥ किमर्थकरावेनानाधर्म ॥ ब्रह्मप्रत्य
क्षदिसतां ॥ ६ ॥ लोकऐसेंबोलती ॥ याकारणेंवेदाचीप्रवृत्ती ॥ वेदविरुद्धकल्पना
करिती ॥ तेवेदबाह्य ॥ ७ ॥ एवंइत्यादिसंमतिकरून ॥ आकाशब्रह्मम्हणती
कोण ॥ तयाच्यामताचेंनिरसन ॥ केलेंजाणप्रसंगेंची ॥ ४९ ॥ मनासीसमाधिदा
ढर्यता ॥ बाणावयाब्रह्मैक्यता ॥ म्हणोनिसर्वब्रह्महें प्रतिपादितां ॥ नभाचिद्भिन्न
ताकथियेली ॥ ५० ॥ असोआकाशादिकातेंव्यापून ॥ अंतर्बाह्यचैतन्यपूर्ण ॥ व्या
प्तचिअसेसंमतिकरून ॥ ऐकनिरूपणपुन्हाही ॥ ५१ ॥ ॥ संमतिदोसबोध
ओव्या ॥ ॥ असोऐसीमायामायीक ॥ शाश्वततेंब्रह्मएक ॥ पाहोंजातांअने
क ॥ व्यापूनिअसे ॥ १ ॥ पृथ्वीसभेदूनिआहे ॥ परीतेंब्रह्मकठिणनव्हे ॥ दुजी उ
पमानसाहे ॥ तयांमृदुत्वासी ॥ २ ॥ पृथ्वीहूनिमृदुजळ ॥ जळाहूनिमृदु अनळ ॥

अनळाहूनिकोमळ॥ वायुजाणावा॥३॥ वायुहूनितेंगगन ॥ अत्यंतचिमृदुजाण॥
गगनाहूनि मृदुपूर्ण॥ब्रह्मजाणावें॥४॥ वज्रासी असे भेदिलें॥ परीमृदुत्वना
हींगेलें॥ उपमेरहितसंचलें॥ कठिणनामृदु॥५॥ पृथ्वीमध्यें व्यापूनिअसे॥ परी
पृथ्वीनाशेतेंननाशे॥ जळशोषेतेंनशोषे॥ जळींअसोनियां॥६॥ तेजींअसे-
परीजळेना॥ पवनींअसेपरीचळेना॥ गगनींअसेपरीकळेना॥ परब्रह्म तें॥७॥
शरीरअवघेंचिव्यापिलें॥ परीतेंनाहीं अडळलें॥ जवळीच असोन दुजावलें॥
नवलकैसें॥८॥ सन्मुखचीचहूंकडे॥ तयामध्यें पाहाणें घडे॥ बाह्य अभ्यंतरीं
रोकडे॥ सिद्धची आहे॥९॥ तयेमध्येंचिआपण॥ आपणास बाह्यतें जाण॥ हें
श्यावेगळीरचूण॥ गगनासारिखी॥१०॥ कांहींनाहींसेंवाटलें॥ तेथेंतेंची कोंदा
टलें॥ जैसेंनदिसेआपुलें॥आपणासीधन॥११॥ जोजो पदार्थ दृष्टीपडे॥तेत्याप
दार्थीआलीकडे॥ अनुभवें हेकुवाडे॥ उकलावे॥१२॥ मागेंपुढेंआकाश॥ पदा
र्थवीणजोपैस॥ पृथ्वीवीणजैसा अवकाश॥ एकरूप॥१३॥ जेंजें रूप आणि
नाम॥ तोतो नाथिलाची भ्रम॥ नामरूपातीतवर्म॥ अनुभवेंजाणावें॥१४॥ न
भींधूम्राचेडोंगर॥ उचलतीथोरथोर॥ तैसीदावीवोडुंबर॥ मायादेवी॥१५॥
ऐसीमायाअशाश्वत॥ ब्रह्मजाणावेंशाश्वत॥ सर्वठायींसदोदित॥ भरलेंअ

से॥१६॥ पोथीवाचूंजातांपाहे॥ मातृकामध्येंतेचिआहे॥ नेचींरिघोनियांराहे॥
मृदुपणें॥१७॥ श्रवणींशब्दऐकतां॥मनेंविचारपाहतां॥ मनासबाह्यतत्वता॥
परब्रह्मतें॥१८॥चरणींचालतांमार्गीं॥ जेंआढळेसर्वांगीं ॥ करेंघेतांवस्तुलागीं॥ -
आडवेंब्रह्म॥१९॥असोइंद्रियसमुदाव॥ तयामध्येंवर्तेसर्व॥जाणोंजातांमोडेहाव
॥इंद्रियांची॥२०॥ तेंजवळीचअसे॥पाहोंजातांनदिसे॥नदिसोनीअसे॥कांहींए
क॥२१॥दिसेनातरीकायझालें॥ परंतुतेंसर्वचसंचलें॥ सूक्ष्मचिकोंदाटलें॥जेथीं
च्यातेथें॥२२॥ दृष्टीसलागलीसवें॥जेंदिसेलतेंचिपाहावें॥परंतुगुजतेंजाणावें॥
गोप्यआहे॥२३॥प्रगटजाणावेंअसार॥आणिगुप्ततेंजाणावेंसार॥ गुरुमुखेंहाविं
चार॥ उमजोंलागे॥२४॥पृथ्वीनव्हेआपनव्हे॥ तेजनव्हेवायुनव्हे ॥वर्णव्यक्तिऐसें
नव्हे॥अव्यक्ततें॥२५॥जेंशस्त्रेंतोडितांतुटेना॥ जेंपावकेंजाळितांजळेना॥ काल
वितांकालवेना ॥आपेंकरोनी ॥२६॥ जेंवायूचेनिउडेना॥ जेंपडेनानाझडेना॥जें
घडेनानाद्दडेना॥ परब्रह्मतें ॥२७॥ ज्यासीं वर्णचिनसे॥जेंसर्वांहूनिअनारिसें
॥परंतुअसतचीअसे॥सर्वकाळ॥२८॥वेदविरिंचिआणिशेष॥ जेथेंश्रीणलेनिःशे
ष॥तेंचीसाधावेंविशेष॥परब्रह्मतें॥२९॥तरीतेंकोणेपरीसाधावें ॥ तेंचिबो
लिजेलस्वभावें॥अध्यात्मश्रवणेंपावावें॥ परब्रह्मतें ॥ ३० ॥ धरूंजातांधरितां

नये॥ टाकूंजातांटाकितांनये॥ जेथेंतेथेंआहेचआहे॥ परब्रह्मतें ॥३१॥ जिकडेति
कडेजेथेंतेथें॥ विन्मुखहोतांसन्मुखहोते॥ सन्मुखहोतांचुकेनातें॥ कांहींकेल्या
॥३२॥ बैसलेंमाणुसउठोनगेलें॥ तेथेंआकाशचीराहिलें॥ आकाशचहूंकडेपाहि
लें॥ तरीसन्मुखचिआहे॥३३॥ जिकडेप्राणीपळोनिजातें॥ तिकडेआकोशचिभो
वतें॥ बळेंआकाशाबाहीरतें॥ कैसेंजावोंपाहे॥३४॥ जिकडेजिकडेप्राणीपाहे॥
तिकडेसन्मुखचिआहे॥ समस्तांचेमस्तकींराहे॥ माध्यान्हींमार्तंडजैसा॥३५॥
परीतोआहेएकदेशी॥ दृष्टांतनघडेवस्तूसी॥ कांहींएकचमत्कारासी॥ देऊनिपा
हिला॥३६॥ नानातीर्थींनानादेशीं॥ कष्टेतजावेंपाहावयासी॥ तैसेंनलगेपरब्रह्म
सी॥ बैसलेचठायीं॥३७॥ प्राणीबैसोनिराहतां॥ अथवाबहुतपळोंजातां॥ परब्र
ह्मतेतत्वता॥ समागमें॥३८॥ पक्षीअंतराळींगेला॥ भोंवतेंआकाशचितयाला॥
तैसेंब्रह्मप्राणियाला॥ व्यापूनिआहे॥३९॥ ब्रह्मपोकळघनदाटा॥ ब्रह्मशेवटाचा
शेवट॥ ज्यासीत्यासीब्रह्मनीट॥ सर्वकाळ॥४०॥ दृश्यासबाह्याभ्यंतरीं॥ ब्रह्म
दाटलेंब्रह्मांडोदरीं॥ अरेत्याविमळाचीसरी॥ कोणासीद्यावी॥४१॥ वैकुंठकैला
सींसत्यलोकीं॥ इंद्रलोकींचौदालोकीं॥ पन्नगादिपातळलोकीं॥ तेंचि आहे॥
॥४२॥ काशीपासोनिरामेश्वर॥ अवघेंदाटलेंअपार॥ परतेअरतेपारावार॥

सीनाहीं॥ ४३॥ परब्रह्मतेंएकलें॥ एकदांचसकळांसिव्यापिलें॥ सकळांसीस्पर्शोनि
राहिलें॥ सकळाठायीं॥ ४४॥ परब्रह्मपाऊसेंभिजेना॥ अथवाचिरवलाचेनिभरेना
॥पुरामध्येंपरिवाहेना॥ पुरासमागमें॥ ४५॥ एकसरेसन्मुखविन्मुख॥ वामस-
व्यदोहींकडेएक॥ अधोर्ध्वमाणिसकळिक॥ व्यापूनि आहे॥ ४६॥ संतसाधुमहानु
भावा॥ देवदानवमानवा॥ ब्रह्मसकळांसिविसावो॥ विश्रांतिठाव॥ ४७॥ स्थूळन
व्हेसूक्ष्मनव्हे॥ कांहींएकसारिखेंनव्हे॥ ज्ञानदृष्टीवीणनव्हे॥ समाधान॥ ४८॥ पिं
डब्रह्मांडनिरास॥ करोनिपाविजेनिराभास॥ येथूनतेथवरीअवकाश॥ भकाश
रूपी॥ ४९॥ ऐसेचिश्रीरंगनाथादिसंत॥ श्रीवासिष्टसारादिटीकेंत॥ ब्रह्मेवसर्वम्
तिपादित॥ तेहीसंमतश्रवणकरी॥ ५२॥ ॥संमतिश्रीरंगनाथओव्या॥ ब्रह्मतें
स्वर्गमृत्युपाताळभुवनी॥ पुरोनिउरलेंसेनिर्वाणीं॥ सर्वत्रसर्वदेशींभरोनी॥ कोंद
लेंअसे॥ १॥ ब्रह्मस्वर्गमृत्युपाताळ॥ ब्रह्मपर्वतादिकुळाचळ॥ भूर्भुवःस्वर्लोकपा
ळ॥ ब्रह्मनिर्मळचोदाभुवनें॥ २॥ पुत्रमित्रकळत्रादिसर्व॥ एकब्रह्मचिअसेस्वयमे
व॥ देहेंद्रियादिदृश्यभव॥ ब्रह्मतेंसर्वसर्वरूपें॥ ३॥ जेंजेंऐकसीदेखसी॥ जेंकींदृ
श्यमात्रजाणहृषीकेशी॥ देशविदेशपृथ्वीआकाशीं॥ ब्रह्मचोपाशींसर्वत्र॥ ४॥स
र्ववेदशास्त्राचामथितार्थ॥ सर्वब्रह्महाफलितार्थ॥ ब्रह्मावेगळेंकोणीपदार्थ॥ ना

हींनिश्चितजाणतूं॥५॥ मीतूंजो इत्यादिव्यवहार॥ चित्स्वरूपब्रह्मचनिर्विकार॥
आणितिन्हीलोकचराचर॥ ब्रह्मनिरंतरचिद्रूपत्वें॥६॥ शुद्धाशुद्धतेंब्रह्मरूपभासे
॥ बरेंवाईटतितुकेंब्रह्मचिअसे॥ किंबहुनाघटपटादिठसे॥ तेस्वयंभअसेपरब्रह्म
॥७॥ ब्रह्मावेगळेंअणुमात्रही॥ नभासेविश्वींआणिदेहीं॥ देहोचिदेहपणेंतेथेंनाहीं
॥नदेखोंकांहींब्रह्मेंवीण॥८॥ ब्रह्मचिमनबुद्धिप्राण॥ इंद्रियेंसर्वहीब्रह्मपूर्ण॥ ब्र
ह्मचिदेहविदेहजाण॥ संकल्पनपरब्रह्म॥९॥ मनाचेंमनपणसंकल्पन॥ तेतेंजा
णब्रह्मपूर्ण॥ बुद्धिबुद्धीचेंबद्धव्यपण॥ चिदानंदघनसदोदित॥१०॥ मनहेंब्रह्मीं
लीनकीजे॥ मनमनपणायेऊंनदीजे॥ इतुकेनिमुक्तचिसहजे॥ येथेंनधरीजेसंश
यकांहीं॥११॥ ॥संमतिएकनाथओव्या॥ गुणभूतेंविषयकरणें॥ जीवभो
क्तासुखदुःखपणें॥ ज्ञानक्रियाकर्माचरणें॥हेंसर्वहीजाणणें पूर्णब्रह्म॥१॥ सारख
रेचाफणसप्रबळ॥ तेथेंकांटेत्वचाबीजगोळ॥ अवघासारखरचिकेवळ॥ तेविब्र
ह्मचिसकळजगदाकारें॥२॥ जगविश्वप्रपंचनाम॥ परीतेंनिरखळपरब्रह्म॥ हाउ
पनिषदार्थउत्तम॥ वेदांतीपरमपरमार्थहा॥३॥ जेथेंजेथेंसाधकाचेंजायमन॥ ते
थेंतेथेंब्रह्मपरिपूर्ण॥ मननिघावयातेथून॥ रितेंस्थान असेना॥४॥ ऐसेंकरितां
अनुसंधान॥ चैतन्यींसमरसेंमन॥ यातेंह्मणिजेपुष्कळज्ञान॥ उपदेशपूर्णयत्न॥

व॥५॥ तेव्हांमी एकू येथें॥ भगवद्रूपेंपाहे भूतें॥ हेहीवृत्तिहरपेतेथें॥ देखेसभों
वतेंपरब्रह्म॥६॥ परब्रह्मदेखतीवृत्ती॥ तेहीविरेब्रह्माअतौती॥ जेवीघृतकणिका
घृतीं॥ होतीसुनिश्चिती घृतरूप॥७॥ तेव्हांचिब्रह्मपरिपूर्ण॥ हेहीस्फूर्तिनुरेजा
ण॥ गिळूनियांमीतूंपण॥ ब्रह्मींब्रह्मपण अहेतुक॥८॥ समुद्रींमिळतांलवण॥
समुद्रचिहोयआपण॥ तेवीआत्मनिश्चयेंबुद्धिपूर्ण॥ चैतन्यघनस्वयेंहोय॥९॥
आत्म्यावेगळाकांहीं॥ तिळभरीरिताठावनाहीं॥ यापरिपूर्णत्वेंपाही॥ जन्मतेठा
यींस्पर्शेना॥१०॥ ॥संमतिनिगमसारओव्या॥ ब्रह्मांडआवरणासहित॥अ
भ्यासेंयोगीव्यापीचित्त॥ त्याहीपुढें अनंत॥ आत्मचैतन्य॥१॥ ऐसाअभ्याससं
स्कार॥ स्वरूपींधरीचित्तविस्तार॥ पसरेतोतोअनंतपार॥ राहेतदाकारहोऊ
नी॥२॥ चित्तविस्तारेंपसरे॥ पसरतांपसरणेंहिसरे॥ अनंतत्वेंअनुभवउरे॥
घटाकाशजैसाआकाशीं॥३॥ आत्माअनंतअपार॥ हाहीशब्दातीतसंस्कार॥
तदाकारीसंकोचविस्तार॥ नस्फुरतीदोन्ही॥४॥ आत्मत्वाचेंस्फुरण॥ स्वरूपाकार
अंतःकरण॥ त्रिपुटीचेंनस्फुरेभान॥ ध्याताध्यानतेध्येय॥५॥ चित्तजेव्हांवृत्ति
शून्य॥ध्येयध्यातानदिसतीअन्य॥ अनुभवाआलेंशुद्धचैतन्य॥ आनंदकोशते
समयीं॥६॥ वृत्तीऐसीअंतर्मुख॥ करितांनाठवेकांहींआणिक॥ तेव्हांजाणावेंब्र

ह्मसकटंक ॥ अनुभवा आलें ॥७॥ कल्पनेची लहरी नाहीं ॥ मननिमग्न चैतन्य डोहीं ॥
स्वरूपाचांचूनि नाठवे कांहीं ॥ तेचि उन्मनी ॥८॥ निर्वातजेंका स्थळ ॥ दीपतेथें नि
श्चळ ॥ तेथेंचे उदकीं नसेडळमळा ॥ बहुतरंग कांहीं ॥९॥ तैसेंजेव्हांवृत्तिशून्य ॥ चित्त
चैतन्यदोन्ही अनन्य ॥ सत्तामात्र आत्मचैतन्य ॥ अनुभवा आलें निधर्मता ॥१०॥ नि
जधर्मसमाधितोहोया ॥ तोचिकोश आनंदमय ॥ येऊंलागलेवरिविक्षेपलय ॥ अ
भ्यासतेव्हांबोलिला ॥११॥ लयनिद्रेसह्मणती ॥ विक्षेपह्मणिजे कल्पनाउठती
॥ यादोंवेगळी आत्मस्फूर्ती ॥ तोसमाधी ॥१२॥ केवळ आत्मप्रतीती ॥ नातेस्मृति
नातेविस्मृती ॥ तेसदोदित आत्मस्थिती ॥ तोआनंदाचा अनुभव ॥१३॥ अभ्या-
सीं घेतली गोडी ॥ चित्तचैतन्यातें नसोडी ॥ आधींचि आत्मयाची आवडी ॥ त्याकरि
तांशिरमिया ॥१४॥ ऐसा अनुभव आपला ॥ जेसमयीं स्थिरता पावला ॥ तोएकपक्ष
बोलिला ॥ मोदशब्दें ॥१५॥ चित्तऐसेंनिश्चळ ॥ समाधीचा वाढला काळ ॥ सुखाचा
झाला सुकाळ ॥ तोपक्ष दुसरा प्रमोद ॥१६॥ प्रकर्षेकरूनि मोद ॥ त्यासह्मणा
वेंप्रमोद ॥ प्रमोदह्मणजे आनंद ॥ ह्मणिजे अनंदफार ॥१७॥ जेथेंसर्ववृत्तिशून्य
॥ अनुभवीं उरे आत्मचैतन्य ॥ साधकऐसा जेव्हांधन्य ॥ होताआनंदमयशुद्ध ॥१८
॥ एवं इत्यादिसंमती ॥ येथें लिहाव्यातरी किती ॥ सिद्धांत हाचिगा निश्चिती ॥ ब्रह्मे

वजगतींसर्वही ॥५३॥ ऐसियाब्रह्मबोधेंकरून॥ तदाकारत्वपावेमन॥ परमानं
दींहोयनिमग्न॥ तेंसर्वहीलक्षणनिरोपिलें ॥५४॥ परमानंदींनिमग्नहोतां॥ स्वरू
पानंदहृदयींदाटतां ॥ तेसुखचिन्हेंबाह्यतत्वता॥ देहींसर्वथाप्रगटहोती ॥५५
स्तंभरोमांचउभारती ॥ स्वेदकंपस्वरभंगहोती ॥ नेत्रींआनंदाश्रुस्रवती ॥ वै
वर्ण्यादिप्रगटतीअष्टभाव ॥५६॥ ॥संमतिश्लोक॥ स्तंभःस्वेदोथरोमां
चःस्वरभंगोथवेपथुः ॥ वैवर्ण्यमश्रुप्रलयमित्यष्टौसात्विकामताः ॥ १॥ इत्या
दिअष्टसात्विकभाव॥ चिन्हप्रगटेंगाअपूर्व ॥परमानंदसुखस्वभाव॥ चित्तासीं
निजभावजेंप्राप्त ॥ ५७॥ चित्तहोयचैतन्यघन॥ सर्वही विसरेप्रपंचभान॥ कदा
हीननिघवेतेथून॥ होयनिमग्नमहासुखीं ॥५८॥ तयासुखाचासुखस्वाद॥
बोलतांनयेचीअनुवाद॥ अलौकिकतोसुखानंद ॥ अनुभविजेंमुद्दलींसी-
कळे ॥५९॥ तयासुखाचेठायीं॥ अनुभाव्य अनुभवितांनिःशेषनाहीं ॥ स्वसं
वेद्यकैवल्यपाही ॥ स्वताचनिश्चयीयोगिराज ॥६०॥ स्वात्मसुखाचीहोतांभासी
॥ मगस्वर्गादिसुखेंतुच्छहोती॥ जेवीकाअमृताचियेतृप्ती॥ कडूस्लनावडती
रसकोण्ही ॥६१॥ ॥चूर्णिका ॥ ऐसा ब्रह्मसुखानंद योगी जो त्यास विषया
वांचूनही अंतर्यामीं परम तृप्ति असते. तीव्र वासना विषय सुखाचे ठायीं ना

हीं प्रारब्धयोगें विषय नसले अथवा असले तथापि तो तृष्णारहितच ऐसा जाणावा ॥ आतां ज्यास विषयस्फरवाची अंतर्यामीं परम भीति असून बाह्य लौकिकार्थ मात्र विषयाची मुखें निंदा करितो, त्याचें मन ब्रह्मानंदीं निमग्न नाहीं तो दांभीकच ऐसा ओळखावा ॥ ३८ ॥ इतिश्रीस्वात्मबोधग्रंथ ॥ श्रवणेंपुरतीमनोरथ ॥ श्रीरघुनाथचरणींअध्यायस्फनिश्चित ॥ मौनीस्थापितनवम हा ॥ ९ ॥ ॥ ७ ॥ ॥ ७ ॥ ॥ ७ ॥

इतिस्वात्मबोधे नवमोध्यायः समाप्तः ७

श्रीगणेशायनमः॥ ॥आतां यावरी शिष्य ह्मणे गुरुवर्या जीवन्मुक्त सदा तृप्त असतो त्याचें लक्षण विशद करून दारवा॥ यावरी सद्गुरु बोलतात कीं एकाग्र चित्तें श्रवण कर॥ जीवन्मुक्तास परम तृप्ति असते त्याचीं लक्षणें कांहीं अल्प विस्तारें सांगों १ जीवन्मुक्त ह्मणजे एवंभूत पूर्वोक्त समाधि अभ्यास योगें जन्याचें मन ब्रह्माकारत्वें बहुधा वृत्तिशून्यत्वे पावून स्वतः ब्रह्मरूपत्वें जो पावला तोच जीवन्मुक्त बोलिजे २ ऐसा स्वरूपानंद परिपूर्णब्रह्मस्वरूप योगी जो त्याचा मनोवृत्ति विशेष संकल्प विकल्पात्मक दृश्य चिंतना विषयीं जो काम तयाचा नाश होतो ३ संसार दुःखाचे स्वरूपानंद ज्ञानेतिरोधान होऊन वृत्ति शून्यस्वरूपीं स्वरूप रूपच असतें ४ योगी स्वतः आपणच परब्रह्म संकल्प विकल्पात्मक मन जें त्यास अभ्यासें दृढ परिपक्कतेनें ब्रह्माकारत्व जालियानंतर पुनः त्यास साधन किंवा असाधन॥ धारणा किंवा ध्यान एकांत किंवा लोकांत॥ समाधि किंवा असमाधि आसन किंवा निरासन हा नेम कांहींच नाहीं॥ तो सर्वगत परमात्मा च ऐसा जाणावा ५ हेंच दृढ कळावयास संमति मुखें सांगों तें ऐक॥ ॥संमति श्लोक॥ सर्वब्रह्ममयंयस्यनतस्यपृथगस्तिवै॥ एकांतसेवनंव्यर्थंव्यर्थंमौनादिसाधनं॥१॥ ॥टीकाश्रीरंगनाथओव्या॥ प्रतीतिनामरूपऐसें॥ दृश्य

सत्यपणेंकदानभासे॥ दृष्टीतरीसाचारेंऐसेंदिसे॥ जैसेंकाभासेमृगजळ॥१॥
भ्रांतीतिकविश्वप्रतीती॥ जालयाहीसर्वब्रह्मसंविती॥ तेथेंसंकल्पकाशाचेउठती
॥तेचिस्थितीनिर्विकल्प॥२॥ब्रह्मरूपाझालाभूगोल॥ ब्रह्मरूपझालाकुलाचल॥ ब्र
ह्मरूपसर्वहीनागकुळ॥ देवसकळब्रह्मरूप॥३॥शुद्धाशुद्धतेंब्रह्मरूपभासे॥ बरेंवा
ईटतितुकेंब्रह्मचि असे॥ किंबहुनाघटपटादिठसे॥ तेस्वयंभअसेपरब्रह्म॥४॥सम
स्तजितुकेविश्वजात॥तितुकेएकचीस्फुरत॥ ब्रह्मेवीणअणुमात्रकिंचित॥ नाहींनि
श्चितजाणगा॥५॥ चूर्णिका॥ ऐसा ब्रह्मदर्शी परिपक्व ज्ञानयोगी जो त्या मुमुक्षू
चेपरी पूर्ववत् एकांत सेवन मौनादि अष्टांग योग साधनें त्याचा नियम हा व्यर्थचहो
य ६ परिपक्वता जालियावर स्वइच्छा त्याचा देह एकांतीं समाधिस्थ अंतःकरण
असो॥ अथवा स्ववर्णाश्रम धर्मिकर्ममार्गी वर्तत असो अथवा सर्वदेशीं फिरो॥ प
रंतु तत्वदर्शी जो त्यास हानि लाभ किमपीही नाहीं ७ त्याचा विजनवास एकांत
सेवन आसनादिक आणि ज्ञानोत्तरकाळीं देहराहाटीचें लक्षण श्री आचार्यवसि
ष्ठादिक बोलताहेत तेंही सांगों॥ ८॥संमतिश्लोक वासिष्ठ॥ समाधिमथकर्माणि
माकरोतुकरोतुवा॥ हृदयेनास्तसर्वाशोमुक्तएवोत्तमाशयः॥२॥ ॥टीकाश्रीरंग
नाथ॥ ऐसाजोकींजीवन्मुक्त॥ तोकर्मेकरोकासमस्त॥विधिनिषेधपाळित॥ अ

थवागार्कीतदोन्हीनेही ॥१॥ तोयज्ञादिकेंसर्वकर्मेंकरू॥ अथवासर्वकर्मेंअक्केरू॥
परीबाधनपवेअंतरू॥ बोधलाथोरूह्मणोनियां॥२॥अथवानिरंतरअसोसमाधि
स्थ॥सविकल्पनिर्विकल्पतटस्थ॥ अथवाअसोव्युत्थितचित्त॥ कदाचितनकरूकां
हीं॥३॥ह्रदयापासावसर्वहीआशा॥ ज्याच्यागेल्यागाविरेशा॥ उत्तमांतःकरणतो
परेशा॥ दृश्यलेशानस्पर्शेतो॥४॥ तोचितोमुक्तअननाहीं॥ येथेंसंदेहनधरीकांहीं
तेचिएवंकारेंठेविलेंठायीं॥ दुसरीनाहींमातुयेथा॥५॥ ॥सं॰श्रीशंकराचार्यअपरो
क्षानुभूतिश्लो॰॥ अदावंतेचमध्येचजनोयस्मिन्नविद्यते॥येनेदंसततंव्याप्तंस
देशोविजनस्मृतः॥१॥सिद्धंयत्सर्वभूतादिविश्वाधिष्ठानमव्ययं॥यस्मिन्सिद्धाः
समाविष्टास्तद्वैसिद्धासनंभवेत्॥२॥ ॥टीकाउद्धवचिह्न॥ नगाआदिमध्या
तनेणेंनगातें॥दिसेहेमतेसानदेखेंजगातें॥ ह्मणोनिवसेंनित्यतानिर्जनीतो॥ अ
सासेविलादेशहीसज्जनींतो॥१॥अधिष्ठानभूतादिजेंब्रह्मसिद्ध॥जयाआश्रयें
विश्वभासेप्रसिद्ध॥ जयेआसनींहोयअद्वैतसिद्ध॥ सुखेंसर्वदाघालिजेतेंचिसिद्ध
॥२॥ ॥संमतिद्वामनराजयोग॥श्लोक॥ नआद्यंतिब्रह्मींजनतरिमध्येंहिविजन
की॥ नमध्येंहीजेसानगनिजउपादानकनकीं॥ अशाब्रह्मींचित्तेंकरूनिअसतिते
स्ववसती॥ जनींहीतेयोगीस्थळविजनदेखोनिरमती॥१॥ अधिष्ठानसिद्धासनीं

नित्यसिद्ध॥ जगींब्रह्ममीपूर्णऐसीप्रसिद्ध॥ शरीरेंउठावेंबसावेंफिरावें॥ तरीनित्य योगासनींत्याअसावें॥२॥ चूर्णिका॥ इत्यादि संमतिकरून मुक्त जो त्याचें विजनवास एकांते आणि आसनादिकांचेंही लक्षण जाणावें॥ ऐसा अपरोक्ष ज्ञानी परब्रह्मरूप योगी जो त्याचा दग्ध पटवत्॥ शेषप्रारब्धें राहिला जो देह तो प्रारब्धक्षय पावेतों एकदेशी एकांतीं बसो॥ अथवा स्वइच्छें सर्वदेशीं फिरो परंतु देहसंबंधज्ञानीयाचे स्वरूपीं नाहीं॥ तो विधिनिषेध पुण्यपापात्मक सकल बंधरहित सर्वगत सर्वाऽधिष्ठान अचलरूपच ऐसा जाणावा॥ यदृच्छा देह कोठेंही कैसाही धारणेंत असो परंतु तयासीं संबंध नाहीं॥ आणि त्यास निषेध करण्यासही समर्थ कोणींच नसे॥ हेंदृढ कळावें म्हणून श्रीअष्टावक्रादि संमतान्वयें सांगोंतें ऐकें॥९॥ संमति अष्टावक्र श्लोक॥ आत्मैवेदंजगत्सर्वंज्ञातंयेनमहात्मना॥ यदृच्छयावर्तमानंतं निषेद्धुंक्षमेतकः॥३॥ टीकाश्री अच्युतरावजी॥ ज्यानेंविशाळबुद्धीनेंजगब्रह्मचिजाणिलें॥ स्वच्छंदेंहिवर्ततांत्या निषेधीकोणयाजगीं॥३॥ ॥संमतिबोधवैभवओव्या॥ विधिप्रमाणेंवर्तणें॥ निषेधसर्वथागाळणें॥ वर्ज्यावर्ज्यकल्पनें॥ आत्मवेत्यासिहेनाहीं॥१॥ आशंका॥ आशंकाकारम्हणे॥ ज्ञानबळेंवर्ज्यावर्ज्यकल्पनें॥ टाकोनिसावकाशवर्तणें॥ सामर्थ्यनसतांशरीरीं॥२॥ ज्यासीसामर्थ्य-

कांहींनसे॥ तेणेंविधिनिषेधसरिसे॥ सांडावेंहेंआम्हांसनदिसे॥ केवळज्ञानेंकेवीघडे
॥३॥ वरदेणेंआणिशापकरण॥ हेंअसेजयासीआणिज्ञान॥ त्यासीचविधिनिषेधल
क्षण॥ कांहींनसेहेंखरें॥४॥ व्यासदुर्वासादिऋषींसीं॥ सामर्थ्यअनुग्रहशापासी॥
त्यासीविधिनिषेधबाधाकायसी॥ गणनेंनाहींहेंखरें॥५॥ तैसेंनझालेंज्यानरा॥ केव
ळज्ञानेंचअसलापुरा॥ त्यासीवर्ज्यावर्ज्यपसारा॥ नएकसराकेवीघडे॥६॥ ऐसापृ-
च्छकाचाआशयअसे॥ त्यासीउत्तरपरियेसें॥ शापानुग्रहआणिज्ञानीयास॥ वेग
ळीकअसेअत्यंत॥७॥ जिहींशापानुग्रहाचेंकारण॥ केलेंअसेलतपअनुष्ठान॥त्या
सींशापदेणेंअनुग्रहकरण॥ हेंफळघडेनिश्चयें॥८॥ जिहींज्ञानोत्पत्तिकारण॥ केलें
श्रवणादिगुरुसेवन॥ त्यासीफळज्ञानहेंजाण॥ वेगळालेंयेरिती॥९॥ म्हणोनिव्यास
दिकाचेठायीं॥ दोन्ही सामर्थ्यांचींतपेंपाही॥ यास्तवदोन्हीएकेठायीं॥ दिसतीऐसे-
जाणावे॥१०॥ जिहींएकतपकेलें॥ तयासीएकफळलाधलें॥ ज्ञानशापानुग्रहाहूनि
वेगळें॥ होयऐसेंजाणावें॥११॥ म्हणोनिज्ञानमात्रेंचिनरा॥ तुटेविधिनिषेधाचो गुं
फिरा॥ आत्मानुभवस्वराज्यनगरा॥पातलायास्तवजाणावें॥१२॥ चूर्णिका॥
शापवरादिकसामर्थ्यहेंतपाचें फळ होय ज्ञानफळ नव्हे ऐसाचि निर्णय श्रीवि-
द्यारण्याचार्यजे यांणींहीकेला आहे तेही संमति ऐकावी॥१०॥ संमतिपंचदशीग्रो

क॥ शापानुग्रहसामर्थ्यंयस्यासौतत्वविद्यदि॥ तन्नशापादिसामर्थ्यंफलंस्यात्त
पसोयतः॥१॥ ॥टीका रामकृष्णपं॰॥ पूर्ववादी ह्मणतो कीं, शापानुग्रहसाम
र्थ्यज्यासीतोच तत्वविद ऐसें जरी ह्मणसील तरी हें न घडे परिहार करितो॥तन्ने
ति॥ शापादि सामर्थ्य फल तें तपाचें आहे॥१॥ नाहो व्यासादिक तत्वविद त्यासी
शापादिक सामर्थ्य देखिलें आहे यासी उत्तर कीं तें तत्वज्ञानाचें फळ नव्हे॥ तरी तें
कोणे करून होतें यासी उत्तर श्लोक॥ व्यासादेरपिसामर्थ्यंदृश्यतेतपसोबला
त्॥ शापादिकारणादन्यत्तपोदानस्यकारणं॥२॥ ॥टीकाराम॰॥ तें तपाचें फ
ळ आहे, तपोबळें करून होतें॥ नाहो तरी श्रुति प्रमाण आहे तपावेगळें तत्वज्ञान
च न घडे॥ ऐसी आशंका यासी उत्तर कीं शापादि करण्याचीं तपें तीं आणिक आ
हेत परंतु हें तप नव्हे॥ शापादि कारणा इति॥ शापादि कारणाचीं तपें आणिक-
आहेत तीं तपज्ञानाचें कारण तें भिन्न आहे॥२॥ व्यासादिकांशीं तत्वज्ञानित्व
आणि शापादि कारणत्व कैसें देखिजे तयासीं उत्तर कीं त्यासी दोन्ही तपें होतीं॥
श्लोक॥ द्वयंयस्यास्ति तस्येवसामर्थ्यज्ञानयोर्जनिः॥ एकैकंतुतपःकुर्वन्नैकैकं
लभतेफलं॥३॥ टीकाराम॰॥ त्यासी दोन्ही ही तपें होतीं त्या कारणें ज्ञान होतें आ
णि शापादि सामर्थ्य ही होतें॥ त्याचीं फळें भिन्न भिन्न होत॥३॥ एवं इत्यादि सं

मतान्वयें हेंच जाणावें कीं, शापादि सामर्थ्य हें ब्रह्मज्ञान फल नव्हे ॥ ज्ञानी याचे देहीं
शापादि सामर्थ्य नसलें तरी नसो ॥ परंतु परम उत्कृष्ट दृढ अपरोक्ष ज्ञान जें तेणें क
रूनच विधिनिषेध बंधरहित स्वेच्छाचारी त्याचा यदृच्छादि प्रारब्धयोगेंच देह व
र्तितो ऐसा जाणावा ॥ त्यास माया विद्या कल्पित कोणताही प्रतिबंध नाहीं ॥ तथा
पि ज्ञानी परम दयावंत जगदुद्धारावे ह्मणोन लोकसंग्रहार्थ श्रीभगवद्गीता श्लोका
र्थ ईश्वर मनोदयान्वय प्रारब्ध क्षय पावेतोंही स्वधर्माचरणींच पूर्ववत् भक्ति ज्ञा
न वैराग्ययुक्त नटवत् असतो ११ ज्ञानी जो त्याचे मनास यथेष्टाचरण प्रिय नसेचि
स्वइच्छा स्वधर्मराहाटीच असते १२ आशंका ॥ नाहो अज्ञानीवत् ज्ञानीयांस ही
यदृच्छा ह्मणजे इच्छारूप वासना आहे तेणें करून वर्ततो म्हणून पूर्वी आपण क
थिलें ॥ तेव्हां इच्छारूप वासना हेची जन्मास कारण ॥ ज्ञानीयांस ही वासना अस
लिया अज्ञानाचे परी जन्मास कारण होईल कीं १३ ऐसी आशंका ॥ ईस उत्तर कीं ज्ञा
नी याचे मनीं शेष प्रारब्धक्षय पावेतों ज्ञानाग्नि करून दग्ध वासना भर्जित बीज
वत् असतात ॥ परंतु प्रारब्ध भोग क्षय झाल्यावर जन्मांकुर दशेस पावत नाहीं
त ॥ जैसीं भर्जित बीजें भक्षावयास उपयोगी पडतात परंतु धरणींत पेरितांही
उगवत नाहींत ॥ तद्वत् ज्ञानी याच्या ज्ञानदग्ध वासना प्रारब्ध भोग क्षयाच्या

मात्र उपयोगी देह पात पावेतों पडतात॥ तेणें करून पुनः जन्माची प्राप्ति कदाही न घडे॥ हेंच यथार्थ दृढ कळावयास संमति मुखें ही सांगों तें ऐक॥१४॥ संमतिबो धवे०॥ ओव्या॥ अहो ज्ञानी झाला तयासी॥ ऐसियावासना कासयासी॥ तें प्रार ब्ध भोगणें आहे तयासी॥ ह्मणोनित्या असताती॥१॥ तरी हा दोष नसे बाप॥ प्रा रब्ध असे अनेकरूप॥ अनेक विद्येचें स्वरूप॥ त्रिप्रकार जाणावे॥२॥ एक ते इ च्छा प्रारब्ध असे॥ अनिच्छा प्रारब्ध तदनुसरिसे॥ पेरेच्छा प्रारब्ध अपेसे॥ पु रुष विशेषें जाणावें॥३॥ इच्छा प्रारब्ध ह्मणिजे ऐसें॥ दुःखदायक विषय तैसे॥ कळोनिही इच्छा उसासे॥ भोगावया कारणें॥४॥ तिचें दृष्टांत पूर्वक निरूपण॥ कीजेल ग्रंथाधारें करून॥ रोगिया कुपथ्य असलिया जाण॥ बलात्कारें तो सेवी॥ ॥५॥ क्षताची शरीरीं व्यथा॥ ताकसें दाडें होय भक्षिता॥ ह्मणे भक्षूं द्या आव डत्या पदार्था॥ रोग तो कपाळीं लिहिला असे॥६॥ तैसा चि जो चोरी करी॥ त्यासी परिणामाची विपत्ति भारी॥ कळली असो नि आदरी॥ चौरकर्म जेथिती॥७॥ आ पला अनर्थ कळो नी॥ तरी इच्छे तें वश हो ऊनी॥ अवश्य भोगी ह्मणूनी॥ इच्छा प्रारब्ध या नांव॥८॥ आतां अनिच्छ ऐसीं लक्षणें॥ इच्छा नसो नि कार्य करणें॥ स्व भावानुसार घडे भोगणें॥ इच्छा नसो नि पुरुषासी॥९॥ परेच्छा तें ऐसी असे॥

यासीइच्छाअनेच्छातेदोन्हीनसे॥ तरीपारब्याचेआयहासरिसें॥ भोगणेंपडे
आवश्यक॥१०॥ ऐसीप्रारब्धाचीअनेकता॥ तेथेंविवेकआहेजरीजागतां॥तथा
पिभोगणेंपडेज्ञानवंता॥ आयहनचलेकदापी॥११॥ ॥आशंका॥ अहोज्ञानी
यासीभोगवासना॥ तरीतेजन्मनदेकायजाणा॥ याआशंकेसीनिरसना॥उत्तरऐ
काबलिष्ठ॥१२॥ ज्ञानीयासीइच्छानसावी॥ हीगोष्टअज्ञानीयांनींबोलावी॥ ह्म-
णालइच्छाअसलियाजन्मांतरेंघडवी॥ हेहीनघडेसर्वथा॥१३॥त्याभोगार्थमाच
वासना॥जन्मनदेतीलऐसेंजाणा॥ जैसाभर्जितपेरिलादाणा॥ तोअंकुरदसेन
येची॥१४॥अहोज्ञानीझालातयासी॥ ऐसियावासनाकशासी॥ तेंप्रारब्धभोग
णेंआहेतयासी॥ ह्मणोनित्याअसतातीं॥१५॥ केवळवासनाजेथेंनाहीं॥तरी
भोगत्यासीनघडेकांहीं॥ मगप्रारब्धकैसेंनिरसेलपाहीं॥याकारणेंत्याअसता
ती॥१६॥ त्याप्रारब्धानुरूपवासना॥ भोगदेऊनिसरतीजाणा॥ नघालितीज
न्ममरणा॥निश्चयप्रमाणायेऊंद्या॥१७॥ भाजिलेंबीजजरीनुगवे॥तथापिभ
क्षावयाफावे॥तैशादग्धवासनाजाणावे॥ ज्ञानीयाच्यासर्वया॥१८॥ह्याचा
सनाकोठेंअसती॥ भोगकवणातेंघडविती॥ तीहीसांगोंउपपत्ती॥ जेणेंजा-
तीलसंशय॥१९॥ ॥संमतिपंचदशीश्लोक॥ ॥अहंकारगतेच्छायैर्दैहव्या

ध्यादिभिस्तथा ॥ वृक्षादिजन्मनाशैर्वाचिद्रूपात्मनिकिंतव ॥२४॥ ॥दीक्षाश्री जगन्नाथ ॥ इच्छाद्वेषसुखदुःखद्वंद्व ॥ देहव्याधीचेनानासमंध ॥ तेतेअहंकारासीऐसेंविशद्व ॥ जाणोनिघ्यावेसर्वथा ॥२०॥ चिदात्माअहंकारसाक्षी ॥ तोसर्वांतेंनिरीक्षी ॥ तयासीनबाधतीहेप्रत्यक्षी ॥ ज्ञानोदयीअनुभव ॥२१॥ ॥ आशंका ॥ ज्ञानझालीयाअहंकारअसे ॥ हेंबोलणेंअसंबद्धदिसे ॥ ऐसीआशंकातुझीनाशें ॥ तेंचिसांगोंऐक ॥२२॥ अहंकाराचेभेदतीन ॥ तयांचेंऐसेंलक्षण ॥ भ्रांतिजन्यकर्मजन्य ॥ तिसरासहजजन्यहेजाणा ॥२३॥ अहंकारेंतिघांठायीं ॥ तादात्म्यकेलेंअसेपाही ॥ ह्मणोनित्याचीनवाई ॥ सर्वांठायींआश्चर्य ॥२४ कर्मजतादात्म्यदेहासी ॥ सहजतादात्म्यचिदाभासी ॥ भ्रांतिजतादात्म्यसाक्षीसीं ॥ प्रकारत्रयेंसीनांदणुक ॥२५॥ कर्मक्षयहोतांपाही ॥ देहाहंकारतेथेंनाहीं ॥ ज्ञानहोतांभ्रांतिजतोही ॥ साक्षीगतनाशपावे ॥२६॥ सहजअहंकारतोऐसा ॥ जोंवरीअंतःकरणाचाठसा ॥ तोंवरीतोअसेसरिसा ॥ प्रत्यक्षऐसेजाणावे ॥ ॥२७॥ अंतःकरणजीवदशा ॥ तोंवरीअहंकृतीचानाशा ॥ नघडेनघडेगा सूक्ष्मनसा ॥ निःसंशयजाणावें ॥२८॥ आशंका ॥ अहोअंतःकरणजीवदशा ॥ तेथेंनिअहंकारनफिटेसहसा ॥ तरीज्ञानाचामहिमाकायसा ॥ वृथासाधनेंसाली-

कीं॥२९॥ अंतःकरणजिवंतअसे॥ तेथेंअहंकारविलसे॥ हेतोअज्ञानियांसीघड
तसे॥ तेव्हांज्ञानीअज्ञानीसाम्यता॥३०॥ तरीऐसेंतुवांनम्हणावें॥ अहंकारासीत्रि
प्रकारजाणावे॥ एकमुख्यदोनघेयावे॥ अमुख्यऐसेजाणोनी॥३१॥ चिदाभासकू
टस्थऐसें॥ वेगळेपणाचेंज्ञाननसे॥ तेथेंमुख्याहंकृतिवसे॥ विवेकीयातेंअमुख्य॥
॥३२॥ मुख्यअहंकारलौकिकीं॥ रूढलाअसेअज्ञलोकीं॥ अमुख्यासिजाणतीवि
वेकी॥ व्यवहारकरितीतैसेची॥३३॥ वैदिकप्रसंगज्ञानविचार॥ तेथेंकूटस्थअहंका
र॥ मीब्रह्मअसंगनिर्विकार॥ हाव्यवहारतेथेंवसे॥३४॥देहेंद्रियकर्मग्रासी॥ मी-
जाईनयेईनयेरीती॥ बोलणेंघडेअहंकृती॥ जीवगतजाणावी॥३५॥ जेकाळींघ
डेदेहव्यवहार॥ तेव्हांअमुख्यजीवअहंकार॥ जेकाळींकीजेज्ञानविचार॥ कूटस्थ
अहंकारतेठायीं॥३६॥ऐसेंत्रिअहंकारलक्षणेंत्रिविध॥ अज्ञानज्ञानियांपृथक्भे
द॥ श्रीविद्यारण्याचार्यप्रसिद्ध॥ बोलिलेशब्दऐकतेंही॥३७॥ चूर्णिका॥ श्रीरा
मकृष्णपंडितसंमति॥ अहंशब्दएकमुख्यदोन अमुख्य ऐसेत्रिविध अहंका
रआहेत॥ आतांमुख्य अहंकाराचा अर्थकैसा या अकांक्षेसीउत्तर यातेंस्वरूप
दारवावीजेतें॥ ॥संमतिपंचदशी श्लोक॥ अन्योन्याध्यासरूपेणकूटस्थांऽभा
सयोर्वपुः॥ एकीभूयभवेन्मुख्यस्तत्रमूढाः प्रयुञ्जते॥१॥ टीकाराम॥ कूटस्थ

चिदाभास दोन्ही स्वरूपें अन्योन्याध्यासें करून ऐक्यता पास झाली तेथें अहंशब्द वाच्यत्वें मुख्य अहंकार ऐसा जाणावा ॥ यासी कैसें मुख्यत्व आहे ॥ तत्त्वमूलत्व युज्यते ॥ कूटस्थ आणि चिदाभास स्वरूपें भिन्न भिन्न आहेत याचा विवेक नाहीं ज्ञानशून्य सर्वही जन ते अहंशब्द बोलतात मूढपणें तो मुख्य अहंकार ॥ १ ॥ आतां अमुख्य दोन त्याचीं स्वरूपें दाखवूं ॥ श्लोक ॥ पृथगाभासकूटस्थावमुख्यौ तत्र तत्त्ववित् ॥ पर्यायेणप्रयुक्तेहं शब्दे लोकेच वैदिके ॥ २ ॥ टीकाराम ॥ आभास आणि कूटस्थ प्रत्येकें अहंशब्दार्थत्वें जेव्हां जाणिजेतें तेव्हां अहंकार दोन्ही जाणावे ॥ यास अमुख्यत्वासी काय कारण ॥ तत्रेति ॥ तत्त्वविदाचे ठायीं आहे ॥ अहंशब्दएक लौकिकें करून एक वैदिकें करून ॥ व्यवहारीं पर्यायें करून तत्त्वविदासी दोन्ही अहंकार घडतात ॥ व्यवहारकाळीं कर्ता भोक्ता लौकिकें करून बोलतात ॥ वैदिकें करून आपण आत्मा असंग ऐसा अहंशब्द बोलतात ॥ हा अहंशब्द उपलक्षण कूटस्थाचा आहे कूटस्थीं अहंतृत्व नाहीं हे दोन अहंकार सर्व जनांचे ठायीं नाहींत म्हणून अमुख्य ॥ २ ॥ पर्यायेण प्रयुक्तेंयाचा अर्थ प्रतिपत्ति प्रपंचन श्लोकद्वयेसो कर्थ करून करूं ॥ श्लोक ॥ लौकीकव्यवहारेहंगच्छामीत्यादिकेबुधः ॥ विविच्यैवचिदाभासंकूटस्थात्तंविवक्षति ॥ ३ ॥ असंगोहंचिदात्माहमितितत्त्वमसीतिनः

॥अहंशब्दंप्रयुंक्तेयंकूटस्थेकेवलेबुधः॥४॥ ॥टीकाराम०॥ बुधज्ञाता लौकिकव्य
वहारीं अहंगच्छामिइत्यादि बोलतो कूटस्थाहून वेगळा चिदाभास विवेचन जाणत
होत्साताही बोलत असतो॥३॥ याकारणास्तव बुध ज्ञाता शास्त्रीयदृष्टीनें वेदांत
श्रवणजनित ज्ञानेंकेवळ चिदाभासाहून विविक्त कूटस्थ असंग अहं चिदात्माहमि
तिलक्षण अहंशब्दार्थत्वेन प्रत्यय विषयत्व संभवाद संगोहमस्मीति ज्ञान मुपेक्ष्यम
इत्यभिप्रायः॥४॥ यदर्थी आणिकही संमती॥ ऐकेंशिष्याशुद्धमती॥ जंवरी अ
सेप्रारब्धगती॥ अहंकार असतीतंववरी॥१॥ ॥संमतिबोधवैभव॥ जोंवरी प्रार
ब्ध असे॥ तोंवरी देहविलसे॥ देहअंतःकरणावेगळा नसे॥ बुद्धिमंतेंजाणावें॥१॥ अंतः
करणजोंवरी आहे॥ तोंवरी अहंकारही राहे॥ ह्मणुनी अनुभवहोत आहे॥ वासनादि
कांचा तेठायीं॥२॥ असोइत्यादिसंमतिकरून॥ अहंकार वासनालक्षण॥ मूढज्ञा
याचेभिन्नभिन्न॥ विशदनिरूपणपैकेलें॥२॥ प्रारब्धकर्मक्षयार्थ॥ ज्ञानियांचेम
नींनिश्चित॥ वासनाअसल्यातरीभर्जित॥ जन्मांकुर प्राप्तत्यासीनहे॥३॥ अगाध
नीयाचेंमन॥ परमानंदीं असेनिमग्न॥ तेथेंमूढवत्तींव्रत्वेंकरून॥ वासनाजाणत्या
सीकेंच्या॥४॥ ॥चूर्णिका॥ नाहोदेहअकाररूप जेथें आहे तेथेंत्या देहापासून पा
पपुण्यात्मक कर्मे उत्पन्न होतच आहेत॥ तेव्हां ज्ञानी याचाही प्रारब्धक्षयेंकरोनीं

एककाळ राहिला जो देह त्या पासून पापपुण्यात्मक कर्म जें उत्पन्न होईल त्याक
र्मफळभोगाची वाटकाय १ पापपुण्यात्मक कर्मफळाचा भोगिल्याशिवाय नाश
होत नाहीं ह्मणोन ऐकिलें आहे॥ तेव्हां ज्ञानी देहकृत कर्मफळाचा विचार कैसा
ऐसी आशंका॥ यास उत्तर कीं प्रारब्धकर्म त्रिप्रकाररूपजें तें क्रमेंच ज्ञानाग्नीनें
भस्म होतें॥ जैशा अग्नींत समिधा पडून भस्म होतात तद्वत् २ आतां पूर्वोक्त जे
त्याहून विलक्षण त्रिविधकर्माचें लक्षण कैसें तेंही तुज कळावयास विशदत्वें सां
गों ३ त्रिविधकर्म ह्मणजे आगामि आणि संचित आणि प्रारब्ध एवंत्रिविधकर्म॥
त्यांत आगामि ह्मणजे ज्ञानोत्पत्ति नंतर ज्ञानी देहकृत पुण्यपापरूपजें कर्म त्यास
आगामि ऐसें बोलावें ४ संचितकर्म कैसें तेंही ऐक॥ संचित कर्म ह्मणजे अनेकज
न्मार्जित बीजभूत कर्म जें त्यास संचित ऐसें वदावें ५ आतां प्रारब्धकर्म कसें तेंही
सांगों॥ प्रारब्धकर्म ह्मणजे हे चरम देहउत्पत्ति हेतु सुखदुःखभद जें कर्म तेंच प्रा
रब्ध ऐसें जाणावें ६ एवं त्रिविधकर्म कथिलें त्यांचा क्षय कैसा होतो तेंही सांगों॥ प्रा
रब्धकर्म जें त्याचा भोगें करूनच क्षय होतो॥ कुलालचक्रभ्रमण समाप्तीवत् ऐ
सेंजाणावें॥ संचितकर्माचा नाश ऐक॥ मी ब्रह्मस्वरूप ऐसें निश्चयात्मकज्ञान अ
परोक्ष झालें म्हणजे संचित कर्माचाही नाश होतो॥ आगामि कर्म जें त्याचा नाशकै

सा तोही सांगों ॥ आगामि जें पाप पुण्य रूप कर्म तें जळस्थ पद्म पत्रवत् ज्ञानी जो त्या
स लिप्त होत नाहीं ऐसें निश्चयें जाणावें ७ आशंका ॥ ना हो ज्ञानी जो त्यास आगामि
पाप पुण्य लिप्त होत नाहीं तेव्हां त्या कर्मफळाची वाट काय ऐशा आशंकेस उत्तर कीं
त्याची ही विभागें वांटणी होते ॥ ज्ञानी जो त्यास संबंध नाहीं तेंच सांगों ८ जे कोणी
जन ज्ञानी यांचें स्तवन भजन अर्चन निरंतर एकनिष्ट करतील त्यास ज्ञानी देहकृत आ
गामि पुण्य रूप कर्म प्राप्त होईल ऐसें निश्चयें जाणावें ९ पुण्याचा विभाग झाला आतां
पापाचा विभाग कैसा तोही ऐक ॥ जे कोणी जन ज्ञानी यांची निंदा करितील किंवा द्वेष
किंवा दुःख देतील त्यास ज्ञानी देहकृत आगामि पापात्मक कर्मफळ जाईल निश्चयें
प्राप्त होईल ऐसें जाणावें १० यदर्थी प्रमाण श्री भगवान् शंकराचार्यादि वचनेंही आ
हेत तींच सांगों ॥११॥ संमति श्री आचार्य ॥ प्रारब्धं निश्चयाद्भुक्ते ॥ शेषं अन्या-
नि ज्ञानेन दह्यंते ॥ शरीरत्वितर कर्मत द्वेषि प्रियवादिनो ॥ ॥ संमति तत्वबोध ॥
प्रारब्ध कर्मणो भोगादेव क्षय इति ॥ संचित कर्म ब्रह्मैवाहमिति निश्चयात्म ज्ञानेन नश्य
ति ॥ आगामि कर्मणां नलिनी दलगत जलवज्ज्ञानिनां संबंधो नास्ति ॥ किंच ॥ ये ज्ञानि
नंस्तुवंति भजंत्यर्च्चयंति तान् प्रति ज्ञानि कृत पुण्यं गच्छंति ॥ ये च ज्ञानिनं निंदंति द्वि
षंति दुःखमदानं कुर्वंति तान् प्रति ज्ञानि कृतं सर्व मागामि क्रियमाण पद वाच्यं कर्म पा

पात्मकंगच्छंति ॥ यदर्थीं श्रुतिही प्रमाण आहेत पण त्या या ग्रंथीं लिहिल्या नाहींत त्यां तीलभावार्थ लिहिले आहेत ॥ ऐसींच आणिकही संत वचनें प्रमाण आहेत तींही सां गों ॥१२॥ संमति श्रीजगन्नाथ ओव्या ॥ जेजे ज्ञानी पुरुषांसि निंदिती ॥ तेते पापाचे अ धिकारी होती ॥ जे अर्चिती वंदिती स्तविती ॥ पुण्याधिकारी ते जाणा ॥१॥ जेजे सेविती आदरें ॥ ते ब्रह्मनिष्ठ होती पुरे ॥ ऐसी वर्तणुक या प्रकारें ॥ जीवन्मुक्तांची जाणावी ॥२॥ पु ण्यें स्वर्गप्रती न जाणें ॥ पापें नरक न भोगणें ॥ दोन्ही ये थें चि ते क्षपनें ॥ शुद्ध असणें मु क्तासी ॥३॥ पापपुण्यरूपसंचित ॥ ज्ञानोदयीं नाश पावत ॥ क्रियमाण तेही न स्पर्शी त ॥ आत्मवंता नरातें ॥४॥ प्रारब्धमात्र भोगणें ॥ त्यामाजी घडोत पापपुण्यें ॥ त्या पाप पुण्या नाहीं बांधणें ॥ जीवन्मुक्तापुरुषासी ॥५॥ जीवन्मुक्ताचा अगम्य महिमा ॥ तोस्व यें च पूर्ण परमात्मा ॥ राहाटे परी नातळे देहधर्मा ॥ देहेंद्रियासमवेत ॥६॥ चूर्णिका ॥ एवं इत्यादि संमति करून हेंच प्रतिपादन केलें कीं नित्यमुक्त ज्ञानि जो त्यास प्रारब्धकर्मफळा चा बाध नाहीं ऐसें जाणावें ॥ एतादृश ज्ञानि असंग निर्विकार नित्यमुक्त आत्मा जो तो च तूं शिष्या होस ॥ तो नित्य सद्रूप ब्रह्मच तुझें यथार्थ स्वरूप तेथें नाविध प्रारब्धकर्म तूंजही नाहींच हेंसत्य ॥१३॥ इति श्री स्वात्मबोधग्रंथ ॥ श्रवणें पुरती मनोरथ ॥ श्रीरघुनाथचरणीं अध्यायसु निश्चित ॥ मौनी अर्पित दशमहा ॥१०॥

श्रीगणेशायनमः॥ ॥यावरी शिष्य ह्मणतोकीं आगामि आणि संचितकर्माचा वि
भागपूर्वी सांगितला तेउभय मज नसोत परंतु प्रारब्धकर्म हे भोगक्षयपर्यंत देहपा
तहोय तीं पावेतों तरी मज आहे कीं ऐसी आशंका ईस उत्तर कीं तेही तूज नाहीं प्रार-
ब्धदेही देहक्षेत्रासीच ऐसें जाणावें॥ मज नसून क्षेत्रासीच कैसें ह्मणशील तर तेही वि
षद ऐक १ देह भोगायतन, इंद्रियें भोगसाधन, भोग्यविषय, बुद्धि मन अंतःकरण
भोक्ता इत्यादि भोक्तृ भोगायतन भोग्य भोगसाधन ऐसे चतुष्टयही तूं नव्हस॥ ते
व्हां प्रारब्धकर्महीं तुज कैचें॥ आत्मा तूं या चतुष्टयाहून विलक्षण साक्षित्वें वेगळा च
तुजहें नसे॥ अंतःकरणादि चतुष्टय मिथ्या तेव्हां त्यास प्रारब्धकर्म तेंही मिथ्या॥ त
संबंधी साक्षित्व जें तुज ह्मणणें तेंही मिथ्या कैसें त्यास हेतु सांगों २ जोंपर्यंत सकळ
देहेंद्रिय मनबुद्ध्यादि अविद्या कार्य सत्य मानावें तोंपर्यंत तत्संबंधी साक्षित्वही तुज
सत्य ह्मणावें॥ कार्यसहवर्तमान अविद्या मृगजळवत् मिथ्या तेव्हां साक्षित्व ह्मणणें
हेंही तुज सत्य कैचें॥ अविद्यासत्यत्वें साक्षित्व ह्मणणें॥ एऱ्हवीं तव निर्धर्मब्रह्मस्व
पीं पारमार्थिक नव्हेच॥ यदर्थीं प्रमाण सांगों॥ ३॥ संमति दासबोध॥ ओव्या ३॥ ॥
साक्षित्वचैतन्यत्वसत्ता॥ हें गुणब्रह्माचिया माथा॥ आरोपिलें जाण वृथा॥ माया गुणें
॥१॥ घटमठाचेनि गुणें॥ विविध आकाशबोलणें॥ मायेचेनि निरवरेपणें॥ गुणब्रह्मीं

॥२॥ जवखरेपणमायेसी॥ तववरीचसाक्षित्वब्रह्मासी ॥ मायाअविद्येचानिरासी॥ साक्षित्वकैचें॥ ३॥ ॥ चूर्णिका॥ इत्यादिसंतवचनेंहीप्रमाण आहेत तूंनिर्धर्म अद्वैत दृग्दृश्यसंबंधरहित॥ कलेवरसंबंधीप्रारब्धतुज आत्मयासीकैचें॥ तुजनसेचीयदर्थीं प्रमाणश्रीभगवान्शंकराचार्य आज्ञावचन आहे तेंही ऐकें॥३॥सं॰ अध्यात्मोपदेश॥ अपिचप्रारब्धफळभोगोपितवनास्त्येव॥ भोभगवन्तत्कथं॥इत्थं॥ देहोभोगायतनंविषयाः भोग्याः इंद्रियाणिभोगसाधनानि मनोबुद्धिर्भोक्ता॥ एवंभोक्तृभोगायतनंभोग्यानिभोगसाधनानि एतच्चतुष्टयंत्वंनभवसितस्मादारब्धकर्मफलभोगस्तवनास्त्येव॥१॥ चूर्णिका॥ इत्यादिश्रीगुरुवरवचनसिद्धांतहीआहेत प्रारब्धहेदेहासीच॥ देहची तूंनव्हेसी तेव्हां प्रारब्धहीतुजकैचें ऐसा हाउघडचन्याय आहे॥ तूंनिःसंगनिराकारआत्माहें सिद्ध॥ प्रारब्धयोगेंदेहासी सुखदुःखनिंदास्तवन मानापमान भरणपोषण इत्यादि इच्छानिच्छापरेच्छायाभयप्रकारेंज्याज्याघेळेस जैसेंजैसें होईल तैसें सुखरूपहोवो तुजसंबंध नाहीं॥४॥अज्ञानें करून प्रकृतिधर्माचा स्वात्मस्वरूपीं कदाही आरोपन करी॥ प्रारब्धक्षयानंतर देह श्रीकाशीक्षेत्रीं तीर्थीं अथवा चांडाळगृहीं अतीर्थीं कोठेंही प्रारब्धेंपतन होवो त्याचा हर्षविषाद तुज कांहींच नाहीं॥ दृढ अपरोक्ष ज्ञान अहंब्रह्मास्मि ऐसें ज्या

समयीं उत्पन्न होतांच अज्ञान भ्रांतिनाशें तेसमयींच तूं विदेह कैवल्य नित्यमुक्त ॥ अज्ञानजें याचे आदि मध्य अवसानीं तूं अचळ अखंडच तुजखंड नाहीं ॥ परमात्मस्वरूप नित्यमुक्त निराकार अविनाश पूर्णब्रह्म ऐसा जो तूं तुजला मरण जन्मादिक धर्म कधींही नसतीच ऐसें दृढजाणावें॥ देह कोठें ही पडो तुज सद्रूपास संबंधनाहीं येविषयीं ग्रंथांतर वाक्यें प्रमाण आहेत तेही सांगों॥५॥ श्लोकसं० वासिष्ठ ॥ तनुंत्यजतुवाकाश्यांश्वपचस्य गृहेंथवा॥ ज्ञानसंप्राप्तिसमये मुक्तोसौविगताशयः॥२॥ संमतिआत्मा०॥ तीर्थेचांडालगृहेवायदिवानष्टचेतनः॥ परित्यजनूदेहमिमंज्ञानादवसमुच्यते॥३॥ तीर्थेश्वपचगृहेवानष्टस्मृतिरपिपरित्यजनूदेहं॥ ज्ञानसमकालमुक्तः कैवल्यंयातिहतशोकः॥४॥ सं० पंचदशी श्लोक॥ निरोगोवोपविष्टोवा क्रुग्णोवाविलुटन्भुवि॥ मूर्च्छितोवात्यजत्येषः प्राणान्भ्रांतिर्नसर्वथेत्यादि॥५॥ टीका॥श्रीरंगनाथओव्या॥ तोदेहातीतस्वप्रकाश॥ अद्वयानंदपूर्णपरेश॥ सर्वसाक्षीनिर्विशेष॥ तयादोषदेहलेंकें॥१॥ देहातीतसाक्षीपणें॥ असतांबाधुकोण्यागुणें॥ देहपडतांविधिअविधीनें॥ कायकरणेंतीर्थेअतीर्थे॥२॥ तोतनुत्यजोकाकाशीयेसी॥ अथवाचांडाळगृहासीं॥ परीतोसर्वथामुक्तपरियेसी॥ नाहींतयासी अन्यभावो॥३॥ आतांअथवाकल्पांतीं॥ पडोअथवाकरुस्थिती॥ जरीराहिलासत्संगी

॥नसतांसंगतीहनिकाय॥४॥ शवासिस्वकुचंदनादिसोहळा॥लेववियाअलंकारमेळा॥ अथवाचंदनकाष्टींजाळिला॥कुकाष्टींदाहिलातरीकाय॥५॥तैसेंदेहसंबंधेंआत्मयासी॥कोण्हीचपदार्थशुभअशुभासी॥नव्हतीजाणजीवन्मुक्तासी॥देहाभिमानियासीहोतील॥६॥जेव्हांचिझालीज्ञानप्राप्ती॥तेव्हांचिमुक्ततोसर्वार्थी॥जयाचियावासनेचीशांती॥होऊनिस्थितीअखंड॥७॥तयाचेंमनचिगानासलें॥तेमनपणानयेकांहींकेलें॥तयाचेआशापाशतुटले॥अंतर्बाह्यझालेंसूर्यजैसा॥८॥तयामनअसोनितोअमन॥श्रवणचीअश्रवण॥नयनअसोनितोअनयन॥चरणेचीणचरणेची॥९॥सर्वहीअसोनियांबाधलें॥तेंअसतांचिनाहींझालें॥करूनअकर्तेपणआलें॥नाहींमेळलेंसाक्षित्वें॥१०॥यालागींतेव्हांचितोमुक्त॥त्यासीस्थळास्थळनलगेशोधित॥वैकुंठअथवापुण्यक्षेत्र॥सदोदितब्रह्मतया॥॥११॥जोकींसर्वत्रआपणझाला॥पूर्णत्वेंआपणचिसंचला॥तयाउत्तममध्यमभागउरला॥कनिष्टकोणालासांगपां॥१२॥देशकाळसर्वही आपण॥तीर्थेअतीर्थेक्षेत्रजाण॥देहविदेहपरिपूर्ण॥सर्वही आपणसर्वपणें॥१३॥तयाकाळअकाळनाहीं॥सर्वहीतोआपणचिपाही॥गतिअगतिभ्रांतिसर्वही॥तोपूर्णपाहीपूर्णत्वें॥१४॥घटफुटलीयाघटाकाश॥मार्गेचिगेलियामिळेआकाश॥कींअमार्गीपडि

लेवोस ॥ किंकाळें भेटे आकाश अकाळे नाहीं ॥ १५ ॥ पुण्यकाळीं तीर्थीं घट भंगला ॥ तरी
चमहदाकाशीं अवकाश मिळाला ॥ एऱ्हवीं कोण्यास्थळासी तो गेला ॥ कीं मध्यें विराला
चुकोनियां ॥ १६ ॥ घटस्थित असतां गगन ॥ आन रूप झालें आपण ॥ घट भंगेचीं गगन ॥
एऱ्हवीं काय आन होय ॥ १७ ॥ यालागीं पूर्वीचि तो ब्रह्म आहे ॥ देहांतीं काय तो आन होय
॥ देहविदेहीं तेचि आहे ॥ आन काय होईल ॥ १८ ॥ देह असतांचि ब्रह्म झाला ॥ मग देह सं
बंध काय तयाला ॥ देह असतां नसतां संचला ॥ ब्रह्मत्वें झाला ब्रह्मचि तो ॥ १९ ॥ झाला हें
शब्दें बोलावें ॥ परी झालेंपण तयां नसंभवे ॥ तो ब्रह्मचि आहे स्वभावें ॥ झाला म्हणावें उप
चारें ॥ २० ॥ ब्रह्म असोनि ब्रह्म होय ॥ मुक्त होत्साता मुक्त स्वयें ॥ ऐसे स्वयें श्रुति बोलता हे
॥ उपचार पाहे बोलाचा ॥ २१ ॥ म्हणोनि ब्रह्मत्व सिद्धची आहे ॥ आलें गेलें उपचार हे ॥ दे
ह असतां नसतां पाहे ॥ आन आहे वस्तु वीण ॥ २२ ॥ अज्ञानें व्यवधान केलें ॥ म्हणोनि झा
लेंपण यया आलें ॥ एऱ्हवीं ते चिते संचलें ॥ नाहीं झालें आन कांहीं ॥ २३ ॥ देह तीर्थीं पडल्या
कोण स्वार्थ ॥ अतीर्थीं पडल्या कोण अनर्थ ॥ हें अज्ञान कल्पित अर्थानर्थ ॥ देह बुध्यार्थ
लागलें ॥ २४ ॥ देहातीता हें सर्वथा नाहीं ॥ तो देहीं चि विदेही सर्वपाही ॥ स्वयें बोला आन
नाहीं ॥ संशय कांहीं न धरावा ॥ २५ ॥ ॥ चूर्णिका रामकृष्णपंडित ॥ तो निरोगी हो
त्साता बैसला असो अथवा रोगी होत्साता भूमीवर निजला असो ॥ अथवा भूमीसमु

र्च्छित असो॥ ऐसा होसाता प्राणत्यजो परंतु भ्रांति सर्वथा नव्हे मरणकाळींही तत्वानु
संधान अभ्यास जात नाहीं॥ ज्ञान नासत नाहीं ऐसें जाणावें ॥ ३ ॥ ओव्या॥ एवंइत्या
दि संमति करून॥ हेचि कथिलें तुजलागुन॥ देह प्रारब्ध होतांपतन॥ मुक्त तोजाण अवि
नाशी॥१॥ ऐसा नित्यमुक्त शुद्धबुद्ध॥ अविनाश आत्मा निजानंद॥ तोचि तूं शिष्या जाण
प्रसिद्ध॥ देहसंबंध तुज नाहीं ॥२॥ प्रारब्धक्षयीं देह पतन॥ होतांचि सर्वही उपाधिजाण
॥ अंतःकरणादिक प्राण॥ तव स्वरूपीं लीन पैहोती ॥३॥ जैसें तप्त लोह जेंत्यास॥ उदक
बिंदु आटोनि जात॥ तैसे बुध्यादि लीन होत॥ स्वस्वरूपांत तूंझिया ॥४॥ तूंया देहाचे आ
दिअंतीं॥ जैसा तैसा चि चिन्मूर्ती॥ असशी तुजला निश्चिती॥ विदेह या मानीन घडे॥५
रज्जु सर्पास आद्यंत॥ होतांचि दोरच अखंड असत॥ त्यासी होणें जाणें कदा नसत॥ तैसा
निश्चित कूटस्थ तूं ॥६॥ अविनाश जें पूर्ण ब्रह्म॥ अद्वैत सच्चिदानंद परम॥ तेचि तूं शिष्या
निरूपमा॥ मरण जन्म तुज नसे॥ ७॥ एवंया प्रकारें बोध॥ श्रीसद्गुरु प्रसादें शुद्ध॥ जो पा
वलागा अतिविशद॥ महिमा अगाध ऐक त्याचा ॥८॥ ऐसें ब्रह्म ज्ञान पावोन॥ जो ब्रह्मचि
झालापरिपूर्ण॥ तयाची जननी कृतकृत्य आपण॥ कुळही पवित्रपण बहुत्याचें ॥९॥ त्या
चेचरण पृथ्वीसलागतां॥ तियेसि भाग्य पुण्यरूपता॥ ज्याचें अंतःकरण सर्वथा॥ ब्रह्मीं
चसमरसता पावलें॥१०॥ तोचि सकळ तीर्थीं न्हाला॥ पृथ्व्यादि दानें घडलीं त्याला॥ सद्

स्नादियज्ञाचेंफळपावला ॥ सकळदेवमेळा पूजिलातेणें ॥ ११ ॥ नरकापासोनिपितर ॥ ते
णेंचिमुक्तकेलेसाचार ॥ यथाब्रह्मविचारींक्षणभर ॥ चित्तकास्थिरहोयज्याचें ॥ १२ ॥ इ
त्यादिफळेंतयासी ॥ घडलींजाणगानिश्चयेसी ॥ तोब्रह्मरूपच आनंदरासी ॥ वेदशा
स्त्रासींमान्यबहू ॥ १३ ॥ येविषयींशास्त्रप्रमाण ॥ ऐकेंएकाग्यकरूनिमन ॥ सर्वहिघड
लेत्यालागुन ॥ ब्रह्मींनिमग्नचित्तज्याचें ॥ १४ ॥ ॥ सं० श्लोक ॥ कुलंपवित्रंजननीकृ
तार्थावसुंधरापुण्यवतीचतेन ॥ अपारसंवित्सुखसागरेस्मिन्लीनेपरेब्रह्मणियस्य
चेतः ॥ ६ ॥ स्नातंतेनसमस्ततीर्थसलिलंदत्ताचसर्वावनियज्ञानांचकृतंसहस्रम-
खिलंदेवाश्चसंपूजिताः ॥ संसाराच्चसमुद्धृतास्वपितरोत्रैलोक्यपूज्योप्यसोयस्यब्रह्म
विचारणेक्षणमपिस्थैर्यमनः प्राप्नुयात् ॥ ७ ॥ टीका ॥ यायश्लोकाचेंअर्थमथित ॥
पूर्वीचिबोलिलेंनिश्चित ॥ तेणेंजाणावेंअन्यार्थ ॥ नसेश्लोकार्थविवरावा ॥ १५ ॥ ऐसाब्र
ह्मविदाचामहिमा ॥ श्रेष्ठअसेगानरोत्तमा ॥ त्याचियाभाग्याचीसीमा ॥ शब्दसंभ्रमान
वर्णवे ॥ १६ ॥ प्रारब्धक्षयकाळपर्यंत ॥ ज्ञानदग्धदेहोनिश्चित ॥ ज्ञानियाचा असेरा
हत ॥ तोउपकारीहोतसर्वजना ॥ १७ ॥ दर्शनभजनसंभाषण ॥ याविविधउपकारेंक
रून ॥ पावनकरीतअसेजन ॥ कैसेंलक्षणऐकतेंही ॥ १८ ॥ दर्शनेंहोतपापक्षय ॥ भ-
जनेंश्रेयवृद्धिहोय ॥ गुह्यभाषणेंनिःसंशय ॥ मोक्षहोयभावार्थिया ॥ १९ ॥ ऐसाविश्व

कारेंकरून॥ करीतजगाचेंकल्याण॥ यदर्थीसंदेहनधरीजाण॥ यासीप्रमाणऐक
सांगों॥२०॥ ॥सं॰ श्रीशंकराचार्य॥ अस्यजीवन्मुक्तस्यदेहधारणंलोकस्योपकारार्थ
मिति॥ भोभगवन्लोकस्योपकारः कः॥ उपकारःस्त्रिविधा॥ दर्शनंभजनंसंभाषणंचे
ति॥ दर्शनेनपापक्षयोभवति॥ भजनेनश्रेयोत्तरोत्तरवृद्धिः॥ संभाषणेनमोक्षोभ
वति॥८॥ ओव्या॥ इत्यादिज्ञानीस्तवनपर॥ वचनेंअसतीथोरथोर॥ तोमूर्तचि
अमूर्तब्रह्मसाचार॥ नसेविचारअन्यतेथें॥२१॥ तयाच्यासुखींअन्न॥ जेकांघालि
तीप्रीतिकरून॥ कोटीब्राह्मणभोजन॥ घडतसेजाणत्यानरा॥२२॥ यदर्थीप्रमाण-
काय॥ ह्मणसीजरीशिष्यवर्य॥ तरीशिवगीताश्लोकान्वय॥ निःसंशयऐकसांगों॥२३
॥सं॰ श्रीशिवगीताश्लोक॥ यत्फलंलभतेमर्त्यःकोटिब्राह्मणभोजनैः॥ तत्फलंसम
वाप्नोतिज्ञानिनंयस्तुभोजयेत्॥९॥ इत्यादिवचनींबहुत॥ ज्ञानियाचामहिमाअद्भु-
त॥ सर्वहीअसतीवर्णिन॥ तोलिहितांग्रंथलांबतसे॥२४॥ ग्रंथसंवादयेथुनी॥ आच
रीजेलगाभर्वसेनी॥ परीकिंचितसांगोंरहणी॥ प्रकारश्रवणींऐकशिष्या॥२५॥ अप
रोक्षज्ञानझालियावरी॥ देहपातहोयतोंतववरी॥ राहावेंकैसेंह्मणसीजरी॥ ऐकेंतेंप
रीसांगेन॥२६॥ अगालोकसंग्रहार्थ॥ जनतरावेयदन्निमित्य॥ जीवन्मुक्तदेहीआं
त॥ वैराग्ययुक्तअसावें॥२७॥ नित्यनेमएकांतवास॥ दाकूंचनत्यागूंभ्यास॥ भ

वणमननिजध्यास॥ याचक्रमासकाळकंठी॥ २८॥ मीमुक्तह्मणऊन॥ नाचरावेंय
थेष्टाचरण॥ जगींस्वधर्मस्थापोन॥ स्वतांआचरणकरावें॥२९॥ अकर्तात्मबोधजा
णोन॥ स्नानसंध्यास्वधर्माचरण॥ प्रेमयुक्तहरिअर्चन॥ प्रत्यहींजाणकरीतजावें॥ ३०
श्रीरामकृष्णादिनामघोष॥ करीतजावेंकीर्तनास॥ प्रेमयुक्तभक्तिरस॥ दिवसेंदिवस
वाढवावा॥ ३१॥ श्रीहरिहरभक्तिसमान॥ कदांहीभेदनकल्पून॥ ईश्वरचिह्नेजगमान्
न॥ सर्वांसिनमून असावें॥ ३२॥ अद्वैतबोधशब्दज्ञानें॥ भजनप्रेमानभंगणें॥ अर्च
नेंकेंचीकीर्तनें॥ ऐसेंनह्मणणेंजनांत॥ ३३॥ आह्मीकेवळजीवन्मुक्त॥ आह्मासिकें-
चाभक्तिपंथ॥ यथेष्टाचरणचिह्नेयुक्त॥ ऐसेंजगांतबोलूंनये॥ ३४॥ आपुलासिद्धपण
जगांत॥ दारवूंनयेगायथार्थ॥ साधकदशाचिदाविजेत॥ संदेहूरहित असोनी॥ ३५
पंडितज्ञानीब्राह्मणथोर॥ त्यासीवादीनव्हावेंतत्पर॥ मीविद्यार्थीतुमचाकिंकर॥ ऐसें
मधुरोत्तरवदतजावें॥ ३६॥ मी अत्यंतबुद्धिमंत॥ इतरमंदहेनीचबहुत॥ ऐसेंमानुनी
मनांत॥ हेलनासत्यकरूंनये॥ ३७॥ द्रव्यलोभअथवाशहाणपण॥ ह्मणेतअंतरींध
रोन॥ दुसऱ्याचाउपहासकरून॥ आपुलेंस्थापनकरूंनये॥ ३८॥ मीज्ञानीथोरम
हंत॥ ह्मणोनिगरीबासधिःकारित॥ ऐसेंलक्षणउन्मत्त॥ सहसामनांतधरूंनये॥ ३९
रंकश्रीमंतस्त्रीवृद्धासी॥ मधुरभाषणेंसिसर्वांसी॥ करित असावें अल्पतेसी॥

उर्मीकोणासीनदाविजे॥ ४०॥ हरिभक्तीचाफडमांडून॥ सांगोनिकथापुराण॥ शि
ष्यशारवामेळऊन॥ द्रव्यभोंदुनघेऊंनये॥४१॥ अंतरींनैराश्यदृढअसावें॥ पुरा
णकीर्तननित्यकरावें॥ मूढप्राणीहेतरावे॥ याहेतुस्वभावेंआचरणें॥ ४२॥ देहपो
षणारब्धीं॥ लावोनिरमावेंहरिपदीं॥ मेळवोनिशिष्यांचीमांदी॥ द्रव्यकधींमागूं
नये॥ ४३॥ शिष्यापासोनध्यावीसेवा॥ हाभावमनींकदानसावा॥ आपुलाकाल-
क्षेपचालावा॥ ह्मणोनिनद्यावाउपद्रव॥ ४४॥ शिष्यासीपरमार्थविचार॥ युक्तिनें
बोधिजेमधुरमधुर॥ नायकेतरीमगकठोर॥ वचनींसत्वरताडिजे॥ ४५॥ रोगि-
याकरीकुपथ्येस॥ वैद्यनबोलेजरीतयास॥ तरीरोगहरीलप्राणास॥ ह्मणूनम
धुरशब्दासनबोलिजे॥ ४६॥ तैसेचिगुरूनीसाचार॥ शिष्यासिनबोलिजेउपचा
र॥ नित्यत्याचियाकल्याणपर॥ कठिणोत्तरवदतजावें॥ ४७॥ जवज़वशिष्यासिव
दिजेगोड॥ तवतवत्याचीतुटेभीड॥ मगगुरूसिप्रपादीसभेंतउघड॥ तुमचीबड
बडनीटनव्हे॥ ४८॥ गुरूपेक्षांआपणश्रेष्ठाणे॥ हेंलोकांसिकळावेंयाकारणें॥ गुरू
सींचवादविवादकरणें॥ आपुलेंस्थापणेंश्रेष्ठत्व॥ ४९॥ याहेतुस्तवशिष्यजनांत॥
युढेंमर्यादाकरीत॥ तेणेंअकल्याणपावत॥ ह्मणोनिगोडबहुतनबोलिजे॥ ५०॥
जेजेनिंदाकरितीजन॥ तेतेअमत्सरकरावेसहन॥ त्यावरकोपूंनयेंचजाण॥ मैत्री॥

चआपणवाढवावी ॥५१॥ निंदकदेहाचेंहितकरिती ॥ पापरूपमळक्षालिती ॥ ह्न-
णोनिसाधुनेंतयाचाचित्तीं ॥ द्वेषनिश्चितीनकरावा ॥५२॥ श्रीभगवंताचीवचनोक्ती ॥
भिक्षुगीतश्रीभागवतीं ॥ तेचिधरूनियांचित्तीं ॥ आचरणत्यारितीअसावें ॥५३॥ अ
सोहेंकितीबोलावें ॥ शहाणाजाणेलस्वभावें ॥ नकळेत्याणेंहेंवाचावें ॥ मगआचरावें
ऐसेंची ॥५४॥ एवंयाप्रकारेंकरून ॥ ज्ञानोत्तरकाळींचेंआचरण ॥ तुजलागींसंक्षेपें-
जाण ॥ शिष्याकथनपैंकेलें ॥५५॥ ऐसियास्थितीराहावें ॥ ब्रह्मैवसर्वजाणावें ॥ पर
मानंदींरमावें ॥ सुखींअसावेंसुखरूप ॥५६॥ इत्यादिगुरुशिष्यसंवाद ॥ श्रोतिया
कथिलातुजविशद ॥ हृदयींधरोनिदृढबोध ॥ पावेंआनंददिनरजनीं ॥५७॥ श्रीरघु
नाथसद्गुरुदयाघन ॥ तोचिवाणीचाप्रकाशपूर्ण ॥ तेणेंवदविलेंहेंनिरोपण ॥ तरीए
काग्रमननकरीतजावें ॥५८॥ वारंवारश्रवणमनन ॥ करीतएकाग्रनिजध्यासन
॥ अद्वैतआत्माज्ञानघन ॥ भावार्थीआपणस्वयंहोय ॥५९॥ कोणीह्मणेलहेंप्राकृ
त ॥ वाचावेंहेंनसेविहित ॥ तरीऐसेंनमानिजेमनांत ॥ अर्थअद्वैतएकची ॥६०॥ सं
स्कृतआणिग्रंथप्राकृतीं ॥ शब्दभाषापृथकभासती ॥ परीउभयार्थअद्वैतसिद्धां
तीं ॥ भेदनिश्चितीनसेची ॥६१॥ इयेआशंकेचापरिहर ॥ पूर्वीहिवृंदलेथोरथोर ॥
श्रीरामदासादिग्रंथकार ॥ तदुक्तनिर्धारऐकावा ॥६२॥ ॥ सं॰ दासबोध श्रीराम॰

दास॥ओव्या॥ एकम्हणतीमराठेकाय॥ हेतोभल्यानेंऐकोंनये॥ तेमूर्खनेणतीसो
य॥अर्थान्वयाची॥१॥ लोहाचीमांदुसकेली॥ आंतनानारत्नेंसाठविली॥ तेअभा-
ग्यानेंटाकिलीं॥लोखंडम्हणोनी॥२॥ तैसीभाषाप्राकृत॥ अर्थवेदांतसिद्धांत॥
नेणोनित्यागितीभ्रांत॥ मंदबुद्धीस्तव॥३॥ प्राकृतआणिअद्वैत॥ सुगमआणि
सप्रचीत॥ अध्यात्मलाभेंअकस्मात॥ तरीआवश्यघ्यावें॥४॥ नकरितांव्युत्पत्ती
चाश्रम॥सकळशास्त्रार्थहोयसुगम॥सत्समागमाचेंवर्म॥ऐसेंआहे॥५॥जेंव्युत्पत्ती
नेंनकळे॥ तेंसत्समागमेंकळे॥ सकळशास्त्रार्थअकळे॥ स्वानुभवासी॥६॥ भा
षापालटेकांहीं॥ अर्थवायांजातनाहीं॥ कार्यसिद्धिते पाही॥ अर्थाचीपासी॥७॥
॥ऐसेंविश्वीराजमुकुंद॥ एकनाथादिवदतीविशद॥ तदुक्तहीओव्याप्रसिद्ध॥संम-
तिशुद्धऐकाव्या॥६३॥ ॥सं॰ विवेकसिंधु॥ओव्यामुकुं॰॥ वेदशास्त्राचामथिता
र्थ॥ म्हाटीयाहोयफलितार्थ॥ तरीचतुरीपरमार्थ॥ यॅथीलकांनघ्यावा॥१॥ देश
भाषाहोकामम्हाटी॥परीउपनिषधाचीराहाटी॥ तेथींचाअर्थजीवाचियेगांठी॥कां
नबोधावा॥२॥ सं॰एकनाथओव्या॥ संस्कृतप्राकृतपरवडी॥सज्ञानसेवितीस्वानं
दगोडी॥ गायकाळीआणितांबडी॥परिदुधावांकुडीचवीनाहीं॥१॥कपिलेचेंस्तनांवें
क्षीर॥ माईत्तरेचेंतेंकायनीर॥ वर्णस्वादमधुर॥दिसेसाचारसारस्वती॥२॥जेंपाकि

जेसंस्कृतअर्थे॥तेचिलाभेंप्राकृतें॥तरीनमानावेंयेथें॥विषमचित्तेंतेंकांहीं॥३॥
॥एवंइत्यादिसंमतिकरून॥हेंचिकथिलेंनिरोपण॥संस्कृतप्राकृतअर्थभिन्न॥कदा
हीविलक्षणनसेची॥६४॥म्हणोनिसंस्कृतअथवाप्राकृत॥जेग्रंथींअद्वैतसिद्धांत॥
तेउभयवाचीजेश्रद्धायुक्त॥द्वेषरहितमुमुक्षूनें॥६५॥असोग्रंथार्थलिहिलाजोकांहीं
॥तेशेवटींसूचनालिहावी॥म्हणोनिसंक्षेपेंनिश्चयी॥ग्रंथान्वयीऐकसांगों॥६६॥प्र
थमअध्यायींनिरूपण॥श्रीगणेशादिसद्गुरुसंतस्तवन॥श्रोत्यांचाप्रश्नउत्थापून॥
दिधलेंप्रतिवचनतयासी॥६७॥शुद्धअंतःकरणेंनिश्चिती॥यथार्थज्ञानयाभगवत्प्राप्ती
॥सत्कर्मभजनादिदृढभक्ती॥हेंकथिलेंअल्पोक्तीप्रथमांत॥६८॥पुनःश्रोतियांचाप्रश्न
॥आत्मानात्मविषयींजाण॥त्यांचेंदेऊनप्रतिवचन॥प्रथमाध्यायसंपविला॥६९॥आ
त्माएकसच्चिदानंद॥त्रिशब्दार्थीनसेभेद॥तोचतूंहेंपसिद्ध॥कथिलेंविशदद्वितीया
ध्यायीं॥७०॥मगसाधनचतुष्टययुक्तजोशिष्य॥त्याच्याप्रश्नाचेंकरूनमिष॥शब्दल
क्षणाचाकिंचित्अंश॥दर्शितकेलाकळावया॥७१॥म्हणूनसच्छिष्येंकरजोडून॥प्र
श्नकेलाअतिनम्रहोऊन॥हेगुरोआत्मासच्चित्सुखघन॥कैसीओळखणसांगास्वामी
॥७२॥तवगुरुम्हणतीशिष्यासी॥अरेआत्मातवज्ञानराशी॥सदाप्रकाशूनअवस्था
त्रयासी॥निर्विकारत्वेसीस्वतःसिद्ध॥७३॥त्याअवस्थात्रयाचाकरूनबाध॥निव-

डावी संवित शुद्ध ॥ तें ज्ञान अवस्था बयीं अभेद ॥ वर्णिलें विशद तृतीयाध्यायीं ॥ ७५
मग जीवेश्वराचें एकपण ॥ उपाधित्यागें केलें वर्णन ॥ एषा स्वयंप्रभा इत्यादि वचन ॥ अने
कप्रमाण दर्शविलें ॥ ७५ ॥ अर्थ इतुका साधिला ॥ ज्ञानघन आत्मा तूं दर्शविला ॥ तो तूं सा
क्षी असशी एकला ॥ हा अनुभव कथिला चतुर्थी ॥ ७६ ॥ सर्वही भुवनीं आत्मयाची ॥
व्याप्ति कथियेली चित्सत्तेची ॥ ओतप्रोत प्रतिपादक श्रुतीची ॥ आणि दर्शविली स्मृती-
ची प्रमाणता ॥ ७७ ॥ पुनः शिष्यें आशंका केली ॥ सर्वत्र चित्सत्ता व्यापिली ॥ असतां को-
णी जडत्व पावली ॥ कोणी चेतना झाली सांगा स्वामी ॥ ७८ ॥ अरे शिष्या चैतन्य व्याप-
क सर्वत्र ॥ परी शुद्धोपाधींत प्रतिबिंब होत ॥ तेणें तें सचेत असें भासत ॥ अशुद्धीं जडत्व
प्रतिबिंबाभावें ॥ ७९ ॥ पुनः शिष्यें केला प्रश्न ॥ पूर्वी पंचदशीच्या वचनें करून ॥ सांगित
लें ज्ञान अभिन्न ॥ आतां आपण ह्मणतां तें चि तूं ॥ ८० ॥ ऐसा उभय वचनीं दिसतां भेद ॥
मग त्या आशंके चा करून छेद ॥ अद्वय सच्चिदानंद शुद्ध ॥ पूर्ण बोध तूं असशी ॥ ८१ ॥
तुझ्या स्वरूपाचे ठायीं ॥ त्रिविध परिच्छेद नाहीं ॥ आणि सजातीय विजातीय पाही ॥ न
से च कांहीं स्वगत भेद ॥ ८२ ॥ एवं आत्मा चैतन्य घन ॥ तो तूं चि गा निश्चयें पूर्ण ॥ हें मुख्य पु
नः पुनः शिष्या लागुन ॥ उपदेशिलें जाण पंचमाध्यायीं ॥ ८३ ॥ पुनः सत् चित् आनंद पर-
चा ॥ प्रमाणांतरें बोध साचा ॥ हा वाह्मपून आनंदमय कोशाचा ॥ अ

र्णिलोपे ॥८४॥ त्याआनंदमयकोशविचारेंकरून ॥ ब्रह्मानंदाचेंआणिविषयानंदाचेंवि
वेचन ॥ स्पष्टबोलूनसंपूर्ण ॥ केलेंप्रवचनषष्ठमाध्यायीं ॥८५॥ पुनः सच्चिदानंदब्रह्मनि-
श्चित ॥ आणितद्विवर्तनामरूपजगत ॥ त्याविषयींश्रुतिस्मृतिसंमत ॥ केलेंदर्शितसप्तमा
ध्यायीं ॥८६॥ मंदबुद्धिजोतयासी ॥ दृढबोधव्हावयासी ॥ पुनःपुनःनिरूपणासीं ॥ स
प्तमाध्यायासीसंपविलें ॥८७॥ मगनिर्विकारीजगद्भान ॥ कैसेंभासतेंम्हणोन ॥ इत्यादि
आशंकाउत्थापून ॥ समाधानकथियेलें ॥८८॥ ब्रह्मअद्वैतसिद्धांत ॥ मायामिथ्याविव
र्त ॥ अनिर्वाच्यमृगजळवत ॥ दृष्टांतयुक्तकथिलेंअष्टमीं ॥८९॥ मगसाधनचतुष्टयाचेंस्व
रूप ॥ तद्वत्वैराग्यादिकांचेहेतुस्वरूप ॥ आणित्यांचाफलावधिअमुप ॥ नरेविलाअ-
ल्पसंशयभ्रम ॥९०॥ पुढेंवर्णिलेसमाधिप्रकरण ॥ सविकल्पनिर्विकल्पलक्षण ॥ पुनः
तोसमाधिषट्प्रकारेंकरून ॥ वर्णिलाजाणअंतर्बाह्य ॥९१॥ समाधिअभ्याससमयीं
॥विक्षेपादिविघ्नेंयेतीत्याठायीं ॥ त्याचीनिवृत्तिकरूनउपायी ॥ अभ्यासपाहीकरावा ॥
॥९२॥ कोणीआकाशासमब्रह्महमणती ॥ त्याचीविवेकद्वाराकरूननिवृत्ती ॥ सच्चिदानं
दब्रह्मस्थिती ॥ तीवर्णिलीयुक्तीनवमाध्यायीं ॥९३॥ ऐसाअपरोक्षज्ञानयुक्त ॥ त्यासच
म्हणतीजीवन्मुक्त ॥ त्याचेंआचरणविधियुक्त ॥ केलेंदर्शितयथाशास्त्रें ॥९४॥ तेइच्छा
निच्छापरेच्छानुसार ॥ जगींवर्ततीनिरंतर ॥ भक्तिज्ञानादिप्रकार ॥ दाविलीतोविचार

दशमाध्यायीं॥ ९५॥ संचितप्रारब्धक्रियमाण॥ त्यांचेंस्वरूपकथिलेंपूर्ण॥पुढेंविदेहमु
क्तिप्रसंगेंकरून॥ कथिलेंनिर्वाणएकादशी॥९६॥ असोअपरोक्षज्ञानझालियावर
॥राहावेंकैसेंतोप्रकार॥नीतिसंक्षेपसविस्तर॥ तीहींसाचारलिहियेली॥९७॥ एवंइत्या
दिनिरूपण॥जेंजेंकेलें असेकथन॥ तेंतेंहृदयीं दृढधरोन॥ व्हावेंनिमग्नस्वस्वरूपीं॥
॥९८॥ श्रीरघुनाथाचार्यकिंकर॥देहासमौनीनामोच्चार॥ निवासस्थानग्रामसिन्नर
॥हेंबोधसारकथिलेंतेणें॥९९॥ संवत्अठराशेंएक्याशींत॥ शकेसत्राशेंचाळिसांत
॥तारणनामसंवत्सरांत॥ स्वात्मबोधग्रंथकेलासे॥१००॥ हेमंतऋतुपौषमासीं॥ शु
द्धपक्षदशमीचेदिवशीं॥प्रथमप्रहरांतनिश्चयेसी॥ केलेंग्रंथासीसमाप्त॥१०१॥ ॥
इतिश्रीस्वात्मबोधग्रंथ॥ श्रीरघुनाथाचार्यसमर्थी॥ तत्पादरजमौनीकृत॥ अध्याय
समाप्तएकादशहा॥११॥ ॥७॥ ॥श्रीजगदीश्वरार्पणमस्तु॥
॥७॥ ॥७॥ ॥ समाप्तोऽयंग्रंथः॥ ॥७॥ ॥

हा पारमार्थिक स्वात्मबोध ग्रंथ श्रीमत्परमहंस परिव्राजकाचार्य श्री अद्वैत सच्चिदानंदेंद्र सरस्वती प्रिय श्रीनारायणेंद्र सरस्वती स्वामी प्रख्यात नाम मौनी महाराज यांणीं आपले सांप्रदायी मंडळीचे हिताकरितां रचना करून ठेविला तो ग्रंथ खालीं सही करणारे इत्यादि स्वामी महाराजांचे सांप्रदायी मंडळी यांनीं आपले हिताकरितां जगदीश्वर छापखान्यांत छापिला आहे. हा ग्रंथ दुसरे कोणीही छापूं नये कदाचित् छापला तर आमचे मंडळीचे नुकसानीचे मालक त्यांस व्हावें लागेल. मिती वैशाख-शुद्ध १० रविवार शके १८०० बहुधान्यनाम संवत्सरे संवत् १९३५ ते दिवशीं छापून तयार केला असे.

१ सही शिवराम नानाजी.	१ नाना बापूजी.
१ विठ्ठलदास शंकरलाल.	१ गणपतराव नारायणजी.
१ अमृतराव बळवंत.	१ बळवंतराव आनंदराव.

हा ग्रंथ कोणीही छापूं नये म्हणून मालकांनीं सर्व प्रकारचे हक्क आपलेकडेस ठेविले आहेत.

॥ इति स्वात्मबोधः समाप्तः॥

V 891.461 R. 50480
Mau/Sva

AUTHOR Mauni maharaj
TITLE Svatmabodh.

DATE DUE | BORROWER'S NAME

V 891.461
Mau/Sva
50480

Date Due

